शनिवार । २९ एप्रिल १९७८
७५ पैसे

# माणूस



भूमिविकास दल,
जहांगीर
पस्ताकिया बंगला
कामशेत,
ता. मावळ
जि. पुणे

## जाहीर निमंत्रण

तारीख ३० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता नायगावला येण्याचे हे निमंत्रण.

खूप मोठ्या संख्येने हजर रहा आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा, महात्मा जोतिबा फुल्यांचा समतेचा, माणुसकीचा संदेश गावोगावी, घरोघरी पोहोचवा.

नायगाव गावातील सवर्ण गावकरी व दलित गावकरी सार्वजनिक विहिरीवर एकत्र पाणी भरणार आहेत. हा कार्यक्रम भूमिविकास दलाने आयोजित केला आहे.

आम्ही गेले वर्ष-दीड वर्ष दलितांच्या मनाची तयारी करीत होतो. त्यांनी निर्भय बनावे म्हणून प्रयत्न करीत होतो. यासाठीच आम्ही भूमिविकासदल चालवीत आहोत.

भूमिविकासदल म्हणजे भूमीचा विकास आणि तिच्यावर जगणाऱ्या माणसाचा विकास. ह्या विकासाकरिता दल म्हणजे संघटना.

माणसाच्या विकासाची सुरुवात अन्न, वस्त्र, घर, शिक्षण व आरोग्य या त्याच्या अगदी जरुरीच्या गरजांची त्याला जाणीव करून देऊन आम्ही करतो. पाणी ही एक अत्यावश्यक गरज. जातिप्रथेने भेदाभेद करून सार्वजनिक विहिरीवर पाणी भरायला दलितांना मज्जाव केलेला आहे. पाणी म्हणजेच जीवन. हे जीवनच दलितांना नाकारण्यात आलेले आहे.

मानवी जीवन जगण्याचा दलितांनी आता निर्धार केला आहे. इतर गावांतील दलितांना विश्वास मिळावा, त्यांनी निर्भय बनावे म्हणून ३० एप्रिलचा हा छोटासा समारंभ !

या समारंभाला दि. ३०।४ ला सकाळी १० वा. नायगावला मोठ्या संख्येनें हजर राहून आपल्याही गावी सार्वजनिक पाणवठा सर्वांना खुला करण्याचा निर्धार करावा ही विनंती.

या समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. बाबा आढाव आहेत. पुण्याच्या व मुंबईच्या आमदारांनी उपस्थित रहाण्याचे मान्य केले आहे.

या समारंभात सामील व्हा. समतेचा संदेश समजून घ्या व त्याचा प्रसार करा.

**नयना कुलकर्णी,**
कार्यकारी सचिव

**साप्ताहिक माणूस**

वर्ष सतरावे-अंक अठ्ठेचाळीस
२९ एप्रिल १९७८
मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४४३४५९
¤

# सप्रेम नमस्कार

¤ 'माणूस'च्या दिनांक १५ एप्रिलच्या अंकात प्रा. रावसाहेब कसबे यांच्या 'झोत' या पुस्तकावरील श्री. शरद पाटील यांचे परीक्षण आपण प्रसिद्ध केले आहे. सदरहू लेख प्रकाशित करून आपण शरद पाटील यांना 'अग्निदिव्य' करण्याची, पर्यायाने हुतात्मा होण्याची संधी दिली नाही याबद्दल सर्वप्रथम आपले अभिनंदन. अन्यथा रा. स्व संघाचे अतिशय परखड मूल्यमापन करणारे व या विषयावर नवा प्रकाशझोत टाकणारे रावसाहेब कसबे बाजूलाच राहिले असते व अग्निदिव्याचे क्रेडिट मात्र विनाकारण शरद पाटील यांना मिळाले असते.

शरद पाटील तुम्हाला लिहिलेल्या पत्रात स्वतःच म्हणतात त्याप्रमाणे त्यांचे परीक्षण खळबळजनक, Sensational वगैरे तर नाहीच, उलट उत्तम परीक्षणाचा दर्जा त्याला देणेही कठीणच आहे. 'झोत' या पुस्तकावरील समीक्षा तर त्यात नावालाच आहे. जी काही आहे त्यात मूळ पुस्तकातील व इतर उद्धरणेच फार आहेत. परीक्षणाच्या निमित्ताने शरद पाटील यांनी स्वतःबद्दल मात्र बरेच काही सांगितले आहे. असो. मी ज्या संदर्भात हे पत्र लिहीत आहे तो वेगळाच आहे.

आपल्या समीक्षात्मक लेखात शरद पाटील यांनी जाताजाता चित्पावन ब्राह्मणांना 'औद्धत्यपूर्ण विधान करणारे' व 'शूद्र-द्वेष्टे' म्हटले आहे. त्याचा उल्लेख करून एवढेच सांगावेसे वाटते की, रावसाहेब कसबे यांच्या सबंध पुस्तकात विचारांचा जो समतोलपणा आहे तसेच समाजातील विविध जातींकडे व वर्गांकडे पहाण्याचा वास्तव व वैज्ञानिक दृष्टिकोन आहे तो शरद पाटील हे मार्क्सवादी विचारवंत असूनही त्यांच्यात मात्र अभावानेच आढळतो. रावसाहेब कसबे यांनी ब्राह्मणवर्गाचा विचार करताना एक फार महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. ते म्हणतात, 'ब्राह्मणवर्गाने जरी जाती जन्माने ठरवलेल्या असल्या तरी ब्राह्मणकुलोत्पन्न सर्वच व्यक्ती या ब्राह्मणी वर्चस्वासाठी' धडपडणाऱ्या आहेत असे मी मानीत नाही. ब्राह्मणसमाजात ब्राह्मणी वर्चस्व टिकविणारे नेते, विचारवंत आणि साहित्यिक कलावंत जसे आहेत तसेच ब्राह्मणी वर्चस्व झुगारून सामान्य माणसाला सामाजिक–आर्थिक न्याय देण्यासाठी सुरू झालेल्या चळवळींचे नेतृत्व करणारेही काही जन्माने ब्राह्मण आहेत; परंतु सामान्य जनतेच्या बाजूने उभे रहाणारे नेते हा हिंदुत्ववाद्यांच्या टीकेचा आणि उपहासाचा विषय आहे! महाराष्ट्रात आगरकरांपासून ते एस्. एम्. जोशी, कॉ. डांगे यांच्यापर्यंतच्या सर्व नेत्यांच्या वाट्याला ही टीका आणि उपहास आलेला आहे.' विचारांमधील हा समंजसपणा थोडा जरी शरद पाटील यांच्या विचारात असता व त्यांनी महाराष्ट्रात आजपर्यंत झालेल्या सामाजिक सुधारणा, डाव्या चळवळी, तसेच साहित्यातील मार्क्सवादी व पुरोगामी प्रवाह यांच्यातील चित्पावन ब्राह्मणांच्या सहभागाचा, कॉन्ट्रिब्यूशनचा विचार केला असता तर त्यांनी ज्या पद्धतीने सर्वच चित्पावन ब्राह्मणांना वेठीला धरून त्या जातीला 'शूद्र-द्वेष्टे' हे विशेषण लावले आहे ते लावले नसते. मी हे सर्व कोकणस्थ जातीच्या अभिमानापोटी लिहितो आहे असे कृपया कुणी समजू नये. तसे झाल्यास मला अतीव दुःख होईल. मला फक्त एवढेच म्हणायचे आहे की, शरद पाटलांसारख्या मार्क्सवादी विचारवंताने तरी जातींविषयीचे पूर्वग्रहांवर आधारित विचार आजच्या विसाव्या शतकात आपल्या मनात बाळगू नयेत एवढी किमान अपेक्षा करणेही चूक

ठरावे का? की ज्या चित्पावन ब्राह्मणांना शरद पाटील 'औद्धत्यपूर्ण विचार करणारे' म्हणतात तशी औद्धत्यपूर्ण विधाने शरद पाटीलही करू शकतात असे समजायचे?

१७ एप्रिल —अविनाश सहस्रबुद्धे

□ गेल्या 'माणूस'मध्ये श्री. शरद पाटील यांचं खोचक पत्र (परीक्षणाच्या निमित्ताने लिहिलेलं) आणि त्या पत्रावर आपण सात्त्विक संतापाने लिहिलेली संपादकीय टीप वाचली.

असा सात्त्विक संताप करण्याचा अधिकार आपल्याला आहे असं मला वाटत नाही. शरद पाटलांनी आपल्या संपादकीय धैर्याबद्दल शंका बाळगली तर फार चूक नाही असं मला वाटतं. मी आपल्या स्मरणशक्तीला थोडा ताण देऊ इच्छितो. निवडणुकीच्या काळात महाराष्ट्र जनता पक्षाचे सरचिटणीस श्री. वसंतराव भागवत यांनी 'माणूस'ला दिलेल्या मुलाखतीत संघविषयक मतप्रदर्शन केलं होतं. त्या अनुषंगाने माझे मित्र श्री. दादरकर यांनी 'माणूस'ला पत्र पाठवलं होतं. त्या पत्राला प्रसिद्धी मिळाली नाही. माझे दुसरे मित्र श्री. माधव साठे यांनी ऑक्टोबरात 'माणूस'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'गांधीजींचे खरे खुनी यशवंतराव–संघ नव्हे' या पन्नालाल सुराणांच्या लेखाला लिहिलेलं उत्तरही 'माणूस'मधून प्रसिद्धी मिळवू शकलं नाही. मात्र जनता पक्षाच्या मुखपत्रात (जनवाणी) आलेलं श्री. पद्माकर जोशी यांचं संघपरिवाराची बाजू मांडणारं पत्र आपण आश्चर्यकारक तत्परतेनं छापलंत.

या सर्व उदाहरणांवरून आपल्या संपादकीय निःपक्षपातीपणाबद्दल संशय व्यक्त केला गेला तर त्यामुळे आपण क्रुद्ध न होता आपल्या संपादकीय आवडीनिवडींचे विवेकी संतुलन साधण्याचा प्रयत्न करावा असं मला नम्रपणे सुचवावंसं वाटतं.

आपण हे पत्र छापाल अशी अपेक्षा आहे.

१७ एप्रिल —नंदू धनेश्वर, मुंबई

[आपल्या 'नम्रपणा'बद्दल आभार.–सं.]

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ विद्यापीठ–क्षेत्रामधील आणखी एक गैरप्रकार

देशातील विद्यार्थीजगत सध्या चांगलेच ढवळून निघालेले दिसते. काही ना काही कारणांनी या जगतामध्ये रोज नव्याने उद्रेक होत आहेत आणि हा वणवा चौफेर भडकतो आहे. पंतनगर–विद्यापीठामधील बेछूट गोळीबारामध्ये तर उत्तरप्रदेशचे सरकार वाहून जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. विद्यार्थीजगतामधील या अशांततेला कधी विद्यार्थी जबाबदार असतात, तर कधी राजकारणी मंडळी त्यांचा हत्यारासारखा उपयोग करून घेतात, तर कधी विद्यापीठामधील सत्तेच्या साठमारीतून वातावरण तापते. विद्यापीठाच्या पवित्र वातावरणातही किती ओंगळ राजकारण खेळले जाते याचे काही नमुने पुढे आले आहेतच. याच क्षेत्रामधील आणखी एक गैरप्रकार जबलपूरच्या नेहरू शेतकी विद्यापीठाबाबत नेमलेल्या समितीने उजेडात आणला आहे.

पी. सी. सेठी मुख्य मंत्री असताना एक ज्येष्ठ अधिकारी श्री. ओक यांची एकसदस्य चौकशीसमिती नेमण्यात आली. श्री. ओक यांनी आपल्या चौकशीचा अंतरिम अहवाल सादर केला. तथापी दुर्दैवाने चौकशीसमितीचे काम पूर्ण होण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. चौकशीसमितीने सादर केलेला अहवाल अगदी अलीकडेच मध्यप्रदेशचे शेतकीमंत्री व्ही. चनपुरिया यांनी मध्यप्रदेश विधानसभेमध्ये सादर केला. या अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, नेहरू शेतकी विद्यापीठाचे त्या वेळचे कुलगुरु डॉक्टर चंद्रिका ठाकूर यांनी विद्यापीठ–आवारामध्ये दोन हेरांची नेमणूक केली होती. हे हेर एका खाजगी डिटेक्टिव्ह कंपनीने पुरविले. या हेरांचे काम काय? तर उपकुलगुरूंच्याबद्दल विद्यार्थी, शिक्षक आणि अन्य कर्मचारी काय बोलतात याचा तपशील ठेवणे आणि पुढील कारवाईसाठी हा सारा तपशील उपकुलगुरूंच्या स्वाधीन करणे. कोणासंबंधी प्रतिकूल अहवाल आला तर उपकुलगुरू अगदी तत्परतेने कारवाई करीत असत. या हेरप्रकरणाचा सारा तपशीलच या अहवालामध्ये पहावयास सापडतो. समितीने आपल्या अहवालामध्ये या हेरांची नावेही दिलेली आहेत. या हेरांच्या सेवेबद्दल संबंधित डिटेक्टिव्ह कंपनीला पाच हजार रुपये मोबदला म्हणून व चार हजार रुपये अन्य खर्चासाठी देण्यात आले. विद्यापीठ–कर्मचाऱ्यांचे योग्य ते सहकार्य न मिळाल्याने हा खर्च कशा प्रकारे भागविण्यात आला याचा तपशील

अहवालामध्ये नोंदलेला नाही. ज्या व्यक्तींची हेर म्हणून नेमणूक करण्यात आली त्यांपैकी एक कुमारी रेखा विश्वास या नावाची तरुणी होती. कोणाचाही संशय येऊ नये म्हणून तिची विद्यापीठामध्ये कनिष्ठस्तर कारकून म्हणून नेमणूक करण्यात आली. ती विद्यापीठामध्ये काय काम करते याला फारशी किंमत नव्हती. ती सतत या टेबलाकडून त्या टेबलावर धावत असे. तिने आपले असे एक मित्रमंडळ तयार केले होते. अतिशय मोकळ्या स्वभावाची तरुणी म्हणून तिने लौकिक मिळविला आणि मग आपल्या खऱ्या कामाला प्रारंभ केला. नियमितपणे ती उपकुलगुरूंची भेट घेऊ लागली. तिने सादर केलेल्या अहवालावरून अनेकांना त्रास देणे, त्यांच्या बदल्या करणे यासारख्या कारवाया सुरू झाल्या. केवळ नोकरीचा विचार केला तर ती कनिष्ठस्तर कारकून; परंतु तिला रहायला सर्व सुविधा असलेला बंगला. आपल्या घरी तिने ओल्या पार्ट्या देण्यास ज्या वेळी प्रारंभ केला त्या वेळी विद्यापीठामधील अन्य कर्मचाऱ्यांना तिचा संशय आला. तिच्यावर पाळत ठेवली असता वेळी-अवेळी केव्हाही ती उपकुलगुरूंच्या घरी जाऊ शकते हे लक्षात आल्यावर जेव्हा चौकशीसमिती नेमली गेली तेव्हा अनेकांनी तिच्या विरुद्ध साक्ष देऊन हे प्रकरण धसास लावले. विद्यापीठाच्या उपकुलगुरूंनी ज्यांची हेर म्हणून नेमणूक केली होती असे दुसरे गृहस्थ म्हणजे श्रीयुत अहुजा. जबलपूरच्या विद्यापीठ आवारामध्ये एक हेर नेमल्यावर आणि तो आपले काम चोख बजावतो आहे हे लक्षात आल्यावर या दुसऱ्या हेराची नेमणूक विद्यापीठाच्या रेवा येथील शाखेमध्ये करण्यात आली. या हेराकडे जरा वेगळ्या स्वरूपाचे काम होते. त्याने विद्यार्थ्यांशी अधिक संपर्क ठेवून उपकुलगुरूंसाठी संरक्षक फळी निर्माण करावी अशी अपेक्षा होती.

श्री. ओक यांनी दुहेरी तपास करून हे सर्व प्रकरण खरे असल्याचे आपले मत नोंदले आहे. ग्लोब डिटेक्टिव्ह एजन्सी या संस्थेचे मॅनेजिंग डायरेक्टर प्रेमकुमार यांच्याशी त्यांनी चर्चा केली त्या वेळी त्यांना असे सांगण्यात आले की, विद्यापीठाकडून हेर पुरविण्याबाबतची विचारणा करण्यात आल्याने प्रारंभी त्यांनाही आश्चर्य वाटले; परंतु विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ठाकूर यांच्या विटणिसांमार्फत सांगण्यात आले. त्यानंतर ग्लोब डिटेक्टिव्ह एजन्सी व विद्यापीठ यांमध्ये रीतसर करार झाला आणि खोट्या नावांनी या कंपनीचे डिटेक्टिव्ह विद्यापीठामध्ये घुसविण्यात आले. या दोन डिटेक्टिव्हांनी विद्यापीठामध्ये सुमारे पाच महिने काम केले. त्यानंतर मूळ करारातील काही कलमांचे पालन न झाल्याने कंपनीने हेर म्हणून नेमलेली आपली माणसे परत बोलविली. या नेमणुकीबाबत ओक समितीसमोर उलटसुलट्या साक्षी देण्यात आल्या. उपकुलगुरु डॉक्टर ठाकूर म्हणाले की; त्या वेळचे मुख्यमंत्री पी. सी. सेठी यांच्या सांगण्यावरून कुमारी विश्वास यांची नेमणूक करण्यात आली आणि त्या विद्यापीठाच्या राजकारणापेक्षा बाहेरील राजकारणात जास्त रस घेत असत. मुख्यमंत्री पी. सी. सेठी यांनी हा आरोप साफ नाकारला. विद्यापीठाचे उपकुलगुरु बनवाबनवीमध्ये चांगले तरबेज असावेत. हे डॉक्टर ठाकूर बिहार सरकारच्या सेवेमधील वरिष्ठ अधिकारी. मध्यप्रदेशचे त्या वेळचे राज्यपाल सत्यनारायण सिन्हा बिहारी. आपली माणसे बोलावून घेऊन त्यांचे भले करण्याचा त्यांना दांडगा शौक. सत्यनारायणजी राज्यपाल असल्याने जबलपूरमधील नेहरू कृषिविद्यापीठाचे पदसिद्ध अध्यक्ष होते. त्यांनी हा आपला माणूस बिहारमधून उचलला आणि त्याला विद्यापीठाचा उपकुलगुरु बनवून टाकला!! या महोदयांना बिहारमधून आणले त्या वेळी त्यांच्या विरुद्ध काही भ्रष्टाचाराचे आरोप होते आणि राज्यसरकार त्यांची चौकशी करीत होते. असा माणूस राज्यपालांनी बोलावून घेतला. नियमाप्रमाणे त्यांना केवळ एक हजार पाचशेऐंशी रुपये पगार मिळणे जरूर होते, परंतु प्रत्यक्षात त्यांना जवळजवळ २॥ हजार रुपये देण्यात आले. खेरीज कायम वापरासाठी मोटार आणि सुखसोयींनी युक्त असा बंगलाही देण्यात आला. या उपकुलगुरूंनी विद्यापीठाच्या गाडीचा ज्या प्रकारे वापर केला त्यावर समितीने ताशेरे ओढले असून हे डॉक्टरसाहेब ज्या पद्धतीने समितीला माहिती देत त्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. समितीने त्यांना साधा प्रश्न विचारला की, आपण अद्यापी राज्यसरकारच्या सेवेत आहात काय? आणि बिहार सरकारने आपल्याला शेवटचा पगार किती दिला? या प्रश्नांची उत्तरे देण्यास डॉक्टर ठाकूर यांना दहा आठवडे लागले! असला माणूस शिक्षणक्षेत्रामध्ये आणता तरी कसा आला? नेहरू कृषिविद्यापीठाच्या उपकुलगुरुपदासाठी नावे सुचविण्यासाठी जी समिती नेमण्यात आली त्या समितीचे नावाबाबत एकमत होईना आणि नावांची शिफारसही होईना. तेव्हा राज्यपालांनी आपल्या अधिकारात समिती रद्द करून त्या वेळी बिहार सरकारच्या सेवेत शेतकी विकास संचालक म्हणून काम करणाऱ्या या अधिकाऱ्याला बोलावून घेतले. त्यांच्या विरुद्ध बिहार शासनातर्फे जी चौकशी चालू होती तीही थांबविण्यात आली आणि सरकारी सेवेतील हा भ्रष्टाचारी माणूस विद्यापीठाच्या पवित्र आवारात येऊन बसला! आता ही असली माणसे विद्यापीठात जर मोक्याच्या जागी येऊन बसू लागली तर विद्यार्थी तरी कसे स्वस्थ बसणार? विद्यापीठामध्ये हेर नेमण्यात आले आहेत हे समजल्यावर वातावरण तापले आणि शासनाने या चौकशीआयोगाची नेमणूक केली. चौकशीचे जे काम ओक समितीने केले ते तसेच दडपून टाकण्यात आले. आता जनता सरकारने हा अहवाल प्रसिद्ध केला असल्याने विद्यापीठामधील भ्रष्टाचाराचे आणि मनमानी कारभाराचे हे एक ओंगळ उदाहरण जनतेसमोर आले आहे.

*

## □ अझमगढ – लोकसभा पोटनिवडणूक

ज्या उत्तर प्रदेशामध्ये जनता पक्षाने काँग्रेसला वर्षाभरापूर्वी पूर्णपणे पराभूत केले, त्याच उत्तर प्रदेशात अझमगढ लोकसभा मतदारसंघामध्ये येत्या ७ मे रोजी होत असलेल्या पोटनिवडणुकीमध्ये जनता पक्ष आज प्राणपणाने लढा देत आहे. या पोटनिवडणुकीकडे केवळ एक साधी पोटनिवडणूक म्हणून पाहू नका या निवडणूकनिकालाचे दीर्घकालीन परिणाम होणार असल्याने ही पोटनिवडणूक ऐतिहासिक महत्त्वाची समजा आणि जिंका असा सल्ला जनता पक्षाचे उत्तर प्रदेशामधील एक ज्येष्ठ नेते नामदार चरणसिंग यांनी त्या मतदारसंघातील आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना दिला आहे. उत्तर प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री नामदार राम नरेश यादव यांनी राजीनामा दिल्यामुळे ही पोटनिवडणूक घ्यावी लागत आहे. वर्षाभरापूर्वी त्यांनी त्या वेळचे केंद्रीय मंत्री चंद्रजित यादव यांचा पराभव केला आणि चंद्रजित यादव यांची मक्तेदारी संपविली. १९५२ पासून या मतदार संघावर काँग्रेसचे वर्चस्व होते. १९६७ मध्ये काँग्रेस विरोधाची लाट असतानाही चंद्रजित ८२ हजार मतांनी निवडून आले. १९७१ च्या निवडणुका तर काय पूर्णपणे इंदिरामय होत्या. त्या वेळी चंद्रजित यादव यांना १ लक्ष १७ हजार ७१९ मते पडली, तर त्यांच्या सगळ्यात नजीकच्या प्रतिस्पर्ध्याला केवळ ६१ हजार ६५० मते पडली. काँग्रेसची ही विजयी घोडदौड १९७७ च्या मार्चमध्ये थांबली. साऱ्या उत्तर हिन्दुस्थानामध्ये जे झाले तेच येथेही झाले. फारसे नाव नसलेल्या राम नरेश यादव यांनी मंत्रिपद भूषविणाऱ्या चंद्रजित यादव यांना चारही मुंड्या चीत केले. एक लाखाहून अधिक मतांनी केंद्रीय मंत्र्याला पराभूत करण्याचा मान त्यांनी मिळविला. राम नरेश यादव यांना २ लक्ष ३८ हजार ९३८ मते पडली, तर यादव यांना १ लक्ष १ हजार १८९ मते पडली. एवढा दारुण पराभव झालेले हेच चंद्रजित यादव आज अधिकृत काँग्रेसतर्फे पुन्हा या निवडणुकीमध्ये उतरले आहेत, तर जनता पक्षातर्फे राम बच्चन यादव हेही निवडणूक लढवीत आहेत. राम बच्चन यादव यांनी आपला अर्ज दाखल केला त्या वेळी मुख्यमंत्री जातीने उपस्थित होते; पण वातावरण काही फारसे उत्साहाचे नव्हते. उलट जमलेल्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीमार केल्याने वातावरण तापले होते. याउलट मोहसिना किडवाई या इंदिरा काँग्रेसतर्फे आपला अर्ज दाखल करण्यासाठी आल्या त्या वेळी अतीव उत्साहाने त्यांचे स्वागत करण्यात आले. आपण ही निवडणूक जिंकणारच अशा आत्मविश्वासाने इंदिरा काँग्रेसचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. स्वतः इंदिराजी प्रचाराचा धूमधडाका उडवून देणार आहेत. या लोकसभा मतदारसंघाखाली जेवढे विधानसभा मतदारसंघ येतात त्या प्रत्येक मतदारसंघामध्ये त्या एक दिवस घालविणार असून त्यांच्या एकूण सभांची संख्या १०० हून अधिक आहे.

### बचावात्मक पवित्रा

वर्षाभरापूर्वी ठसठशीतपणे दिसणारी आणि निवडणुकनिकालामध्ये अनुभवास आलेली जनता-लाट जवळजवळ नामशेष झालेली आहे. जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचाही धीर खचल्यासारखे दिसते. त्यातच राज्यसरकारच्या नोकरीमधील राखीव जागांच्या प्रमाणावरून उसळलेले वादविवाद, पंतनगरमधील गोळीबार या गोष्टीही सत्ताधारी पक्षाला त्रासदायक ठरणार आहेत. याउलट इंदिरा काँग्रेसला या पोटनिवडणुकीमध्ये जर मुसंडी मारता आली तर या पक्षाचा तो एक मोठा विजय ठरणार आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकांचा आता अजिबात संदर्भ लावता येणार नाही इतकी परिस्थिती बदलली आहे. विधानसभा निवडणुकांचे वेळी जनता पक्षाला थोडेफार तरी अनुकूल असे वातावरण होते, आता तेही दिसत नाही. लोकसभा निवडणुकीमध्ये जनता पक्षाला ६७·२५ टक्के मते मिळाली होती, तर काँग्रेसला २८·४ टक्के मते मिळाली होती. सर्वच्या सर्व विधानसभामतदारसंघांमध्ये जनता पक्षाला आघाडी मिळाली होती. तथापि त्यानंतर केवळ तीनच महिन्यांनी झालेल्या विधानसभानिवडणुकीमध्ये काँग्रेसने ५ पैकी दोन जागा जिंकल्या. खुद्द अझमगढमध्ये काँग्रेसने जनता पक्षाच्या उमेदवाराला पाच हजार मतांनी पराभूत केले, तर अत्रुलिया या दुसऱ्या विधानसभामतदारसंघामधील जागा तीन हजार मतांनी जिंकली. उरलेल्या तिन्ही विधानसभा मतदारसंघामध्ये जनता पक्षाने यश मिळविले. तथापि मतांचे प्रमाण चांगलेच घटलेले दिसले. गोपालपूरमधील जागा केवळ दोन हजार मतांनी तर फुलपूरची जागा केवळ तीन हजार मतांनी जिंकली. सराईमीरमध्ये जनता पक्षाला सर्वांत जास्त म्हणजे पाच हजार मतांचे मताधिक्य मिळाले. या विधानसभा मतदारसंघांपैकी गोपालपूरमधून निवडून आलेले जनता पक्षाचे उमेदवार रामधर राय नाराज आहेत आणि लोकसभा पोटनिवडणुकीमध्ये पक्षाला त्यांचा उपयोग होण्याऐवजी त्रास होण्याची जास्त शक्यता आहे.

या निवडणुकीमध्ये २१ उमेदवार असले तरी खरी लढत तिरंगी होणार असून माजी केंद्रीय मंत्री चंद्रजित यादव (काँग्रेस), मोहसिन किडवाई (इंदिरा काँग्रेस) व राम बच्चन यादव (जनता) हे तिन्ही उमेदवार आपल्या पक्षाची सारी ताकद लावून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करीत आहेत. या तीन प्रमुख उमेदवारांखेरीज त्रासदायक ठरणारे आणखी दोन उमेदवार या लढतीत आहेत. कम्युनिस्ट पक्षाचे डी. पी. राय आणि रिपब्लिकन पक्षाचे बळीराम हे दोन

पृष्ठ २२ वर

# नवी घटनादुरुस्ती

## दोन महत्त्वाच्या तरतुदी

वा. दा. रानडे

इंदिरा राजवटीतील आणीबाणीत बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने लोकशाहीची व नागरी स्वातंत्र्याची जी गळचेपी करण्यात आली त्यातील काही तरतुदी रद्द करणारी चव्वेचाळिसावी घटनादुरुस्ती या वेळीच पास झाली. आता बाकीच्या तरतुदी रद्द करणारी पंचेचाळिसावी दुरुस्ती संसदेच्या चालू अधिवेशनात मांडण्यात येणार आहे. कायदामंत्री शांतिभूषण यांनी याबाबत विरोधी पक्षनेत्यांशी केलेल्या चर्चेत नव्या घटनादुरुस्ती विधेयकातील दुरुस्त्यांबाबत सर्वसाधारण अनुकूलता दिसून आली. येथे फक्त दोनच दुरुस्त्यांबाबत काही विचार मांडावयाचे आहेत.

मूलभूत हक्कातून खाजगी मालमत्तेचा हक्क वगळण्यात येणार आहे. खाजगी मालमत्तेचा हक्कच रद्द झाला असा याचा अर्थ नाही. सर्वसामान्य कायद्याप्रमाणे खाजगी मालमत्तेबाबत मिळावयाचे संरक्षण नागरिकांना मिळणारच आहे; पण मूलभूत हक्क म्हणून खाजगी मालमत्तेबद्दल असलेले खास संरक्षण मात्र काढून घेण्यात येणार आहे. समाजहिताच्या दृष्टीने खाजगी मालमत्तेवर काही निर्बंध घालणे आवश्यक आहे असे सरकारला वाटले तर त्यासंबंधीचा कायदा करण्यास मूलभूत हक्कामुळे अडथळा येऊ नये हा या दुरुस्तीचा उद्देश आहे. वास्तविक या दुरुस्तीने परिस्थितीत विशेष काही फरक पडणार आहे असे नाही. कारण समाजहिताच्या दृष्टीने खाजगी मालमत्तेवर निर्बंध घालण्याचा सरकारचा अधिकार यापूर्वीच मान्य करण्यात आलेला आहे. निरनिराळ्या राज्यांचे कमाल जमीनधारणा कायदे, शहरी कमाल धारणा कायदा म्हणजे खाजगी मालमत्तेच्या हक्कावर निर्बंधच आहेत. या कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी झालेली नाही ही गोष्ट निराळी; पण त्यामुळे गरीब आणि श्रीमंत यांच्यातील आर्थिक विषमतेची दरी कमी होण्याऐवजी वाढतच आहे.

नव्या दुरुस्तीने तरी आर्थिक विषमता दूर होणार आहे काय ? की त्यासाठी खाजगी मालमत्तेचा हक्कच पूर्णपणे नष्ट करायला हवा ? रशियात खाजगी मालमत्ता नष्ट झाली पण कमाल पगार आणि किमान पगार यांच्यात तेथे अजूनही मोठी तफावत आहे. तंत्रज्ञांना असलेले पगार आणि गिरणीतील साध्या कामगारास असलेले पगार यांच्यात बरीच तफावत आहे. खाजगी मालमत्ता रद्द केल्याने रशियात एक गोष्ट मात्र साध्य झालेली आहे. खाजगी मालमत्तेचा उपयोग वैयक्तिक नफा मिळविण्यासाठी, दुसऱ्याची लुबाडणूक किंवा पिळणूक करण्यासाठी कोणाला करता येत नाही.

खाजगी मालमत्तेबाबत योग्य भूमिका कोणती ? अशी मालमत्ता करण्याचा हक्क प्रत्येकाला असावा की नाही ? भांडवलशाहीतील आर्थिक विषमतेची दरी म्हणजे अनिर्बंध खासगी मालमत्तेच्या हक्काचाच परिपाक आहे. हे खरे असले तरी रशियात खाजगी मालमत्ता नष्ट करूनसुद्धा वैयक्तिक स्वामित्वाची मनोवृत्ती पूर्णपणे नाहीशी करता आलेली नाही. सामुदायिक मालकीच्या शेतापेक्षा आपल्या मालकीच्या छोट्याशा प्लॉटमध्ये शेतकरी अधिक पीक काढतो याचा दुसरा अर्थ काय ? स्वतःचं छोटं शेत असावं, घर असावं असं माणसाला वाटणं ही समाजहितविरोधी वृत्ती आहे का? व्यक्तिविकास आणि समाजविकास यांची सांगड घालण्याच्या व्यापक प्रश्नाचा तो एक भाग आहे. समाजविकास साधण्याच्या प्रयत्नात व्यक्तीचा कोंडमारा होणार नाही याची दक्षता घ्यावयास हवी. व्यक्तीच्या विकासाला पूर्ण वाव मिळायलाच हवा; पण एका व्यक्तीचा विकास दुसऱ्या अनेक व्यक्तींच्या विकासाचा मार्ग रोखून, त्यांची पिळवणूक करून होता कामा नये. व्यक्तिविकासासाठी काही एक मर्यादेपर्यंत स्वत्वाचा परिपोष आवश्यक असतो हे खरे; पण जगाचा आतापर्यंतचा अनुभव असा की, प्रत्यक्षात ही मर्यादा राखली जात नाही; त्यातून स्वार्थी हितसंबंध बळावतात, व्यक्ती अधिकाधिक पैसा मिळविण्याच्या, अधिकाधिक सत्ता मिळविण्याच्या मागे लागतात. मग त्यासाठी वाटेल त्या मार्गांचा अवलंब करण्याकडे प्रवृत्ती होते. भ्रष्टाचार, हिंसाचार यातूनच वाढत जातात. हुकुमशहा यातूनच निर्माण होतात. अधिकाधिक नफ्याच्या मागे लागून कामगारांची पिळवणूक करणारे उद्योगपतीही यातूनच निर्माण होतात. या अपप्रवृत्तींना आळा घालण्यासाठी व्यक्तिविकास आणि समाजविकास यांचा योग्य समन्वय साधायला हवा. त्यासाठी स्पर्धेऐवजी सहकार्याची मनोवृत्ती लहानपणापासूनच जोपासावयाला हवी. सामाजिक मालमत्तेबद्दल आपुलकी निर्माण करायला हवी. आज सरकारी, सार्वजनिक किंवा सामाजिक मालमत्ता जणू कोणाचीच नाही, ती कशीही वापरावी ही प्रवृत्ती वाढत आहे. सामाजिक मनोवृत्तीचा माणूस आपल्याला अजून घडवावयाचा आहे. तो घडविल्याशिवाय कितीही कायदे केले, घटनादुरुस्त्या केल्या तरी समाजपरिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य होणार नाही.

घटनेची मूळ चौकट ज्यामुळे बदलावी लागणार आहे अशा दुरुस्त्या सार्वमत घेऊन करण्यात याव्यात अशी एक तरतूद नव्या घटनादुरुस्ती विधेयकात करण्यात येणार आहे. प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांनी या सूचनेस अनुकूलता दर्शविली आहे. सार्वमताची सूचना लोकशाही तत्त्वांशी सुसंगतच आहे; पण निवडणुका आणि सार्वमत यातील फरक लक्षात घेतला पाहिजे. गोव्यातील निवडणुका महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने नेहमी जिंकल्या; पण गोवा विलिनीकरणाच्या प्रश्नावर झालेले सार्वमत मात्र तो हरला. विलिनीकरणाचा प्रश्न लोकांपुढे व्यवस्थितपणे विशद केला गेला नाही, त्यामुळे हे अपयश आले. सार्वमतात विशिष्ट प्रश्नावर होय किंवा नाही अशा दोन पर्यायांतून निवड करायची असेल, बहुसंख्य समाज स्थितिशील, रूढिप्रिय असतो. त्याच्या पिढ्यानुपिढ्या चालत असलेल्या समजुती लौकर बदलणे कठीण असते. तेव्हा सार्वमताची सूचना मान्य करण्यापूर्वी सर्व दृष्टिकोनांतून त्याचा अधिक सखोल विचार व्हावा. □

# जनता पक्ष : पहिल्या वर्षाचा ताळेबंद

सदाशिव पेठकर

जनता पक्षाचा पहिला वाढदिवस येत्या १ मे रोजी साजरा होणार आहे.

जनता सरकारचा पहिला वाढदिवस सव्वा महिन्यापूर्वीच (२४ मार्चला) साजरा झाला.

प्रथम सत्ताग्रहण आणि नंतर पक्षनिर्मिती असा काहीसा विचित्र योग 'जनता'च्या कुंडलीमध्ये असला पाहिजे.

(जनता पक्षाची जन्मकुंडली मांडण्याचा खोडसाळ खटाटोप मध्यंतरी यशवंतराव चव्हाण यांनी केला होता. जनता पक्षाची कुंडली पाहण्याऐवजी त्या वेळी त्यांनी स्वतःची कुंडली न्याहाळली असती तर १२ एप्रिल, १९७८ हा आपल्याला अतिशय अशुभ दिवस आहे हे त्यांना कळून आले असते आणि 'मी आता आक्रमक होणार' अशी स्वतःच्या कुवतीला न पेलणारी भाषा त्यांच्या तोंडून निघाली नसती. महाराष्ट्रातील संमिश्र मंत्रिमंडळाने तर आता त्यांना वेगळ्याच भोवऱ्यात भिरकावून दिले आहे.)

जनता पक्ष सत्तेवर आला तो असाधारण परिस्थितीतच. लोकसभेच्या निवडणुकीसाठी हा पक्ष जेव्हा मैदानात उतरला तेव्हा चार घटक पक्षांमध्ये नावापासून तो निवडणूकचिन्हापर्यंत घोळ चालू होता. इतकेच काय पण, एक पक्ष असावा की, चार पक्षांची निवडणुकीपुरती युती करावी याबाबतही मतभेद होते. दहा वर्षांपूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन युतीच्या फंदात पडण्याऐवजी एक पक्ष म्हणून उभे राहण्याचे ठरले आणि हाच निर्णय शहाणपणाचा आहे हे नंतर मतदारांनी दाखवून दिले. निवडणुकीचे निकाल जाहीर होईपर्यंत लोकसभेत आपल्याला बहुमत मिळणार आहे याची जनता पक्षाच्या नेत्यांना मुळीच कल्पना नव्हती.

सत्ताग्रहणाच्या वेळी अंतर्गत असंतोषाचा आविष्कार घडला तो त्यामुळे.

त्यानंतर एप्रिलच्या शेवटच्या दिवशी चारही पक्षांनी आत्मविसर्जन करून घेतले आणि मेच्या पहिल्या दिवशी जनता पक्ष रीतसर अस्तित्वात आला. तोपर्यंत मित्रपक्षाच्या स्वरूपात असलेली जगजीवनरामांची लोकशाहीवादी काँग्रेसही त्या दिवशी जनता पक्षात विलीन झाली.

तेव्हापासून सुरू झालेल्या जनता पक्षाच्या वाटचालीचा आढावा घेताना शासन आणि संघटना यांचा वेगवेगळा विचार करावा लागतो. ही परिस्थिती स्पृहणीय नाही ही गोष्ट पक्षाचे सरचिटणीस मधु लिमये यांच्यापासून तो संसदीय पक्षाचे सरचिटणीस डॉ. मुरलीमनोहर जोशी यांच्यापर्यंत सगळेजण मान्य करतात आणि तरीही वर्षभरामध्ये या परिस्थितीत फरक पडलेला नाही हेही ते कबूल करतात.

अटलबिहारी बाजपेयी यांच्या वक्तृत्वात जसा जोश आणि कळकळ आढळते तशीच आस्था आणि अगत्य डॉ. मुरलीमनोहर जोशी यांच्या संभाषणातूनही प्रतीत होते. पक्षसंघटना आणि संसदीय पक्ष यांच्यात अंतराय निर्माण झालेला आहे, हा आक्षेप स्वीकारताना ते व्यथित झालेले आहेत हे आपल्याला जाणवते. आपल्या मतप्रदर्शनामुळे हा वाद *वाढणार याची काळजी घेण्याइतकी जागरूकताही त्यांच्या*पाशी आहे. म्हणूनच ते म्हणतात, 'मी संसदीय पक्षाचा पदाधिकारी असल्यामुळे शासनाच्या कार्यासंबंधीच बोलणे उचित ठरेल.'

'आमच्या संसदीय पक्षातील प्रत्येक सदस्याला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे, हे तुम्ही परवा पाहिले आहेच,' असे सांगून डॉ. जोशी संसदीय पक्षाच्या बैठकीमधील अनेक वादविवादांचे आणि मतप्रदर्शनाचे किस्से पेश करतात. नागरिकांना, न्यायालयांना आणि वृत्तपत्रांना त्यांचे पूर्वीचे स्वातंत्र्य प्रदान करण्यात आलेले आहे ही जनता सरकारची कामगिरी डॉ. जोशी यांना विशेष गौरवास्पद वाटते. *त्यामागची आपली कारणमीमांसाही* ते विशद करतात. निवडणूक जाहीरनाम्यामध्ये भरमसाट आश्वासने देण्याबाबत राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा लागलेली असते; परंतु सत्तेवर आलेल्या पक्षाला त्या आश्वासनांचा नंतर सोयिस्कर विसर पडतो. जनता पक्षाचा निवडणूक जाहीरनामा तर अतिशय घाईघाईत तयार करण्यात आला होता आणि अनेक प्रश्नांबाबतची घटक पक्षांची भिन्न मते विचारात घेऊन सर्वांचे समाधान करील असा राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम मांडणे हे एक बिकट कार्य होते. त्यामुळे प्रत्येक कार्यक्रमासंबंधी भरपूर आणि तपशीलवार ऊहापोह करता आलेला *नव्हता.* तेवढी त्या वेळी सवडही नव्हती. शिवाय आपण सत्तेवर येऊ अशी आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर जन्माला आलेल्या या पक्षाला शाश्वतीही वाटत नव्हती. ही सगळी परिस्थिती लक्षात घेऊनच जनता सरकारच्या वर्षभराच्या कारकीर्दीचा ताळेबंद मांडला पाहिजे असे डॉ. जोशी सुचवितात.

आणीबाणीमध्ये केंद्रसरकारने नागरी स्वातंत्र्याचा संपूर्ण संकोच केलेला होता. जनता पक्ष ही स्वातंत्र्ये नागरिकांना कितपत बहाल करतो यावर त्या पक्षाची मुख्य कसोटी होती. कारण सत्ता हातात आल्यानंतर आपल्यावर कोणीही टीका करू नये असे नव्या राज्यकर्त्यांनाही

वाटत असते; परंतु तसा कोणताही मोह न बाळगता जनता सरकारने बेचाळिसावी जाचक घटनादुरुस्ती रद्द करणारे विधेयक मांडले आणि त्याला आता कायद्याचे रूपही आले आहे. इंदिरा गांधी यांनी आपल्या विधेयकाचे बेचाळिसावी घटनादुरुस्ती असे नामकरण केलेले असले तरी प्रत्यक्षामध्ये ती दुरुस्ती नव्हती; तर संसदेच्या संमतीने पंतप्रधानांच्या हातात सर्वाधिकार घेण्यासाठी त्यांनी मूळ राज्यघटनेमध्ये बरीच मोडतोड केली होती. त्याकरिता त्यांना न्यायालयांचे अधिकार हिरावून घ्यावयाचे होते. संसदेचे सार्वभौमत्व या गोंडस शब्दांचा आधार घेऊन सरकारने केलेल्या कायद्यांची तपासणी करण्याचा उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांचा अधिकार काढून घेण्याची कुटिल कारवाई करण्यात आलेली होती. जनता सरकारच्या त्रेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने न्यायालयांना लोकशाहीतील त्यांचे महत्त्वाचे स्थान पुन्हा मिळवून दिले आहे.

## चंद्रचूड यांची नेमणूक

सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाची नेमणूक करतानाही हा विवेक दाखविण्यात आला. अजितनाथ राय किंवा एम. एच. बेग यांची त्या पदावर नियुक्ती करताना आपल्यास अनुकूल निर्णय देणाऱ्या न्यायधिशांना बढती देण्याचे धोरण इंदिरा गांधींनी अंगिकारले होते. बेग यांच्या निवृत्तीनंतर सरन्यायाधीश म्हणून कोणाची नेमणूक करायची हा प्रश्न जेव्हा जनता सरकारपुढे आला तेव्हा चंद्रचूड आणि भगवती यांची आणीबाणीतील लेचीपेची भूमिका लक्षात घेऊन त्या दोघांपैकी कोणालाही हे पद देण्यात येऊ नये असे छगलांपासून अनेकांनी सुचविले; परंतु तसे कोणतेही विशेष कारण नसेल तर सेवाज्येष्ठता हाच या पदावर बढती देताना निकष मानावा हे सूत्र स्वीकारून जनता सरकारने चंद्रचूड यांना ते पद दिले. त्यामुळे सोयीचा माणूस सरन्यायाधीशपदी नेमावयाचा या इंदिरा गांधींच्या धोरणापेक्षा जनता पक्ष न्यायालयांकडे वेगळ्या आणि उचित दृष्टिकोनातून पहात आहे याचा पडताळा आला.

प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्याला मंत्र्याचा दर्जा आणि अन्य सुविधा देण्याचा निर्णयही याच सरकारने प्रथम घेतला. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांचे स्थान महत्त्वाचे असते असे सगळेच काँग्रेसनेते म्हणत असत; परंतु प्रत्यक्षामध्ये त्यांनी विरोधी पक्षांची मातबरी कधीच मानली नाही. विशेष गरज भासली तेव्हा विरोधी पक्षनेत्यांना काँग्रेसमध्ये समाविष्ट करून घेण्याचे तंत्र वापरण्यात आले. जनता पक्षाच्या कारकीर्दीत विरोधी पक्षांची प्रतिष्ठा जतन केली जात आहे हे वेळोवेळी महत्त्वाच्या विधेयकांबाबत त्यांच्याशी विचारविनिमय करण्याची प्रथा सुरू करून दाखवून दिले आहे. निवडणुकीच्या वेळी आकाशवाणी आणि दूरदर्शन यांच्यावरून सर्व पक्षांना आपापले विचार मांडण्याची मुभा देऊन नव्या सरकारने आणखी एक चांगला पायंडा पाडला आहे. आकाशवाणी हे सरकारी प्रचाराचे खाते राहता कामा नये म्हणून त्या खात्याचे स्वायत्त महामंडळामध्ये रूपांतर करावे असे चंदा समितीने सुचविले होते; परंतु इंदिरा गांधींनी चंदा समितीची ही महत्त्वाची शिफारस कागदात गुंडाळून ठेवली. जनता सरकारने मात्र निवडणूक-जाहीरनाम्यातील आश्वासनानुसार आकाशवाणी आणि दूरदर्शन यांच्या स्वायत्ततेचा विचार करण्यासाठी वर्गीज या ख्यातनाम पत्रकाराच्या नेतृत्वाखाली समिती नेमली. या समितीने केलेल्या सूचना विचारात घेऊन जनसंपर्काची ही दोन प्रभावी माध्यमे लवकरच स्वायत्त महामंडळाकडे सोपविण्यात येणार आहेत.

देशातील चार वृत्तसंस्थांना बळजबरीने एकत्र आणून 'समाचार' या एकाच संस्थेची स्थापना ही इंदिरा गांधी यांच्या आणीबाणीची खास झलक होती. बातम्या प्रसृत करण्याचे केंद्र आपल्या नियंत्रणाखाली ठेवले की आपल्याला नकोशा वाटणाऱ्या घटनांना वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्धी मिळणार नाही याची चोख व्यवस्था करण्यासाठी 'समाचार'चा बनाव करण्यात आला होता. 'समाचार'चे संचालक मंडळ निवडताना त्यात महंमद युनुस यांना घुसडून देण्यामागे या वृत्तसंस्थेत आपल्याला केव्हाही आणि कसाही हस्तक्षेप करता यावा हाच इंदिरा गांधी यांचा धूर्त उद्देश होता. कुलदीप नायर या दुसऱ्या एका ख्यातनाम पत्रकाराच्या अध्यक्षतेखाली जनता सरकारने समिती नेमून 'समाचार'च्या भवितव्याबद्दल सल्ला मागितला. आता पुन्हा प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया, युनायटेड न्यूज ऑफ इंडिया, हिंदुस्थान समाचार आणि समाचार भारती या चार वृत्तसंस्था स्वतंत्रपणे कार्य करू लागल्या आहेत. त्यामुळे 'समाचार'च्या एकतंत्री काळामध्ये ज्या बातम्या प्रसिद्ध होत नव्हत्या त्यांची वाट मोकळी झालेली आहे.

जनता सरकारच्या या लोकशाहीनिष्ठ कामगिरीचा डॉ. मुरली-मनोहर जोशी विस्ताराने ऊहापोह करतात; कारण आर्थिक प्रश्नांचा बागुलबोवा निर्माण करून जनता पक्षाने वर्षभरात फारसे काही केले नाही असे भासविण्याचा इंदिरा काँग्रेसकडून जाणूनबुजून प्रयत्न केला जात आहे आणि 'स्वर्णसिंग काँग्रेस जनता पक्षाशी हातमिळवणी करीत आहेत' या इंदिरा गांधींच्या आक्षेपात तथ्य नाही हे सिद्ध करण्याकरिता स्वर्णसिंग काँग्रेसचे नेतेही जनता पक्षावर तशीच राळ उडवीत असतात. इंदिरा गांधींची हुकुमशाही अकरा वर्षे विनतक्रार सहन करणाऱ्या आणि श्रीमंत शेतकऱ्यांच्या पाठिंब्यावर आपल्या नेतृत्वाचा डोलारा टिकवून राहणाऱ्या मंडळींनी जनता पक्षाला प्रतिगामी म्हणावे हा शुद्ध विनोद आहे. तो विनोदी प्रयोग त्यांना वेळीअवेळी सादर करावा लागतो तो इंदिरा गांधींकडून नवा हल्ला होऊ नये म्हणून.

## स्वर्णसिंग काँग्रेसची भेदरलेली अवस्था

डॉ. जोशी म्हणतात की, स्वर्णसिंग काँग्रेसचे नेते आमच्या पक्षावर टीका करताना स्वतंत्र बुद्धीही दाखवीत नाहीत. इंदिरा गांधी काल जे म्हणाल्या त्याची हे लोक आज पुनरुक्ती करतात इतकेच. जनता पक्ष देश अमेरिकेला विकावयास निघाला आहे, भांडवलदारांचे प्रस्थ वाढत आहे आणि अराजक नि अशांतता यांचा उद्रेक होत आहे हे जनता पक्षावर आरोप करण्याचे इंदिरा गांधींचे तीन मुख्य मुद्दे. स्वर्णसिंग काँग्रेसच्या नेत्यांच्या मुखातून हाच रस गळत असतो. आपण काही तरी नवा शोध लावलेला आहे असा ते आवेश आणतात; पण तो सगळा खोटा आहे हे लगेच जाणवते. इंदिरा गांधींच्या पुनरागमनाची भीती जनता पक्षाला भेडसावीत नाही. त्या भयगंडाने बेजार झाले आहे ते स्वर्णसिंग काँग्रेसचे जीर्णशीर्ण नेतृत्व. कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या दोन राज्यांतून जवळजवळ अदृश्य झालेल्या आपल्या पक्षावर आणखी कोठे कोठे ही पाळी येणार आहे या शंकेने

स्वर्णसिंग काँग्रेस कासावीस झालेली दिसून येते.

जनता पक्षाजवळ स्वतःचा आर्थिक कार्यक्रम नाही या आक्षेपाचाही चर्चेच्या ओघामध्ये डॉ. जोशी समाचार घेतात. शेतीवर आणि ग्रामीण विकासावर सहाव्या योजनेमध्ये भर देण्याचा निर्धार, काँग्रेसने गेल्या पाच योजनांमध्ये स्वीकारलेल्या धोरणापेक्षा किती तरी वेगळा आणि भारतीय परिस्थितीच्या संदर्भात अत्यावश्यक असाच आहे. एकूण विकास खर्चापैकी चाळीस टक्के रक्कम ग्रामीण भागात खर्च करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे छोट्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचे धोरणही जनता पक्षाने जाहीर केले आहे. देशातील बहुसंख्य लोक रोजगाराच्या अभावी दारिद्र्यरेषेखाली जीवन व्यतीत करीत असताना रोजगारनिर्मितीला प्राधान्य देणारा आर्थिक कार्यक्रमच खरा पुरोगामी ठरतो. भावपातळी स्थिर राखून सर्वसामान्य जनतेला जीवन सुखावह व्हावे यासाठी जीवनावश्यक वस्तूंची सार्वजनिक क्षेत्रातील वितरणयंत्रणाही व्यापक करण्यात येत आहे. जे खाजगी क्षेत्रातील उद्योगधंदे व्यवस्थापकांच्या गैरकारभारामुळे बंद पडत आहेत वा नुकसानीत येत आहेत त्यांचा कारभार स्वतःच्या ताब्यात घ्यायला जनता सरकार हयगय करीत नाही हे कानपूर येथल्या स्वदेशी कापड-गिरणीवरून स्पष्ट झालेले आहे. काळाने अर्थशून्य ठरविलेल्या सैद्धान्तिक आणि भडक घोषणांचा आसरा घेऊन नंतर लोकांना निराश करण्याऐवजी जास्तीत जास्त जनसमूहाच्या हिताच्या दृष्टीने कोणता व्यवहार्य कार्यक्रम हाती घेणे शक्य आहे याचा विचार करून जनता सरकार आपले आर्थिक आणि औद्योगिक धोरण ठरवीत आहे. 'गरिबी हटाओ'चा नारा लावून बिर्ला उद्योग समूहाच्या धनसंचयात भर घालणाऱ्या सरकारपेक्षा, वास्तववादाच्या भूमिकेवर उभे राहून शेत-मजुरांसारख्या असंघटित ग्रामीण वर्गाकडे लक्ष पुरविण्याचा जनता सरकारचा कार्यक्रम अधिक कल्याणकारी आणि योग्य दिशेने वाटचाल सुरू झाल्याचा निदर्शक नाही काय, असा जनता पक्षाच्या आक्षेपकांना डॉ. जोशी सवाल विचारतात.

## अशांतता : राष्ट्रीय समस्या

अशांतता आणि हिंसाचार यांचा सर्वत्र उद्रेक होत आहे ही वस्तुस्थिती डॉ. जोशी नाकारीत नाहीत; परंतु हे प्रकार आताच एकदम सुरू झाले आहेत असे जे भासविले जात आहे ते खरे नाही, याचीही ते आठवण करून देतात. अगदी आणीबाणीच्या काळातही अशा प्रकारच्या घटना घडतच होत्या. वृत्तपत्रांवर त्या वेळी प्रसिद्धिपूर्व तपासणीचे बंधन असल्यामुळे त्यांना प्रसिद्धी मिळत नव्हती इतकेच काय ते. लहानसे निमित्त सापडताच, संघटित समाजगटांकडून हिंसेचा अवलंब व्हावा हे संकट सर्वच विकासशील देशांना भेडसावीत आहे. विद्यार्थी आणि औद्योगिक कामगार या आघाडीवर पुढे असतात. उत्तर भारतातील बरीचशी विद्यापीठे सध्या बंद पडली आहेत. नैनिताल जिल्ह्यातील पंतनगर येथल्या कृषि विद्यापीठातील वातावरण तर खूपच स्फोटक झालेले आहे. उत्तरप्रदेशापासून तामीळनाडूपर्यंत सगळीकडे निदर्शने आणि दंगली यांचे लोण पसरले आहे. या दंगलींना प्रोत्साहन दिल्याचा प्रत्येक पक्ष इतरांवर आरोप करीत आहे. लखनौ किंवा पाटणा येथे दंगल झाली की कायदा आणि सुव्यवस्था यांचे रक्षण करण्यात जनता पक्षाला अपयश येत आहे असा ओरडा करणारे पक्ष हैद्राबाद किंवा मदुराई येथील वातावरण पेटले की अस्वस्थ होतात. म्हणून राष्ट्रपतींनी सुचविल्याप्रमाणे सार्वजनिक अशांततेचा प्रश्न सर्व पक्षांनी एक महत्वाची राष्ट्रीय समस्या या दृष्टिकोनातून हाताळावा असे डॉ. जोशी आवर्जून प्रतिपादन करतात.

## इंदिरा गांधींचे निधीसंकलन

राष्ट्रपतींचे हे आवाहन स्वीकारण्याच्या मनःस्थितीत इंदिरा गांधी दिसत नाहीत. न्यायालयातील आपले आगमन आणि निर्गमन आपल्या जयजयकाराच्या घोषणांनी आणि धक्काबुक्कीने साजरे व्हावे असे त्यांना वाटत असते. शहा आयोगाचा अंतिम अहवाल चरणसिंगांच्या हातात पडण्यापूर्वी शक्यतोवर साऱ्या उत्तर भारतात आणि ते जमले नाही तर निदान दिल्लीत तरी अराजकसदृश वातावरण निर्माण व्हावे या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालू आहेत. येत्या २५ जूनला म्हणजे आणीबाणीच्या तिसऱ्या वर्धापनदिनी पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या निवासस्थानावर दहा लाख निदर्शकांचा मोर्चा नेण्याची त्या तयारी करीत आहेत. या एवढ्या विशाल निदर्शनासाठी खर्चही बराच येणार असल्यामुळे सध्या इंदिरा गांधींनी निधी जमविण्याची मोहीम हाती घेतली आहे. हा निधी म्हणजे स्वतःजवळचा काळा पैसा कायदेशीर करण्याचा त्यांचा प्रयत्न होय असे स्वर्णसिंग काँग्रेसचे प्रवक्ते सांगतात. आपल्या पक्षाच्या तिजोरीत खडखडाट असताना इंदिरा काँग्रेसची तिजोरी का फुगत चालली आहे यासंबंधीचे कारण देताना त्यांनी हा खुलासा केला आहे. म्हणून सार्वजनिक शांततारक्षणाच्या कोणत्याही प्रयत्नामध्ये इंदिरा गांधींकडून सहकार्य मिळणार नाही. उलट हा पट विसकटला कसा जाईल याचाच त्यांच्याकडून प्रयत्न होईल हे ध्यानात धरूनच केंद्रीय आणि राज्यपातळीवरील जनता सरकारांना आपल्या धोरणाचे स्वरूप निश्चित करावे लागणार आहे.

जनता सरकारला आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये लाभलेले यश हाही इंदिरा गांधी यांच्या संतापाचा विषय झालेला आहे. आपल्या या संतापाला सबबीचे स्वरूप देण्यासाठी त्या जनता सरकार देश विकायला निघालेला आहे अशी आवई उठवीत असतात; परंतु जनता पक्षाच्या राजवटीमध्ये भारताची आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विश्वासाहता वाढलेली आहे हे कोणालाच नाकारता येणार नाही. जनता सरकार अधिकारावर येताच भारत आणि रशिया यांच्यातील मैत्रीबंध तुटेल असे भाकित वर्तविणाऱ्यांच्या पदरी तर निराशाच आलेली आहे. अमेरिकेशी मैत्रीसंबंध प्रस्थापित करताना जनता सरकारने राष्ट्रीय हितसंबंधांना मुरड घातलेली नाही. फराक्का धरणाबाबत बांगला देशाशी आणि सलाल धरणाबाबत पाकिस्तानशी करार करून शेजारी राष्ट्रांबरोबरचे विवाद्य प्रश्न परस्पर-सहकार्याच्या भूमिकेवरून सोडविण्याची ग्वाही देण्यात आलेली आहे. नेपाळ, अफगाणिस्तान, व्हिएटनाम, इराण आदि देशांबरोबरचे संबंध पूर्वीपेक्षा किती तरी अधिक प्रमाणामध्ये दृढ झालेले आहेत. इस्रायलच्या विस्तारवादी धोरणासंबंधी आणि दक्षिण आफ्रिकेने नामिबियाबाबत स्वीकारलेल्या हटवादासंबंधी आपला विरोध प्रकट करताना जनता सरकारने आपले परराष्ट्रीय धोरण स्वतंत्र आणि नवमुक्त देशांना पाठिंबा देणारे आहे याचा प्रत्यय आणून दिला आहे.

डॉ. मुरलीमनोहर जोशी संसदीय जनता पक्षाचे पदाधिकारी असल्याने त्यांनी आपल्या पक्षाच्या जमेच्या बाजूवर विशेष भर द्यावा हे स्वाभाविक होते; परंतु जनता पक्षाच्या त्रुटींसंबंधीही ते बोलले. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर एखादी बाह्य शक्ती जनता पक्षाला आव्हान देऊ शकेल अशी सध्या तरी परिस्थिती नाही. खरे आव्हान आहे ते अंतर्गतच. घटक पक्षांनी परस्परांशी अधिकाधिक समरस झाल्याशिवाय या पक्षाला सामर्थ्य प्राप्त होणार नाही याविषयी घटक पक्षांपैकी कोणाचेच दुमत नाही; परंतु तरीही अपेक्षित सामरस्य निर्माण झालेले नाही. याबाबतीमध्ये कार्यकर्त्यांपेक्षा नेतेच अधिक दोषी ठरतात. पक्षबैठकीमध्ये त्यांनी आपले मतभेद व्यक्त केले तर कोणीच आक्षेप घेणार नाही; परंतु जाहीर स्वरूपाची वादावादी पक्षाच्या शक्तीवर जोराचा ओरखडा उमटवते. खरे म्हणजे, जनता पक्षाचा कारभार काँग्रेसी राजवटीशी तुलना करता किती तरी स्वच्छ आहे. काँग्रेसचा एकेक मंत्री म्हणजे स्वतंत्र संस्थान झाले होते आणि त्यांच्यापैकी काहीजणांनी भ्रष्टाचार शिगेला पोहोचविला होता. जनता सरकारच्या मंत्र्यांमध्ये वैयक्तिक आकांक्षापोटी टीके-प्रतिटीकेचे द्वंद्व झडत असले तरी आपल्या आर्थिक व्यवहारासंबंधी वा सार्वजनिक वर्तनासंबंधी आक्षेप घ्यायला त्यांनी अवसर दिलेला नाही. मधु दंडवते, जॉर्ज फर्नांडिस, अटलबिहारी बाजपेयी, रवींद्र वर्मा, लालकृष्ण अडवानी प्रभृतींच्या कारभारासंबंधी तटस्थ निरीक्षकही प्रशंसोद्गार काढतात. त्यांच्यापैकी कोणालाही पूर्वी प्रशासनाचा अनुभव नव्हता; परंतु आपापल्या खात्याच्या कामकाजाच्या स्वरूपाची आणि त्यातील बारकाव्यांची त्यांनी चांगली माहिती करून घेतली आहे. मुख्य म्हणजे सत्तारूढ झाल्यानंतर ही माणसे माजी काँग्रेसी राज्यकर्त्यांप्रमाणे अधिकारपदाच्या वैभवात बुडून गेलेली नाहीत. जुन्या मंत्र्याकडे जाताना मध्यस्थ लागत असे. जनता सरकारचे बहुसंख्य मंत्री अजून तरी लोकांपासून अलग पडलेले नाहीत.

विशिष्ट वृत्तपत्रांकडून, आपल्या हेतूचा वा बोलण्याचा विपर्यास करून केली जाणारी टीका त्यांना समजू शकते; परंतु पक्षातील व्यक्तींनीही तोच पवित्रा घ्यावा हे त्यांना खटकते. केंद्रीय संसदीय मंडळाच्या बैठकीत अटलबिहारी बाजपेयी आणि चरणसिंग यांनी नाराजी प्रकट केली ती त्यासंबंधी. मागच्या एका वार्तापत्रात म्हटल्याप्रमाणे ही अशी वैयक्तिक टीका करण्याचा प्रवृत्तीपासून जॉर्ज फर्नांडिस अलिप्त आहेत. म्हणून त्यांनी मोरारजीभाई, चरणसिंग आणि जगजीवनराम यांनी एकत्र बसून आपापसातील मतभेदांची चर्चा करावी अशी सूचना केली. त्या चर्चेमध्ये पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांना सहभागी करावे असे मोरारजीभाईंनी सुचविले तर अटलबिहारी बाजपेयी यांनाही निमंत्रित केले जावे असे चंद्रशेखर म्हणाले. त्यातूनच हे पाच वरिष्ठ नेते मोरारजीभाईंच्या निवासस्थानी जमले. त्या दिवशी जगजीवनरामांचा वाढदिवस होता. चरणसिंगांनी जगजीवनबाबूंच्या घरी जाऊन त्यांचे अभीष्टचिंतन केले. मध्यंतरी हे दोन सहकारी परस्परांशी बोलत नव्हते. हा अबोला केव्हा तरी सोडायला हवा असे दोघांनाही वाटत होते. वाढदिवसाच्या निमित्ताने हे घडून आले.

पाच नेत्यांच्या या पहिल्या बैठकीने जनता पक्षाच्या एकजुटीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. अर्थात् लगेचच मतभेदांचे आणि संशयाचे वातावरण निवळेल असे कोणीही मानीत नाही; परंतु जनता पक्षाच्या नेतृत्वाला कर्नालच्या पोटनिवडणुकीने नवी जाग आलेली आहे आणि एकी हेच बळ या सूत्राचे स्मरण झालेले आहे, असा दिलासा केवळ डॉ. मुरलीमनोहर जोशी यांनीच नव्हे तर इतर जनता पक्षीय संसदसदस्यांनीही दिला.

आपला पहिला वाढदिवस साजरा करताना आपण बराच पल्ला गाठला असे समाधान जनता पक्षाला व्यक्त करता येणार नाही; परंतु वर्षभरात काहीच साध्य झालेले नाही असा निराशेचा सूर काढणे चुकीचे ठरते. निवडणूक जाहीरनाम्यातील आश्वासनांची पूर्तता करण्याच्या दिशेने पावले पडत आहेत. त्यांची गती असावी तेवढी द्रुत नाही हीच काय ती खंत आहे. पहिले वर्ष निवडणुकांच्या धकाधकीत गेले. कोणतीही लाट टिकत नसते, त्याप्रमाणे जनता लाटही या कालावधीत विरून गेली आहे. लाटेवर आरूढ होण्याचे राजकारण फार काळ टिकत नाही याचा अनुभव अनेकांनी अनेकदा घेतलेला आहे. म्हणून इंदिरा गांधी यांच्या राजवटीने उद्ध्वस्त केलेल्या लोकशाहीची पुनर्स्थापना करीत असतानाच, समताधिष्ठित आणि सर्वधर्मसमभावी समाज निर्माण करण्याचे आव्हान जनता पक्षाला स्वीकारावयाचे आहे. त्या दृष्टीने त्याने आपल्या पहिल्या वर्षाच्या ताळेबंदाचे परिशीलन केले पाहिजे.

**समाप्त**


**तीन राजहंस प्रकाशने**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**फिडेल, चे आणि क्रांती**

अरुण साधू । सात रुपये

**आणि ड्रॅगन जागा झाला**

अरुण साधू । चवदा रुपये

**पूर्णिया**

अनिल अवचट । सहा रुपये

कथा

# सूर्यनेत्र

उल्हास देवधर

सूर्य माथ्यावर येऊ पहात होता. तमसा ( थेम्स ) नदीवरील धुक्याचा तपकिरी रंग बदलून ते आता चकाकत होतं. तमसेवरील धुक्याचं वैशिष्टय असं की, समोरील देखाव्याबद्दल मनात गोंधळ उडविण्याइतपत ते दाट असायचं; पण तो देखावा ते अदृश्य करू शकत नसे. अशा वेळी त्या दोघांनी वेस्ट मिन्स्टर ब्रिज पार केला. त्यांच्यापैकी एकजण बराच उंच होता व दुसरा तितकाच बुटबैंगण होता. त्या दुक्कलीचं आगमन एखाद्या सर्कशीतही हास्यप्रेरक ठरलं असतं. त्यांच्यातील उंच माणसाचं नाव होतं हर्क्युल फ्लँबो. होय. तोच हा फ्लँबो. 'गबाळग्रंथी फादर ब्राउन'च्या कथेतून आपल्या परिचयाचा झालेला. शिक्षा भोगल्यावर फादर ब्राउनना त्याचं मन वळविण्यात यश आल्यामुळं त्यानं चौर्यकर्म सोडून हा व्यवसाय पत्करला. 'चोराच्या वाटा चोराला ठाऊक' ह्या न्यायानं त्यानं लौकरच आपला जमही बसविला. ( पहा. 'सा. माणूस,' ऑगस्ट ४, १९७३)तो खाजगी गुप्तहेर (डिटेक्टिव्ह)असून वेस्ट मिन्स्टर ॲबेमधील एका नवीन इमारतीत त्याने आपल्या कचेरीकरिता जागा घेतली होती. तिथेच तो आता निघाला होता. त्याच्याबरोबर जाणाऱ्या त्या बुटबैंगण माणसाचं नाव होतं रेव्हरंड जे. ब्राउन. ते कँबरवेल येथील सेंट फ्रॅन्सिस चर्चचे असून आता एका इसमाच्या मृत्युशय्येवरूनच ते आलेले होते.

त्या इमारतीची आकाशवेधी उंची व अत्यंत कार्यक्षमतेने काम देणारी टेलिफोन व लिफ्टस्ची यंत्रणा यावर अमेरिकन शैलीची स्वच्छ छाप पडलेली होती; पण ती नुकतीच बांधून पूर्ण झालेली होती व तेथील नोकरवर्ग बराच अपुरा होता. आतापर्यंत केवळ तीनच भाडेकरूंनी जागा ताब्यात घेतल्या होत्या. पाचव्या मजल्यावर फ्लँबोची कचेरी होती. त्याच्या कचेरीच्या बरोबर खालची व बरोबर वरची जागा भरली होती. पहिले तीन व वरचे सातवे, आठवे मजले पूर्णतया रिकामे होते. अशा या इमारतीवर टाकलेल्या पहिल्या दृष्टिक्षेपात एक वेगळीच गोष्ट नजरेत भरत असे. ही गोष्ट म्हणजे एक माणसाच्या डोळ्याची अतिभव्य प्रतिकृति असून ती फ्लँबोच्या कचेरीच्या वरच्या मजल्यावरील जागेबाहेर उभारलेली होती. ती इतकी मोठी होती की तिने दोन–तीन खिडक्यांएवढी जागा व्यापली होती. ही प्रतिकृती सोनेरी रंगात बनविलेली होती.

'ते आहे तरी काय ?' फादर ब्राउननी विचारलं व ते स्तब्ध उभे राहिले.

'तो ? तो एक नवा पंथ आहे,' फ्लँबो हसत म्हणाला, 'पापाचं अस्तित्वच नाकारून त्यापासून मानवाची सुटका करू पहाणारे जे नवीन धर्म, पंथ आजकाल दिसतात, त्यातलाच हा एक. थोडंसं ख्रिश्चन शास्त्रासारखं झालं हे, नाही ? ते आजार बरा करण्यासाठी हीच पद्धत वापरतात. स्वत:ला केलॉन ( kalon ) म्हणविणाऱ्या एका सद्गृहस्थानं माझ्या वरची जागा घेतली असून माझ्या खालील जागेत दोन स्त्री – टाइपिस्ट आपला व्यवसाय चालवितात. तर हा केलॉन आता हे त्याचं खरं नाव आहे की नाही ते मला माहीत नाही– सूर्योपासक असून तो स्वत:ला सूर्यदेवतेचा आधुनिक पुजारी म्हणवितो.'

'त्याला म्हणावं काळजी घे!' फादर ब्राउन म्हणाले, 'सूर्य ही नेहेमीच सर्वांत कडक देवता होती; पण त्या प्रचंड डोळ्याचा– सूर्यनेत्राचा– अर्थ काय ?'

'माझ्या समजुतीप्रमाणे त्यांचा एक सिद्धान्त आहे,' फ्लँबो म्हणाला, 'की, आपलं मन अगदी स्थिर असेल तर आपण काहीही सहन करू शकतो. त्यांची दोन बोधचिन्हं आहेत. एक सूर्य व दुसरं म्हणजे उघडा डोळा. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे पूर्णतया आरोग्यसंपन्न असलेला मनुष्य सूर्याकडे टक लावून पाहू शकतो.'

'खरोखरच आरोग्यसंपन्न असलेला मनुष्य सूर्याकडे टक लावून बघायचा प्रयत्नच करणार नाही !' फादर ब्राउन म्हणाले.

'तर मला ह्या पंथाची एवढीच माहिती आहे,' फ्लँबो निष्काळजीपणाने म्हणाला. 'हो, आणि सर्व शारीरिक रोग बरे करण्याचा दावा तेही करतातच.'

'पण ते एक मानसिक (आध्यात्मिक ?) आजार बरा करू शकतात का ?'

'कुठचा बरं हा आजार ?' फ्लँबो मंदस्मित करीत म्हणाला. 'तो म्हणजे, आपलं सगळं आलबेल आहे असं समजणं.' फादर म्हणाले.

पण एकंदरीत फ्लँबोला वरच्या मजल्यावरील ह्या आवेशाच्या प्रदर्शनापेक्षा खालच्या मजल्यावरील कचेरीतील शांतपणा अधिक पसंत होता. तो दक्षिणेकडचा होता व स्वत:ला तो नास्तिक म्हणवीत असे. नवीन नवीन धर्मांबद्दल त्याला मुळीच उत्साह नसायचा; पण नवीन चेहेऱ्यांकडे त्याचं नेहेमी लक्ष असे; विशेषत: ते चेहरे सुंदर असत तेव्हा. खालच्या मजल्यावरील त्या दोन स्त्रिया सुंदर तर होत्याच; पण वैशिष्टयपूर्णही होत्या. त्या बहिणी असून दोघीही सावळ्या व सडपातळ होत्या. पैकी एक जरा उंच व जास्त आकर्षक, जास्त वेधक (स्ट्राइकिंग) होती. काही स्त्रियांची बाह्य आकृति (प्रोफाइल) नेहेमी विशेषत्वाने लक्षात राहते–एखाद्या शस्त्राचं धारदार पातं लक्षात रहावं तसं–त्यापैकी ती होती. नेहेमी औत्सुक्यानं भरलेली तिची आकृति गरुडाचा भास निर्माण करीत असे. तिच्या सर्व हालचाली झट की पट होत असत. तिचे डोळे पहाणाऱ्याला आश्चर्यचकित

करण्याइतके तेजस्वी होते; पण ते तेज हिऱ्याचं नसून पोलादाचं असे आणि तिचा ताठपणा तिच्या देखणेपणाला उणीव आणण्याइतका कडक होता. तिची धाकटी बहीण म्हणजे तिची सावलीच; पण लहान प्रमाणावर. अधिक सावळी, अधिक फिकट व त्या प्रमाणात कमी महत्त्व मिळणारी. त्यांचा पोशाख फॅशनेबल नसून व्यावसायिक स्वरूपाचा, काहीसा पुरुषीच असे. अशा स्त्रिया लंडनच्या कचेऱ्यांतून आढळत नसत असं नाही; पण ह्या बहिणींबद्दलची खरी वस्तुस्थितीच अधिक लक्ष देण्याजोगी होती.

कारण मोठी बहीण पॉलिन स्टॅसी ही अर्ध्या परगण्याची मालकीण असून तिची संपत्तीही बरीच होती. तिचं बाळपण किल्ले आणि बागबगीचे ह्यांच्यात गेलं होतं; पण एकाकी जीवन वेगळ्या आणि खडतर पद्धतीनं जगायचं असं ठरवून ती तेथून बाहेर पडली होती. अर्थात् तिनं आपला संपत्तीवरील हक्क सोडला नव्हता. असं करण्यात संन्यस्त वृत्ति किंवा अनाठायी साहस दिसलं असतं; पण तिला प्रिय असणाऱ्या व्यावहारिक आदर्शांशी (युटिलिटेरिॲनिझमशी) ते जुळणारं नव्हतं. त्या संपत्तीचा उपयोग ती समाजाला व्यावहारिक दृष्ट्या उपयोगी पडतील अशा गोष्टींसाठी करणार होती. त्यातला काही भाग स्वतःच्या बिझिनेससाठी-आधुनिक तत्त्वांवर चालविलेली टाइपराइटिंगची संस्था, तिच्यासाठी तिने वापरला होता. तसंच स्त्रियांनी स्वतःच्या हिंमतीवर चालविलेल्या अशाच उद्योगांसाठी काही भाग तिने देऊ केला होता. तिची धाकटी बहीण जोन हिला पॉलनची ही मतं कितपत पसंत होती हे नक्की सांगता येणार नाही; पण ती एखाद्या आज्ञाधारक कुत्र्याप्रमाणं आपल्या बहिणीच्या मागं मागं वावरत असे. पॉलिनच्या उसळत्या व्यक्तिमत्त्वाच्या पार्श्वभूमीवर तिचा हा शांतपणा विशेषच उठून दिसत असे. तिच्या दुर्दैवाचा सुद्धा यात काही भाग होता असं म्हणता येईल; पण पॉलिन स्टॅसी याच दुर्दैवाचं अस्तित्वच मानीत नसे.

फ्लॅंबोची व पॉलिनची पहिल्यांदा गाठ पडली तेव्हाच तिची तडफ व अधीरता ह्यांचं दर्शन त्याला झालं होतं व त्याला थोडी गंमतही वाटली होती. त्याचं असं झालं की, तळमजल्यावर तो लिफ्टमनची वाट पहात रेंगाळत उभा होता. तेवढ्यात ती तिथं आली. लिफ्टमन नसल्यानं आपली गैरसोय होऊ द्यायला तिनं स्पष्ट नकार दिला. फ्लॅंबोला लिफ्टमधे बोलावून तिने स्वतः ती सुरू केली. तिची जागा तिसऱ्या मजल्यावर असूनही तेवढ्या वेळात फ्लॅंबोला आपली खास विचारप्रणाली तिनं ऐकवलीच. ती एक आधुनिक स्त्री होती व आधुनिक यांत्रिक सुखसोयी किंवा करामती तिला प्रिय होत्या. तिच्या मते तिच्याप्रमाणं सर्वांनी या यंत्रांचं ज्ञान घेऊन त्यांच्यावर हुकुमत गाजविली पाहिजे. शेवटी फ्लॅंबोने तिच्यासाठी लिफ्टचं दार उघडलं ते तिला अगदी आवडलं नव्हतं. फ्लॅंबो आपल्या जागेत गेला तेव्हा तिच्या ह्या अतिरेकी स्वावलंबित्वाची आठवण होऊन तो स्वतःशीच हसला होता.

तिला कधीकधी संतापाचे उमाळेही येत असत व त्या वेळचे तिचे हातवारे विनाशाचे द्योतक असत. एकदा फ्लॅंबो त्यांच्या कचेरीत गेला तेव्हा आपल्या बहिणीचा चष्मा जमिनीवर फेकून मी त्याच्यावर अक्षरशः नाचत होती. चष्मा वापरणं म्हणजे आपल्या अगतिकत्वाची कबुलीच देणं आहे असं तिचं मत होतं. पुनः असल्या वस्तू तिथं न आणण्याची सक्त ताकीदच तिनं आपल्या बहिणीला देऊन टाकली. तिनं लाकडी पाय, खोटे केस व काचेचे डोळे वापरावे अशी कुणाची अपेक्षा होती काय असं उपरोधिक स्वरात विचारताना तिचे डोळे स्फटिकाप्रमाणं चकाकत होते.

ह्या उद्रेकामुळं भांबावून गेलेल्या फ्लॅंबोनं तरीही विचारलंच की लिफ्टमधे व चष्म्यामधे तसा फरक काय? दोन्हीमधे सारख्याच प्रमाणात अगतिकत्वाची कबुली दिसते. मग जर एका बाबतीत शास्त्राची मदत घ्यायला प्रत्यवाय नव्हता तर दुसऱ्या बाबतीत तरी तो का असावा?'

'त्या दोहांत किती तरी फरक आहे.' ती काहीश्या फणकाऱ्यानं म्हणाली होती, 'बॅटरी मोटर्स इ. यंत्रं ही मनुष्याच्या प्राणशक्तीचा प्रत्यय आणून देतात आणि अर्थात स्त्रीच्याही आम्ही स्त्रिया लौकरच काळाला आव्हान देणाऱ्या ह्या यंत्रावर हुकुमत गाजवू! ते खरं शास्त्र! पण हे चष्मे, ही पायाची प्लॅस्टरं ही जी डॉक्टर विकतात ती अशा भावनेनं की जणू काय आपण जन्मतःच दुबळे असतो, पण मी तशी नाही. मी जन्मतः स्वतंत्र आहे, मिस्टर फ्लॅंबो. लोकांना ह्या गोष्टी जरुरीच्या वाटतात. कारण त्यांना शिकवणच तशी असते, भीतीच्या माध्यमातून. शक्तीची, धैर्याची शिकवण दिलीच जात नाही. लहान मुलांना त्यांच्या आया सांगतात की, सूर्याकडे पाहू नका. परिणामतः डोळे मिचमिचे केल्याशिवाय ते क्षणभरही सूर्याकडे पाहू शकत नाहीत, पण इतर असंख्य तारे आहेत, तसा हा आणखी एक. मग मी त्याच्याकडे उघड्या डोळ्यांनी का पाहू नये? त्याला माझ्यावर मी हुकुमत गाजवू देणार नाही! मनाला येईल तेव्हा मी त्याच्याकडे टक लावून पहाणार!'

'तुझ्या डोळ्यातील तेजापुढं सूर्यही फिका पडेल!' फ्लॅंबो मान लववून अदबीनं म्हणाला. हे म्हणताना त्याला चांगलीच मौज वाटत होती. कारण ह्या अनपेक्षित स्तुतीमुळं ती बावरलेली त्याला दिसली. शिवाय आणखीही एक गोष्ट त्याच्या लक्षात येऊन चुकली, ती म्हणजे पॉलिनवर सूर्योपासक केलॉनचा प्रभाव पडला आहे. कारण केलॉनच्या पंथाबद्दल एरवी त्याला फार कमी माहिती असली तरी सूर्याकडे टक लावून पहाण्याचं त्याचं फॅड फ्लॅंबोला माहीत होतं.

त्याला लौकरच कळून चुकलं की केलॉन व पॉलिन ह्यांचे संबंध निकटचे असून दिवसागणिक ते अधिक घनिष्ठ होत होते. हा केलॉन नामक सद्गृहस्थ निदान शारीरिक बाबतीत तरी स्वतःला सूर्यदूत म्हणवून घ्यायला लायक होता. उंचीला तो निदान फ्लॅंबोएवढा नक्कीच होता. दिसायला बराच देखणा, सोनेरी दाढी, तेजस्वी निळे डोळे व सिंहाच्या आयाळीप्रमाणे मानेवर रुळणारे केस त्यामुळे तो मोठा शोभिवंत दिसे. याच्या जोडीला त्याच्यात अलौकिक बुद्धिमत्ता व अध्यात्मिकताही होती. त्याच्यात राजतेज व ब्राह्मतेज ह्यांचा अपूर्व संगम होता. त्या आधुनिक इमारतीत त्याने आपली कचेरी थाटली होती, एक कारकून कामावर ठेवला होता, स्वतःचं नावं पितळी पट्टीवर कोरलं होतं व आपल्या जागेबाहेर एखाद्या जाहिरातीप्रमाणे ती डोळ्याची प्रतिकृति उभारली होती. ह्या गोष्टींचा त्याच्या कीर्तीवर परिणाम होत नसे. त्याच्या सहवासात आलेल्या माणसाला त्याच्या मोठेपणाची जाणीव

झाल्याखेरीज रहात नसे. त्याच्या कचेरीतील औपचरिक पोशाखातही तो मोठा डौलदार दिसत असे व सूर्यवंदनेसाठी पांढरी शुभ्र वस्त्रं लेऊन व डोक्यास सोनेरी फेटा बांधून तो जेव्हा गच्चीत उभा राही तेव्हा रस्त्यानं जाणाऱ्या लोकांचं हास्य ओठातल्या ओठात विरत असे. दिवसातून तीन वेळा तो अशा प्रकारे सर्व वेस्ट मिन्स्टर ॲबेला साक्ष ठेवून सूर्यवंदना करीत असे. दिवस उजाडताना एकदा, मावळताना एकदा व एकदा भर माध्यान्ही. त्या दिवशी भर माध्यान्ही तो अशाच प्रकारे गच्चीत उभा असता फादर ब्राउन व फ्लॅंबो ह्यांनी त्याला पाहिला.

फ्लॅंबोने हे दृश्य आतापर्यंत अनेकदा पाहिलं असल्यानं तो मुळीच न थांबता इमारतीत शिरला सुद्धा. फादर ब्राउन मात्र ह्या दृश्याकडे थक्क होत्साते पहात राहिले. त्यात धार्मिक बाबतीत त्यांना असलेला रस कारण होता की अशा प्रसिद्धिलोलुपतेच्या मागील मानसशास्त्रात असलेला रस कारण होता हे नक्की सांगता येणार नाही. केलॉन ताठ उभा राहून आपल्या खड्या आवाजात खालपर्यंत ऐकू येणारी प्रार्थना म्हणत होता. त्याची अधीकाधिक प्रार्थना म्हणून झालेली दिसत होती. त्याचे डोळे एकटक सूर्याकडे लागलेले होते. त्याला त्या वेळी ह्या मर्त्यभूमीवरील काहीही वा कोणीही दिसत होतं की नाही कुणास ठाऊक, पण एक नक्की की डोळे मिचकावीत त्याच्याकडे खालून पहाणाऱ्या एका गोल चेहेऱ्याच्या फादरकडे त्याचं लक्ष गेलं असणं शक्य नव्हतं. त्या दोघांतला हा मोठाच फरक होता की फादर ब्राउनना डोळ्यांची उघडझाप केल्याशिवाय कशाकडेही बघता येत नसे तर केलॉन प्रत्यक्ष सूर्याकडे पापणी न हलवता बघू शकत होता.

त्याच्या प्रार्थनेतील सुर्यस्तुतीचे शब्द वातावरणात घुमत असतानाच रॉकेट सुटताना होतो तसा कर्कश आवाज, पाठोपाठ काही तरी जोरात आदळल्याचा आवाज व लगेच किंचाळ्या ऐकू येऊ लागल्या. पाच माणसं बाहेरून आत व तीन माणसं आतून बाहेर एकाच वेळी शिरू लागली व क्षणभर कोणालाच हलता येईना. काही तरी भयप्रद घडल्याची भावना वातावरणात तरंगत राहिली. ते नेमकं काय याची माहिती न झाल्याने ही भीति आणखीच वाढली होती. दोन व्यक्ति ह्या गोंधळात अविचलित राहिल्या. उंच गच्चीवरील तो भव्य पुजारी व खाली रस्त्यावरील तो कुरूप पाद्री.

अखेर प्रचंड ताकदीच्या व ताडमाड उंचीच्या फ्लॅंबोला आतून दरवाजाशी येण्यात यश मिळालं. त्या गोंधळातही आपला टिपेचा आवाज लावून त्यानं कोणाला तरी डॉक्टरला आणण्यास सांगितलं. तो पुनः आत जाण्यासाठी वळला तेव्हा फादर ब्राउनही त्याच्या मागोमाग आत गेले. गर्दीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत असतानाही त्यांना केलॉनचा मधुर पण जोमदार आवाज ऐकू येतच होता.

फ्लॅंबो व आणखी पाच-सहा जण लिफ्टच्या मार्गात डोकावून बघताना त्यांना आढळले; पण तिथे लिफ्ट आढळली नाही. तिथे दुसरीच एक वस्तू होती जी प्रत्यक्षात लिफ्टमधून यायला हवी होती.

गेली चार मिनिटं फ्लॅंबो त्याकडे टक लावून पहात होता. दुर्दैवाचं अस्तित्वच नाकारणाऱ्या त्या सुंदर स्त्रीचं रक्ताच्या थारोळ्यात पडलेलं शरीर पहात असता ती पॉलिन स्टॅंसी असल्याबद्दल जशी त्याला शंका नव्हती तद्वतच ती जिवंत नसल्याबद्दलही नव्हती.

आपल्याला ती आवडली होती का नव्हती हे त्याच्या लक्षात येत नव्हतं. तिच्या व्यक्तिमत्त्वात आवडण्याइतक्याच नावडण्यासारख्याही गोष्टी होत्या. ते काही असलं तरी एक जिवंत व्यक्तिमत्त्व म्हणून ती त्याच्या डोळ्यांसमोर होती. त्यामुळेच समोरील छिन्नविछिन्न देहाकृतीकडे त्याला पाहवत नव्हतं. मृत्यूबद्दलचं एक कटु सत्य त्याला जाणवलं ते असं की, पॉलिनचा सुंदर चेहेरा व तिचं ठसक्यातलं बोलणं याची त्याला आता विशेषत्वानं जाणीव झाली. क्षणार्धात ते सुंदर व्यक्तिमत्त्व मृत्यूच्या गर्तेत गेलं होतं. ती आत्महत्या होती काय? पण छे, पॉलिनसारखी आशावादी व्यक्ति आत्महत्या करणं शक्य नाही. मग काय तो खून होता? पण ह्या जवळजवळ निर्मनुष्य इमारतीत तिचा खून करायला होतं कोण? अचानक त्यानं जोरात विचारलं की, केलॉन कुठं आहे? प्रत्यक्षात त्याचे शब्द फारच हळू उच्चारले गेले होते. त्याला उत्तर मिळालं एका शांत; जड आवाजात की केलॉन गेली पंधरा मिनिटं त्याच्या जागेवरील गच्चीत नेहमीप्रमाणं सूर्यवंदना करीत होता. तो आवाज ओळखून व फादर ब्राउननी त्याच्या खांद्यावर ठेवलेल्या हाताच्या स्पर्शानं वळून पहात फ्लॅंबोनं विचारलं.

'तर मग, जर केलॉन गच्चीवर होता, तर हे कृत्य कुणी केलं असेल ?

'कदाचित् वर जाऊन आपण ते शोधून काढू शकू. पोलिसांना यायला अजून अर्धा तास तरी लागेल,' फादर म्हणाले.

त्या अफाट संपत्तीच्या वारस स्त्रीचा मृतदेह डॉक्टरांच्या ताब्यात सोडून फ्लॅंबो पायऱ्यांवरून उड्या मारीतच प्रथम त्याच्या टायपिंग संस्थेत गेला. ती रिकामी पाहून वर आपल्या स्वतःच्या कचेरीत गेला. तेथून परतला तेव्हा त्याचा चेहेरा पांढराफटक पडला होता.

'तिची बहीण बहुधा बाहेर कुठे तरी फिरायला गेलेली दिसते,' तो काहीशा नाखुशीनेच म्हणाला.

फादर ब्राउननी मान हलवली, 'किंवा ती कदाचित् त्या सूर्योपासकाच्या कचेरीत गेली असेल. मी तुझ्या जागी असतो तर त्याची खात्री करून घेतली असती. नंतर आपण तुझ्या कचेरीत बसून ह्याची उकल करू. 'अंहं,' ते एकाएकी म्हणाले, 'ह्या बाबतीत किती वेळा तीच चूक मी करणार आहे? अर्थातच त्यांच्या कचेरीत जाऊ आपण.'

फ्लॅंबोनं त्यांच्याकडे रोखून पाहिलं; पण तरीही त्यांच्याबरोबर तो स्टॅंसी-भगिनींच्या जागेत गेलाच. तिथे फादर ब्राउननी एक लाल रंगाची खुर्ची निवडली व ते दाराशीच अशा प्रकारे बसले की, जेणेकरून त्यांना जिन्यावरील व आजूबाजूच्या सर्व हालचाली दिसाव्यात. त्यांना फार वेळ वाट पहावी लागली नाही. चार-पाच मिनिटांतच तीन व्यक्ती जिन्यानं खाली आल्या. चेहेऱ्यावरील गांभीर्य हेच त्यांच्यात साम्य होतं. पहिली होती जोन स्टॅंसी, मृत स्त्रीची बहीण–म्हणजे नक्कीच ती वरच्या मजल्यावरील जागेत होती. दुसरी व्यक्ती म्हणजे खुद्द सूर्योपासक केलॉनच होती. त्याच्या पांढऱ्या वस्त्रात तो भव्य दिसत होता व ख्रिस्ताचा भास निर्माण करीत होता. तिसरा होता फ्लॅंबो. भुवया वक्र व मनात बराचसा गोंधळ ह्यांसह.

जोन स्टॅंसीचा चेहरा ओढलेला दिसत होता व तिच्या केसांना अकाली पांढुरकी झाक आलेली दिसत होती. ती आली ती सरळ आपल्या टेबलाशी गेली व आपले कागदपत्र तिनं एका झटक्यात ठाकठीक केले. ह्या तिच्या कृतीमुळं सगळे भानावर आले. जोन जर ह्या प्रकरणात गुन्हेगार असलीच तर ती थंड वृत्तीची गुन्हेगार होती. तिच्याकडे काही वेळ बघत असता फादर ब्राउन ह्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळंच हास्य होतं. मग तिच्याकडे पहात असतानाच ते दुसऱ्यालाच उद्देशून म्हणाले :

'प्रेषित,' ते म्हणाले, उघडपणेच केलॉनला उद्देशून, 'तुमच्या धर्माबद्दल मला बऱ्याच गोष्टी जाणून घ्यायच्या आहेत.'

'मला आनंदच होईल.' केलॉन मान लववून म्हणाला, 'पण मुद्दा किंवा उद्देश माझ्या लक्षात आला नाही.'

'का? ते सरळ आहे नाही का?' स्वतःच गोंधळात पडल्याप्रमाणे दाखवत फादर ब्राउन म्हणाले. 'आता बघा, एखादा माणूस चुकीचं तत्त्वज्ञान उराशी बाळगून असेल तर तो आपण त्याचा दोष मानतो; पण त्याचं अंतःकरण शुद्ध असू शकेल, नाही का? अशा माणसाला आपल्या व्यक्तिमत्त्वानं भारावून टाकून मग चुकीचं तत्त्वज्ञान त्याच्या गळी उतरवणाऱ्या व्यक्तीला आपण काय म्हणू? आता असं सांगा; तुमच्या मते खुनाचं कृत्य गर्हणीय असतं की नाही?'

'हा माझ्यावर आरोप करण्यात येत आहे काय?' केलॉननं अति शांतपणे विचारलं.

'नाही,' तितक्याच हळुवारपणे फादर ब्राउन म्हणाले. 'हे तर मी बचावाचं भाषण केलं.'

फादर ब्राउन ह्यांच्या उद्गारातील उपरोधाच्या तीव्रतेनं काही वेळ तिथं एक चमत्कारिक शांतता पसरली. मग तो सूर्यदेवतेचा प्रेषित हळूहळू उठून उभा राहिला. ते दृश्य सूर्योदयाइतकंच भव्य होतं. त्याच्या तेजानं व प्राणशक्तीनं ती खोली अशी काही भरून गेली की, मनात आणल्यास तो ते संपूर्ण शहर व्यापून टाकील असं वाटावं. त्याच्या भव्यतेपुढं फादर ब्राउन अगदीच खुजे वाटू लागले. जणू सूर्यावरील डागच!

'आपले मार्ग अखेर एकत्र मिळतातच,' केलॉन म्हणाला. 'तुमचं चर्च व माझा धर्म ह्या दोन गोष्टीच विश्वातील वास्तवता होत. मी सूर्याची उपासना करतो तर तुम्ही सूर्यास्ताची. तुम्ही मृत्युशय्येवरील मानवांची सोबत करता तर मी जीवनाची सोबत करतो. तुम्ही आता माझ्याबद्दल जो संशय व्यक्त केलात तो तुमच्या व्यवसायाला धरूनच आहे. लोकांकडून गुन्ह्यांची कबुली मिळविणारे गुप्तहेरच तुम्ही. तुम्ही लोकांवर गुन्ह्यांचे आरोप शाबीत करू पहाता तर मी त्यांचं निर्दोषित्व. तुम्ही त्यांच्यावर पापाचा शिक्का मारता तर मी त्यांना सद्गुणांचा ताम्रपट बहाल करतो.

'तुमचे बिनबुडाचे आरोप मी इतस्ततः उधळून लावण्याआधी आणखी एक गोष्ट ऐका. हे आरोप तुम्ही सिद्ध करू शकलात वा नाही ह्याबद्दल मला अगदी यत्किंचितही पर्वा नाही हे तुम्ही समजूही शकणार नाही. दुष्कीर्ती किंवा अगदी फासाचा दोर ह्यांना मी एखाद्या मोठ्या माणसानं लहान मुलाच्या खेळण्यांना मानावं तसं तुच्छ मानतो. तुम्ही म्हणालात की तुम्ही बचावाचं भाषण करीत होतात; पण ह्या मोहमयी भ्रामक विश्वाबद्दल मला इतकी अनासक्ति आहे की मीच तुम्हाला उलट फिर्यादीचं भाषण ऐकवितो. ह्या प्रकरणी फक्त एकच गोष्ट माझ्या विरुद्ध सांगितली जाऊ शकेल व ती मी स्वतःच सांगतो. मृत स्त्री ही माझी प्रेयसी व वाग्दत्त वधू होती. आमचं विश्व वेगळंच होतं. ह्या भाकड जगाचे नीतिनियम त्याला लागू नव्हते. तुमचे पोलिस मानणारच की काल जिथं प्रेम होतं तिथं आज ना उद्या द्वेष निर्माण होणारच. तेव्हा फिर्यादीच्या बाजूचा हा पहिला मुद्दा झाला; पण दुसरा मुद्दा अधिक सबळ आहे व त्यामुळं तुम्ही घेतलेली बचावाची भूमिका कोलमडून पडते. पॉलिनचं माझ्यावर प्रेम होतं हे तर खरंच; शिवाय हेही खरं आहे की आजच सकाळी मृत्यूपूर्वी एका मृत्युपत्रान्वये तिनं मला व माझ्या धर्मासाठी म्हणून पाच लक्ष पौंड देऊ केले आहेत. झालं समाधान? आणा पाहू तुमच्या बेड्या; पण त्याची मला पर्वा आहे असं तुम्ही समजता? तुरुंगवास म्हणजे मला तिच्यासाठी एखाद्या आडगावच्या स्थानकावर वाट पहात रहाण्याप्रमाणं आहे, तर फाशी म्हणजे एखाद्या वेगवान मोटारीतून तिच्या भेटीला जाण्याप्रमाणं!

त्याच्या बोलण्यात दुसऱ्याचा बुद्धिभेद करील अशी हुकुमत होती. फ्लँबो व जोन स्टॅंसी त्याच्याकडे कौतुकमिश्रित आदरानं बघतच राहिले. फादर ब्राउन ह्यांच्या चेहऱ्यावर तीव्र दुःखाची वेदना दिसत होती. त्यांनी मोठ्या दुःखानं आपली नजर जमिनीकडे वळविली. कपाटाशी रेलून उभे रहात केलॉननं आपलं भाषण पुढं चालू केलं.

'काही थोड्या शब्दांत मी माझ्या विरुद्ध जाऊ शकणारे सर्व मुद्दे स्पष्ट केले. त्याहूनही थोड्या शब्दांत मी त्या मुद्द्यांतला पोकळपणा आता उघड करतो. हा गुन्हा मी केला की नाही ह्याबद्दलचं सत्य एकाच वाक्यात सांगता येईल. ते म्हणजे मी हा गुन्हा करूच शकलो नसतो. पॉलिन स्टॅंसी ह्या मजल्यावरून खाली पडली ती बारा वाजून पाच मिनिटांनी. उलट बारा वाजण्यापूर्वी काही सेकंद ते थेट सव्वाबारापर्यंत मी वर गच्चीवर माझी नित्यनैमित्तिक उपासना करीत होतो ह्याला शेकडो लोक साक्षी आहेत. माझा कारकून (हा एक सालस तरुण असून त्याचं माझ्याशी कसलंच नातं वगैरे नाही.) शपथेवर सांगेल की तो सकाळी सर्व वेळ माझ्या बाहेरील खोलीत बसून होता व तेवढ्या वेळात माझं पॉलिनशी काहीच बोलणंचालणं झालं नाही. तो शपथेवर असंही सांगेल की मी बाराला संपूर्ण दहा मिनिटं कमी असताना तिथे गेलो, अपघाताआधी पंधरा मिनिटं आणि त्या काळात मी कचेरी सोडून कुठेही गेलो नाही. इतका परिपूर्ण पुरावा कुणालाही आजपर्यंत मिळाला नसेल. अर्ध्या वेस्ट मिन्स्टरला मी साक्षीला बोलवू शकेन. तेव्हा त्या हातकड्या तुम्ही आता बाजूस ठेवाल तर बरं. माझं निर्दोषित्व सिद्ध झालं आहे.

'पण एवढ्यानं भागत नाही. ह्या पोरकट आरोपाचा अंशही शिल्लक राहू नये म्हणून म्हणून मी तुम्हाला हवी असलेली सर्व माहिती आता सांगणार आहे. माझ्या दुर्दैवी मैत्रिणीचा मृत्यू कसा ओढवला हे मला वाटतं मला माहीत आहे. तुम्ही कदाचित मला किंवा माझ्या श्रद्धांना, तत्त्वज्ञानाला त्याबद्दल दोष देऊ शकाल; पण मला कोठडीत डांबू शकणार नाही. अध्यात्माच्या सर्व विद्यार्थ्यांना हे माहीतच आहे की भूतकाळात निदान काही व्यक्तींनी स्वतःला हवेत तरंगत ठेव-

ण्याची शक्ती (लेव्हिटेशन) प्राप्त करून घेतली होती. पंचमहाभूतांवर ताबा मिळविण्याच्या आमच्या ध्येयाचा तो निव्वळ एक भाग आहे. बिचारी पॉलिन काहीशी उतावळ्या स्वभावाची व फारच महत्त्वाकांक्षी होती. सत्य सांगायचं तर आपली या मार्गात बरीच प्रगती झाली आहे अशी तिची समजूत झाली होती. लिफ्टमधून खाली जाताना ती बऱ्याचदा मला असं म्हणाल्याचं आठवतं की, आपली इच्छाशक्ति जर पुरेशी तीव्र असेल तर एखाद्या पिसाप्रमाणे आपण तरंगत खाली जाऊ शकू. मला खात्रीपूर्वक वाटतं की मनाच्या एका हर्षोन्मादित अवस्थेत आज तिनं तो चमत्कार प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला; पण तिची इच्छाशक्ती किंवा श्रद्धा शेवटच्या क्षणी कमी पडली असणार व परिणामतः निम्नस्तरावरील भौतिक नियमांनी आपला सूड उगविला. ही ह्या दुर्दैवी प्रकरणीची साद्यंत हकिगत झाली महाशय, आणि तुम्हाला माझ्यावर हेत्वारोप किंवा दुष्टपणाचा आरोप करण्याची इच्छा झाली तरी ह्यात कुठचाच गुन्हा नाही व माझ्याशी त्याचा संबंध जोडता येणार नाही. पोलिसांच्या भाषेत तुम्ही ह्या घटनेला आत्महत्या म्हणू शकाल; पण मी त्याला आधिभौतिक शास्त्राच्या प्रगतीसाठी केलेलं एक अयशस्वी साहस म्हणेन!'

फादर ब्राउन ह्यांच्यावर कुणी मात केल्याचं पाहण्याची फ्लँबोची ही पहिलीच वेळ होती. ह्या अपयशाची लज्जा वाटत असल्यामुळं की काय आपला दुःखी चेहेरा त्यांनी अजूनही वर केला नव्हता. आपल्या व्यवसायोद्भव सवयीनुसार ज्याच्या-त्याच्याबद्दल संशय घेणाऱ्या व्यक्तीवर नैसर्गिक स्वातंत्र्य व आरोग्य ह्यांनी संपन्न अशा एका निर्मळ व्यक्तीवर मिळविलेल्या विजयाची केलॉनच्या शब्दांतून व्यक्त झालेली भावना त्या सर्वांच्या मनातून अजून गेली नव्हती. अखेर डोळे किलेकिले करीत, अतीव वेदनेच्या सुरात फादर ब्राउन म्हणाले, 'तसं असेल तर मग तुम्ही आता आणखी काहीही करण्याची गरज नाही. तो मृत्युपत्राचा कागद घेऊन तुम्ही जाऊ शकता. त्या दुर्दैवी स्त्रीनं तो कुठे ठेवला असेल बरं?'

'मला वाटतं तो दाराजवळील तिच्या टेबलावर असेल!' केलॉन निष्पापपणे म्हणाला. हा निष्पापपणा त्याला पूर्णतया शोभून दिसत होता.

'आपण आज सकाळी ते लिहून टाकणार आहोत असं तिनं मला स्वतःहूनच सांगितलं होतं आणि लिफ्टनं माझ्या कचेरीत जाताना मी प्रत्यक्षच तिला लिहिताना पाहिलं होतं.'

'ह्या जागेचं दार त्या वेळी उघडं होतं काय?' फादरनी खाली चटईकडं पाहातच विचारलं.

'हो', केलॉननं शांतपणे उत्तर दिलं.

'आणि तेव्हापासून ते सतत उघडंच राहिलेलं आहे', फादर म्हणाले व त्यांनी चटईचं आपलं निरीक्षण पुढं चालू केलं.

'हा इथं एक कागद आहे म्हा', थंड वृत्तीची मिस् जोन एका वेगळ्याच सुरात म्हणाली. ती आपल्या बहिणीच्या टेबलाशी गेली होती व तिच्या हातात एक निळा अख्खा कागद दिसत होता. तिच्या चेहऱ्यावरील विचित्र हास्य ह्या परिस्थितीशी विसंगत होतं व फ्लँबोनं तिच्याकडं भुवया उंचावून पाहिलं.

आपली निरिच्छ वृत्ती योग्यपणे वागवीत केलॉन त्या कागदापासून दूरच राहिला; पण फ्लँबोनं तो जोनच्या हातातून घेतला व मोठ्या विस्मयानं तो वाचू लागला. त्याची सुरुवात खरोखरच नेहमीच्या मृत्युपत्राच्या धर्तीवरच झाली होती; पण 'माझी सर्व मालमत्ता मी देऊ करते' ह्या शब्दांनंतर पुढं काही ओरखड्यांखेरीज काहीच नव्हतं. कुणाला देऊ करणार त्याच्या नावाचा उल्लेख कुठंच आढळत नव्हता. मोठ्या आश्चर्यानं फ्लँबोनं तो कागद आपल्या मित्राला देऊ केला. त्यांनी त्यावर एक नजर टाकली व काहीएक न बोलता त्या प्रेषिताच्या हातात तो दिला.

पुढच्याच क्षणी केलॉन दोन टांगांमधलं अंतर पार करून जोन स्टॅसीपुढं उभा राहिला व आपले निळे डोळे तिच्यावर रोखून म्हणाला,

'ह्या काय मर्कटचेष्टा तू चालविल्या आहेस?' तो ओरडला. 'पॉलिननं एवढाच मजकूर लिहिला असणं शक्य नाही.'

त्याचा हा वेगळाच कर्कश स्वर ऐकून ते थक्कच झाले. त्याची आदब व भाषेवरील प्रभुत्व जणू त्याला सोडून गेलं होतं.

'तिच्या टेबलावर हा एकुलता एकच कागद आहे', आव्हानात्मक स्वरात जोन म्हणाली. तिच्या चेहऱ्यावरील विचित्र स्मित तसंच कायम होतं.

एकाएकी तो सद्गृहस्थ शिवीगाळ करू लागला, अर्वाच्य शब्द वापरू लागला. त्याचा पावित्र्याचा मुखवटा अशा प्रकारं गळून पडताना पाहून त्यांना धक्का बसला.

'हे बघ', शिव्या देऊन थकल्यावर आपल्या अमेरिकन स्वरात तो म्हणाला, 'मी कदाचित सामान्यांहून वेगळा असेन; पण तू मात्र एक खुनी आहेस. सभ्य गृहस्थहो, ऐका, पॉलिनच्या मृत्यूच्या स्पष्टीकरणासाठी हवेत तरंगण्याच्या सिद्धान्ताची जरूर नाही. बिचारी पॉलिन माझ्यानावे मृत्युपत्र तयार करीत असताना तिची ही दुष्ट बहीण तिथे येते, तिच्या हातून पेन हिसकावून घेते. मग तिला ढकलीत ती लिफ्टमार्गाशी नेते व तिला खाली ढकलून देते. मला वाटतं आपल्याला हातकड्यांची जरुरी अखेर भासणार तर!

'तुम्ही स्वतःच ग्वाही दिल्याप्रमाणे तुमचा कारकून हा खरोखरच एक जबाबदार तरुण मनुष्य आहे व त्याला न्यायालयात घ्यायच्या शपथेच्या गांभीर्याची पूर्ण जाणीव आहे.'




जोनच्या शांतपणात सदभिरुची दिसत नव्हती. 'तो कुठल्याही न्यायालयात शपथेवर सांगेल की, माझी बहीण पडली त्याच्या पाच मिनिटं नंतरपर्यंत मी तुमच्या कचेरीत काही टायपिंगचं काम करीत होते. मि. फ्लँबो सांगतीलच की त्यांना मी तिथं आढळले.'

ह्यावर तिथं एक आगळीच शांतता पसरली.

'मग काय', फ्लँबो मोठ्यानं म्हणाला, 'पडते वेळी पॉलिन एकटी होती, म्हणजे ही आत्महत्या झाली.'

'पडते वेळी ती एकटी होती', फादर ब्राउन म्हणाले, 'पण ती आत्महत्या नव्हती!'

'तर मग तिचा मृत्यू कसा घडला असावा?' फ्लँबो अधिरेपणे म्हणाला.

'तिचा खून करण्यात आला!'

'पण ती तर अगदी एकटी एक होती', फ्लँबोनं शंका व्यक्त केली.

'ती अगदी एकटी असतानाच तिचा खून करण्यात आला!' फादरनी उत्तर दिलं.

बाकी सर्वजण त्यांच्याकडे पाहातच राहिले पण ते त्याच निराश मनस्थितीत बसून राहिले. त्यांच्या कपाळावरील आठी तसेच चेहऱ्यावरील लज्जामिश्रित दुःख स्पष्ट दिसत होतं. त्यांचा आवाज जड व जोषहीन होता.

'मला एवढंच जाणून घ्यायचंय', केलॉन शपथपूर्वक म्हणाला की, 'पॉलिनच्या ह्या दुष्ट बहिणीला अटक करण्यासाठी पोलीस कधी येणार आहेत? तिनं खुद्द आपल्या स्वतःच्या बहिणीचा खून केला आणि माझ्या अगदी हातात आलेले पाच लाख पौंड माझ्यापासून हिरावून घेतले.'

'अहो, प्रेषित', फ्लँबो मधेच उपरोधिक स्वरात म्हणाला,

'हे विश्व म्हणजे तर भ्रम आहे, लक्षात असू द्या!'

सूर्यपूजकांच्या त्या धर्मगुरूनं पुन्हा आपली मगाचची उंची गाठण्याचा प्रयत्न केला. 'हा निव्वळ पैशांचा प्रश्न नाही,' तो आकांतानं म्हणाला, 'अर्थात पैशांचे व्यावहारिक उपयोग आहेतच; पण इथं माझ्यावर प्रेम करणाऱ्या स्त्रीच्या इच्छेचा प्रश्न आहे. तिला हे एक पवित्र कार्यासमान होतं. पॉलिनच्या नजरेत–'

फादर ब्राउन एकाएकी इतक्या झटक्यानं उभे राहिले की त्यांची खुर्ची मागच्या मागं पडली. त्यांच्या चेहऱ्यावर मृत्युकळा दिसत होती तरी त्यांना अचानक आशेचा किरण दिसला असावा. त्यांच्या डोळ्यांत त्यांचं प्रतिबिंब पडलं होतं.

'अगदी बरोबर,' ते स्पष्ट शब्दात म्हणाले. 'तिथूनच सुरुवात केली पाहिजे. पॉलिनच्या नजरेत–'

तो भव्य पुरुष त्या खुज्या पाद्र्यापुढं दोन पावलं मागं सरला. 'तुम्हाला काय म्हणायचंय? तुमची छाती कशी होते?' तो पुनःपुनः म्हणत राहिला.

'पॉलिनच्या नजरेत–' फादर पुनः म्हणाले. त्यांचे स्वतःचे डोळे आता अधिकच चकाकत होते. 'पुढं बोला. परमेशाला स्मरून पुढं बोला. कितीही वाईट कृत्य असलं तरी त्याची कबुली दिल्यावर मनाला हलकं-हलकं वाटू लागतं. तुम्ही कबुलीजबाब द्यावा अशी माझी विनंती आहे. बोला, बोला–पॉलिनच्या नजरेत–'

'मला जाऊ दे, खलपुरुषा!' केलॉननं आरोळी ठोकली. जाळ्यात अडकलेल्या प्रचंड प्राण्याप्रमाणं त्यानं धडपड केली. 'माझ्या हालचालींवर चोरून नजर ठेवून मला जाळ्यात पकडायचा तुम्हाला काय अधिकार? तुम्ही तर एक क्षुद्र हेर आहात. जाऊ दे मला!'

'मी त्यांना अडवू काय?' दरवाजाकडं धावत जात फ्लँबोनं विचारलं.

'नाही, त्यांना जाऊ दे!' फादर ब्राउन म्हणाले व त्यांनी एक दीर्घ उसासा सोडला. तो जणू विश्वगर्भातून आल्याप्रमाणं वाटला. 'त्यांना जाऊ दे. कारण तेही देवाचं लेकरू आहेत!'

केलॉन गेल्यावर तिथं एक दीर्घ शांतता पसरली आणि मनात एक प्रश्नमालिकाच उभी राहिल्यानं फ्लँबो तिचा भंग करायला अगदी उतावीळ झाला होता. कु. जॉन स्टॅसीनं मात्र थंडपणे आपले कागदपत्र ठाकठीक केले!

'फादर,' अखेर फ्लँबो म्हणाला, 'केवळ उत्सुकतेपोटी नव्हे तर कर्तव्य म्हणून, शक्य असल्यास, हा गुन्हा कुणी केला ते शोधून काढणं मला भाग आहे!'

'कोणता गुन्हा?' फादर ब्राउननी विचारलं.

'सध्या आपल्या समोर आहे तोच; अर्थात्.'

'सध्या आपल्या समोर दोन गुन्हे आहेत,' फादर म्हणाले, 'अगदी भिन्न दर्जाचे व भिन्न व्यक्तींनी केलेलं.'

आपले कागद आवरून झाल्यावर जोन स्टॅसी आपल्या टेबलाच्या खणाला कुलूप लावू लागली. तिनं फादर ब्राउन ह्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. त्यांनीही तिच्याकडं तसंच दुर्लक्ष करून आपलं बोलणं चालू ठेवलं.

'दोन्ही गुन्हे मृत व्यक्तींच्या पैशासाठी केले गेले. दोन्हीतही तिच्या त्याच एका दुर्बलतेचा फायदा घेण्यात आला. त्यापैकी मोठ्या स्वरूपाचा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीनं पराजित केलं. लहान स्वरूपाचा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला पैशाचा लाभ झाला.'

'कृपा करून व्याख्यान देऊ नका बुवा!' फ्लँबो अगतिकतेनं म्हणाला. 'थोडक्या शब्दांत सांगा ना सारं.'

'मी ते एकाच शब्दांत सांगू शकेन,' फादर म्हणाले.

मिस जोन स्टॅसीनं एका छोट्या आरश्यात पाहून आपली काळी हॅट डोक्यावर बसविली आणि इकडे ह्या दोघांचं बोलणं चालू असताना मुळीच घाई न करता ती खोलीबाहेर पडली.

'सत्य एका शब्दात सांगता येईल व तेही मोठासा लांबलचक नाही,' फादर ब्राउन म्हणाले. 'पॉलिन स्टॅसी आंधळी होती!'

'आंधळी!' फ्लँबोनं पुनरुच्चार केला व तो हळूहळू उठून उभा राहिला.

'तिचे डोळे जन्मतःच आनुवंशिकतेने अधू होते,' फादर पुढं बोलू लागले. 'तिच्या बहिणीला चष्मा वापरायचा होता, पॉलिननं ते चालू दिलं असतं तर. पण तिचं एक वेड होतं. की अशानं त्या आजाराला आपण विनाकारण मोठं स्वरूप देतो. आपल्याला अंधुक दिसतं हे ती एक तर कबूलच करायची नाही वा त्यासाठी आपल्या इच्छाशक्तीचा उपयोग करायची. अशा ताणामुळं तिचे डोळे आणखीच बिघडत गेले; पण खरा ताण अजून पडायचाच होता. ती वेळ ह्या प्रेषितामुळं आली. त्यानं तिला मध्यान्हीच्या सूर्याकडे उघड्या डोळ्यांनी टक लावून पहा-

ण्याची शिकवण दिली. त्याद्वारे सूर्याची शक्ती आपल्या शरीरात शिरते असं त्यानं तिला सांगितलं असणार. अरेरे, ह्या आजकालच्या नवमतवाद्यांना जुन्या मतांची थोडीशी ओळख असती तर किती बरं झालं असतं. जुन्या मतानुसार निसर्गदेवतांचं उघडया डोळ्यांनी पूजन करणं योग्य नसतं. त्यांना माहीत होतं की, सूर्यनेत्राच्या प्रभेनं डोळे खाक होऊ शकतात.'

काहीक्षण थांबून त्यांनी पुन: काहीशी अडखळत सुरुवात केली. 'त्या खलपुरुषानं तिला जाणूनबुजून आंधळी केली की नाही हे सांगता येणार नाही; पण त्या आंधळेपणाचा उपयोग करून त्यानं हेतुपूर्वक तिचा खून केला ह्यात शंका नाही. सर्व काही इतक्या सहजगत्या केलंगेलं की त्यामुळं माझ्या पोटात मळमळून येतंय. तुला माहितीच आहे की लिफ्टमनसाठी न थांबता ती दोघं लिफ्टचा स्वत:च वापर करीत असत. ह्या लिफ्ट्स् किती हळुवारपणं, आवाज न करता वरखाली जातात हेही तुला माहीत आहे. केलॉननं वरून ह्या मजल्यावर लिफ्ट आणली व उघडया दारातून पाहिलं की त्याला वचन दिल्याप्रमाणे मी *सावकाशपणे आपलं मृत्युपत्र लिहीत आहे.* त्यानं मोठ्या उत्साहानं तिला ओरडून सांगितलं की, आपण तिच्या साठी लिफ्ट तयार ठेवीत आहोत व तिची तयारी झाल्यावर तिनं निघून यावं. मग एक बटन दाबून बिलकुल आवाज न होता तो लिफ्टनं वर गेला. गच्चीत गेला व त्याच्या कचेरीतून तो हजारो लोकांच्या साक्षीने आपल्या वैमानिक प्रार्थनेत दंग झाला. इकडे ही गरीब बिचारी मुलगी, आपलं काम संपल्यावर बाहेर वाट बघणाऱ्या आपल्या प्रियकराकडे व लिफ्टकडे धावली व तिनं पाऊल–'

'थांबा, पुढे बोलू नका!' फ्लँबो ओरडला.

'ते एक बटन दाबून त्याला पाच लाख पौंड खरोखरच मिळाले असते,' फादर ब्राउन अशा गुन्ह्यांबाबत नेहेमीच बोलत त्या सत्त्वहीन आवाजात म्हणाले. 'पण त्याच्या त्या स्वप्नाचा पचका झाला. कारण आणखी एका व्यक्तीला त्या पैशांबाबत आसक्ती होती व त्या व्यक्तीला सुद्धा पॉलिनच्या डोळ्यांबाबतचं रहस्य माहीत होतं. त्या मृत्युपत्राबाबतची एक गोष्ट कुणाच्या लक्षात आलेली दिसत नाही. ते मृत्युपत्र जरी अर्धवट असलं व त्यावर पॉलिनची सही नसली तरी साक्षीदार म्हणून जोन स्टॅसी व त्यांची कुणी नोकर ह्यांच्या सह्या त्यावर अगोदरच झालेल्या होत्या. वास्तविक मृत्युपत्र लिहून झाल्यावरच साक्षीदारांच्या सह्या होतात; पण अशा क्षुल्लक बाबींना आपण महत्त्व देत नाही असं सांगून जोननं साक्षीच्या सह्या आधी करविल्या व पॉलिननं मग केव्हाही प्रत्यक्ष मृत्युपत्र पुरं करावं असं तिला सांगितलं. ह्याचाच अर्थ ते मृत्युपत्र लिहिलं जात असता प्रत्यक्ष साक्षीदार (क्र. २) तिथं हजर असू नये अशी जोनची इच्छा होती हे उघड होतं. कारण काय? मी पॉलिनच्या अंधत्वाची शक्यता विचारात घेतली व माझी खात्री पटली की पॉलिननं एकांतात सही करावी अशी जोनची इच्छा असण्याचं कारण तिला पॉलिननं सही करायलाच नको होती.

स्टॅसी भगिनी लिहायला फाउंटन पेन वापरीत असत. सवय व इच्छाशक्तीच्या जोरावर पॉलिन स्टॅसी दृष्टि असलेल्या माणसाइतक्या सफाईने लिहू शकत असे; पण पेनमधली शाई संपली हे तिला कळू शकत नसे. म्हणून तिची पेनं (वेगवेगळ्या शाईची) जोन स्टॅसी भरीत असे. ह्या वेळी फक्त तिनं हे पेन काळजीपूर्वक 'न' भरण्याची काळजी घेतली. परिणामी अवशिष्ट शाईनं पहिली *एक दोन वाक्यं लिहिली गेली व पुढं नुसतेच ओरखडे उठले. त्याचबरोबर त्या प्रेषितानं* पाच लाख पौंड गमविले व एक निर्दय व वैशिष्टयपूर्ण खून करूनही त्याच्या हाती काहीच लागलं नाही!'

पोलिस त्या वेळी जिना चढून येत होते. ते बघून फ्लँबो फादर ब्राउन ह्यांच्याकडे पहात म्हणाला, 'केवळ दहा मिनिटात गुन्हा केलॉनशी नेऊन भिडविण्यात तुम्ही गुन्ह्याची पुनर्उभारणी अगदी अचूक केलीत असंच म्हटलं पाहिजे!'

फादर ब्राउन दचकल्याप्रमाणं वाटले.

'केलॉनशी? नाही. जोन स्टॅसी व फाउंटन पेन ह्यांचं रहस्य उलगडण्यासाठी मला थोडे श्रम घ्यावे लागले. पण केलॉन ह्या बाबतीत गुन्हेगार होता हे मला इथं पाऊल टाकण्यापूर्वीच माहीत होतं!'

'तुम्ही चेष्टा करताहात,' फ्लँबो म्हणाला

'मी मनापासून सांगतोय,' फादर म्हणाले. 'हे कृत्य कोणतं हे माहीत होण्यापूर्वीच त्यानी ते केलं आहे हे मला माहीत होतं.'

'पण कसं काय?'

'हे निरिच्छ स्थितप्रज्ञ असतात ना त्यांचा मोठेपणाच त्यांच्या नाशाला कारणीभूत होतो. एवढा मोठा आपटल्याचा आवाज व किंकाळी खालून ऐकू आली पण हा प्रेषित दचकलाही नाही वा त्यानं सभोवार पाहिलंही नाही. काय घडलंय ते मला माहीत नव्हतं, पण मला *खात्री होती की तो ते अपेक्षित होता!'* □


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | |
|---|---|
| १. अरेबियन नाइटस्-खंड ६ वा – अनु. गौरी देशपांडे | रु. ५०/– |
| २. खुल्लम खुल्ला – ('मी हा असा आहे' चा ३ रा भाग) – प्र. वा. जोग – | " १०/– |
| ३. पश्चिमेचे पुत्र – (तेरा पाश्चात्य धुरंधुर लेखकांची व्यक्तिचित्रे) – रवींद्र पिंगे | " १४/– |
| ४. पुणेरी – (लेख) – श्री. ज. जोशी | " १५/– |
| ५. अदृश्य साक्षीदार – (कादंबरी) – जयंत ग. देवकुळे | " १२/– |
| ६. आवेश विरुद्ध अत्रे – (लेख) – संपादक – पु. भा. भावे | " १८/– |
| ७. वणवा – (कादंबरी) – भाऊ पाध्ये | " १६/– |
| ८. केळ – (कादंबरी) – योगिनी जोगळेकर | " १८/– |
| ९. कस्तुरी मृग – (नाटक) – वसंत कानेटकर | " ८/– |
| १०. माणसाची रूपं – (कादंबरी) – यशपाल, अनु: वा. रा. कांत | " १०-५० |

● महाग पुस्तके विकत घेण्याऐवजी एखादी चांगली लायब्ररी लावा.
● नॉन मेंबर्सना डेली बेसिसवर पुस्तके वाचवयास मिळतात.
● *'फिनीक्स' एक आगळे, वेगळे वाचनालय!*

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

पुस्तके

# उत्खनन

## खोलवर ढवळून टाकणाऱ्या कविता

सर्वसाधारणतः कुठल्याही दलित कवीच्या कवितासंग्रहात एक प्रकारचा प्रातिनिधिक आशय असतो आणि तो बहुधा विषण्ण करून टाकणाऱ्या वेदनेचा किंवा स्थिर नैराश्याचा असतो. ह्या नैराश्य किंवा वेदनेची कारणं अर्थातच वेगवेगळी असू शकतात. (व्यावहारिक पद्धतीनंच होणारं प्रेम, मध्यमवर्गीयांचं नेतृत्व–त्यामुळं येणारं परावलंबन किंवा अनुभवावर नकळत होणारे उपरे संस्कार, उच्चभ्रूंची खोटी सांस्कृतिक आस्था ह्या त्यातील काही सर्वसामान्य छटा.) त्या सर्वांचं 'उत्खनन' प्रा. केशव मेश्राम यांनी केलेलं आहे आणि ते अत्यंत प्रभावी तर आहेच, ('भाषा' हा त्यातील एक मोठा घटक आहे.) पण मुख्य म्हणजे वाचकाला मुळापासून धक्का देणारं, खोलवर ढवळून टाकणारं आहे आणि हे अर्थातच जास्त महत्त्वाचं! आपण जी क्रांती–ज्या पद्धतीने करतो आहोत तीही 'व्याज-क्रांती' आहे–हे क्रांतिकारकत्व घोषणा, फलक, जयजयकार, आरोळ्या यांवाचून अन्य काहीही करण्यास असमर्थ आहे. (कारण ते मार्ग, ती पद्धतही मध्यमवर्गीयच. कारण मिळणारं शिक्षण पांढरपेशांचे!) हे परखड सत्यही मेश्रामांनी स्वीकारलं आहे. ही 'झाडे' नाहीत, 'विनमुळाची फोफावलेली झुडपे' आहेत–पण तीच 'आकर्षक' आहेत. ह्या आकर्षकत्वाची किंचितही ओढ मेश्रामांना नाही म्हणूनच या कविता कसलेही 'आलाप', 'विलाप' किंवा 'जाहीरनामे' होत नाहीत. 'उत्खनना'चे हे सर्वांत मोठं वैशिष्ट्य!

'गोंधळतात संस्कार,
अडखळते सभ्यता',
'भांबावतात सुधारणा,
ठेचाळतात रस्ते'

'आत्ता...आत्ताशा थोडे वाचतात. मुलगे लिहितात' अशी ही वस्ती आहे. ('आमच्या वस्तीत') इथे वाट्याला आलेले भोग भोगण्यापलीकडे आणखी काही असूच शकत नाही. सुखदुःखांसहित जळणं हेच तुमचं आकलन! कारण हे खोडच असं आहे–'सुकलेल्या अवघ्याच ढलप्या आतून हिरव्या असूनही, ढलपी-ढलपीत कळवळतो आम्ही जळतो'... ('आम्ही जळतो') मेश्रामांच्या प्रतिमा अर्थपूर्ण असतात–त्या आशयाशी पूर्ण एकरूप झालेल्या असतात. ('गर्दीतल्या भेटीगाठी' किंवा 'काळोख फुलांचा', 'पाखरे', 'हे गल्ल्यांचे शहर' अशा किती कविता सांगाव्यात!) हे जळणे जन्मापासूनच वाट्याला आलेले–इच्छा–अनिच्छांचा प्रश्नच उद्भवत नाही. टीचभर जागेत वावरताना ठेचा लागणारच. त्यांची दुखरी वेदना 'सवयीनं' कमी-कमी होत जाते तरीही 'मेणबत्तीच्या संबुद्ध प्रकाशात' भविष्य बघण्याची, न्याहाळण्याची ताकद, इथल्या अर्धपोटी, ओबडधोबड माणसात आहे. कारण

'दगडी कोळशासारखी खरबरीत,
ही मिचकट माणसे
पेटतात...तडतडतात तेव्हा मस्त होतात
जास्वंदी गजबजाव्या काटेरी कुंपणावर
तशी उमलतात अनेक अंगांनी'
(ही ओबडधोबड माणसे)

जो काही सामाजिक अन्याय झालेला आहे–होतो आहे त्याची विलक्षण चीड व्यक्त करणारी ही कविता आहे. किंबहुना 'शरणागता'चं हे घुसमटणं मेश्रामांना फार खोलवर जाऊन भिडलेलं आहे ह्याची साक्ष त्यांची कुठलीही कविता देईल. म्हणूनच त्यात ऊर-बडवेपणा किंवा आक्रस्ताळेपणाचा लवलेशही नाही.

'पावसाच्या पिरपिरीसारखी मनाची ठसठस उंचवट्यावर राहणाऱ्या तुम्हा साऱ्या भाऊसाहेबांना कळेल का?'

'बंद खिडकीआडून तुम्ही भोगता स्वप्नासारखा
सरींचा सुरेल सोहळा कुमारच्या रेकॉर्डसोबत ('खिडकीबाहेर') घरात राहून, खिडकीबाहेरच्या अनंत आकाशात झेप घेणाऱ्या 'पाखरां'ची स्तुती (माफक!) करणारे लोक आपण! म्हणूनच 'यांची जाळी रंगीबेरंगी, सापळे कसबदार कधी लावतात गळाला प्रसिद्धी, भाकरीचा तुकडा-असा इशारा मेश्राम देतात आणि पांढरपेशांचे सांस्कृतिक, सामाजिक जाणिवांचे तकलादू वर्ख अक्षरशः ओरवाडून काढतात. जगात जगायचं असेल तर हा 'सौदा' करावाच लागणार. (आवाज नको.) गेंड्याची कातडी धारण करणाऱ्यांना काय बोचणार? (आणि उदात्तीकरणं तैय्यार असतात.) म्हणून मग 'घुसळीत रात्रीचे दुखरे खांदे' वागवीत 'गर्दीतल्या भेटीगाठी' सहज उरकण्यात (निर्विकार कोरेपणानं) शक्य तितकं हुश्शार होणं हे कमवायचं! आणि ह्या 'गल्ल्यांच्या शहरात' नेहमीप्रमाणे 'अजूनही' जपलेल्या अज्ञात वृक्षाच्या आठवणी शक्य तितक्या लवकर विसरून जायच्या; पण हे नाहीच जमलं तर? कुठल्या कपारीचा आधार घेऊन वर चढायचं?

तेव्हा मग 'माउलीची कूस' बनून शब्द जवळ घेतात.

'ऋणाईत मी शब्दांनाच सर्वस्वाने ओलीस जातो.'

प्रारब्धाच्या प्रकाशधारात ऋणाईत गाणे गातो 'ऋणाईत वेदने'चं 'गाणं' होतं ते या शब्दसख्यांमुळं! पण हे शब्द तरी कुठून आले? तेही जाणवतं आहे. 'ह्या ओळी तुमचीच देणी' हे नाकारलेलं नाही. (मी प्रथम जे म्हटलं आहे की, शिक्षण मध्यमवर्गीयांचं, त्यामुळं स्वप्नं मध्यमवर्गीय त्याचा संबंध 'मी–माझे मागणे'शी आहे.) 'शब्द मोडके–तोडके, माझे माझेच उरावे' हेच एकमेव मागणं–निदान त्यावर तरी इतर कोणी हक्क सांगू शकत नाही – पण हेच शब्द वापरून भावनांचे गर्द मळे शिपणारेही असतातच. हे मुखवटे कसे ओळखणार?

'शब्द माळतात भरगच्च केसांवर, मौल्यवान कोटांवर अन् साधतात मोठेपणाचो संधी, त्यांना काय सांगावे ?' 'शब्द ज्यांचे लिबलिबीत ओल्या बोंबलासारखे ते वाळवतात इतरांचीही आर्त ओली मने.' ('मुखवटे') चिरंतन अतृप्तिप्राप्तीसाठी मनचंद्रावरील नाजूक भावांचे अस्थिर खडक खोदणारा, हरवलेल्या स्वप्नलाटा उसळू देणारा आणि तिचा-खास तिचाच एकटीचा परवलीचा शब्द उरापोटी घट्ट धरून जपणारा हा कवी आहे. 'रानगौरे'चा हा स्नेहबंध 'ताठ मानेच्या एका'ला जागवतो आहे; पण हेही काही क्षणांपुरतंच !' चाळण झालेल्या या माझ्या ठिगळी मनाला, माझ्याशिवाय दुसरं आहे तरी कोण ? मणका ठणकतो, धडधडते,...ऐकणार कोण ? दुसरे आहे तरी कोण ?...माझ्याशिवाय ह्या व्यथेचा स्वर कमी-अधिक तीव्रतेने सर्वच कवितांतून लागलेला आहे. तक्रार करणं हेही चूकच ! कारण तक्रार करून आपण सुरक्षितता मिळवू-मागू बघत असतो. ह्याचीही मेश्रामांना जाणीव आहे. काही तुरळक अपवाद सोडले तर, अशा चढ्या सुरातल्या तक्रारी आणि बंडखोरीचा आभास या संग्रहात दिसत नाही. म्हणूनच शरणागताचं हे गाऱ्हाणं नित्य असूनही नूतन होतं, उदबत्तीच्या घमघमाटात भरल्या पोटानं भावविव्हळ चर्चा करणाऱ्या आपल्यासारख्यांना त्याची दखल घ्यावीशी वाटते किंवा नाही हाच खरा प्रश्न आहे. ( की 'मूड खराब होतो?')

बाकी आपल्या अवशेषांचं उत्खनन करण्याची ताकद आपण केव्हाच गमाविलेली आहे.

'चव्हाट्यावर' चाललेल्या ह्या पोळलेल्याच्या 'मैफली'त 'जरा जपूनच' प्रवेश करणारे आपण !

'झिजते आयुष्य बुटाच्या तळव्यासारखे
फ्यूज उडाल्यासारखी खचतात क्षणांची बाळे'

ह्याच्यावर कुठले भाष्य आपण करणार ? किंवा !

करा उलटापालटा सोला खुशाल कातडी
येता जाता घाला शिव्या
मस्त उडवा रेवडी' ('विस्मरण')

हे सगळं आपल्याला कितपत अस्वस्थ करतं ? की घामासोकळ, भयाणभोर, स्वस्त धुंद, कुंदधूसर यांचेच विश्लेषण आपण करणार आहोत ? डोळ्यांतील तिरस्काराची धार कुरवाळणारा हा कवी आहे.

'माझ्या भूमिकेवर माझी निष्ठा आहे.
जितका आहे द्वेष तुमच्या डोळ्यांत माझ्याविषयी.'

ह्या तळपत्या निष्ठेला, रान पेटवून देण्याची ताकद असणाऱ्या आवाजाकडे आता फार काळ दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण मेश्रामांनीच एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे

'खिडकीबाहेर 'पावसाला जोर' वाढतोच आहे.'

— रेखा इनामदार

'उत्खनन' ( काव्य० )
केशव मेश्राम
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
पृष्ठे ८८, कि. ८ रु.

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# सूर्यास्त

## एक बेशरम बुलडोझर आणि एक वादळी म्हातारा यांची मरणझुंज

'सूर्यास्त' हे श्री. जयवंत दळवी यांचं नवं नाटक मला बऱ्यापैकी आवडलेलं आहे, हे प्रथमच लिहून टाकतो. अर्थात याचा अर्थ मला त्याची स्तुती करायची आहे, असा होऊ नये. कारण या नाटकाच्या मर्यादा मला जरूर जाणवलेल्या आहेत. नाटक बिलकुल न आवडलेले कितीएक सहप्रेक्षक मला भेटलेले आहेत आणि त्यांच्या आक्षेपांचाही विचार मी पुढे करणार आहेच. 'सूर्यास्त' हे अमुक कालाखंडातलं सर्वोत्कृष्ट नाटक आहे वगैरेसारखं बोगस Categorical विधान करण्याची माझी इच्छा नाही. तथापि अलीकडच्या काळात निदान वर्ष-दीड वर्षात तरी 'सूर्यास्त'च्या दर्जाची नाटकं एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच आलेली आहेत असं मी म्हटलं, तर तो अन्य कुणावर अन्याय ठरणार नाही अशी माझी खात्री आहे.

'सूर्यास्त' हे दर्शनी स्वरूपातच उघड-उघड एक राजकीय नाटक आहे. ही जात मराठी नाट्यसृष्टीत गुलबकावलीच्या फुला-इतकीच दुर्मिळ, या विधानाला पुराव्याची गरज भासू नये. आपल्याकडे 'तीन अंकी स्वतंत्र सामाजिक नाटक' या ठरीव लेबलखाली लिहिली जाणारी नाटकं ही बहुधा प्रत्यक्षात फक्त तीन अंकी असतात एवढेच काय ते. ती स्वतंत्र तर नसतातच, पण सामाजिकही नसतात. अशा परिस्थितीत स्वतंत्र प्रतिभेने लिहिलेली राजकीय नाटके औषधालाही सापडू नयेत, यात नवल नाही. 'मी एक मुख्यमंत्री' सारखी Pseudo-Political नाटकेच काय ती समोर येतात. 'मी मंत्री झालो!' 'भाऊ मुरारराव' ही अशीच इतर काही उदाहरणे. असले मुख्यमंत्री लोकप्रिय होत नाहीत हे सुदैवच, पण त्यामुळेही मराठी नाटककार संपूर्णतः राजकीय विषयांना हात का घालीत नाहीत हे कोडे सुटत नाही. यात त्यांची कुवत आड येते, की राजकारणात त्यांना पुरेसे नाट्य दिसत-गवसत नाही, की नाट्यनिर्मात्यांची बंधने पडतात, की आमचे लेखक अशी राजकीय बांधिलकी आपल्या स्वतंत्र बाण्यामुळे नाकारतात, हे कळायला मार्ग नाही. तशातच गेल्या वर्ष-दीड वर्षात आमच्या मराठी रंगभूमीवर समस्त मराठी नाट्यरसिकांचे रंजलेगांजलेपण हटविण्यासाठी त्यांनी फक्त रस्त्यात मस्त करमणूकच पुरविण्याचे धाऊक कंत्राट घेतलेले दिसते. त्यामुळे साहजिकच रडारडसंपन्न कौटुंबिक नाट्यप्रयोगांची सद्दी संपून अमुक मिनिटांत तमुक हशाचे बॉंबगोळे फोडण्याची हमी देणारे तथाकथित विनोदी नाट्याविष्कार डझनाच्या भावात पाहण्याचे नशिबी आलेलें आहे. अशा परिस्थितीत गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत राजकीय रंगमंचावर जे विलक्षण रुद्रभीषण

सुखान्त नाटच अल्ल्या देशाने पाहिले, त्याच्या रंगभूमिविषयक अनुकूलतेकडे मराठी नाटकवाल्यांचे लक्ष जावेच असा हट्ट आम्ही कसा बरे धरावा ? धरला तरी तो पुरवायला लागणारे बळ आमचे करमणूककर्ते कुठून आणणार ? साहजिकच दुर्गाबाईंच्या, राजकारणापासून साहित्य दूर नेण्याच्या आवाहनाचा सोयिस्कर *अर्थ लावून मराठी नाटक* पुन्हा एकदा विशुद्ध कलात्मक पातळीवर ठेवण्यात आम्ही यशस्वी झालो.

## कोंडी फोडली

माझ्या या टीकेचा रोख, आणीबाणी-(इत्यादी) बद्दल डझनावारी पुस्तके निघताहेत तशी नाटके निघायला हवी होती असा नाही. मात्र श्री. जयवंत दळवींनी मराठी नाटकातली ही कोंडी फोडली आहे आणि यशस्वीरीत्या फोडली आहे याचे महत्त्व लक्षात घ्यायला हवे. एक व्यावसायिक नाटक म्हणून 'सूर्यास्त' चांगलेच यशस्वी झालेले आहे, याची नोंदही आमच्या निर्मात्यांनी घ्यायलाच हवी. दळवींना या विषयावर लिहायचा अधिकार तर जरूर होता. त्यांनीही, 'राजकीय संदर्भ दिलेले नाटक' वगैरे लिहिण्याची फसवणूक न करता पुरेशा गांभीर्याने एक पूर्ण राजकीय कथानक उभे केले आहे. या प्रयत्नाच्या गुणावगुणांची चर्चा पुढे येईलच. राजकीयतेच्या घट्टपणाचाही प्रश्न उद्भवेल. तथापि हे नाटक प्रामाणिकपणे (व व्यावसायिकपणेही) राजकीयच असल्याचे नाकारता येणार नाही, आणि हे माझ्या मते महत्त्वाचे आहे. विशेषतः 'मी एक मुख्यमंत्री' सारखे एका बऱ्यापैकी (व राजकीय) कथाकल्पनेचा हलगर्जीपणाच्या हाताळणीमुळे चुथडा करणारे एक तिसऱ्या दर्जाचे सुमार फार्सिकल नाटक 'सूर्यास्त'च्या थोडेसेच आधी पाहिलेले असल्यामुळे Political play, Character play व ट्रॅजेडी या तिन्हींची potentials असलेले कथानक, हे तिन्ही मार्ग चुकवून कसे भलत्याच आडरस्त्याला जाऊ शकते याचा भीषण प्रत्यय आला होता. त्या पार्श्वभूमीवर 'सूर्यास्त' खूपच भरीव बांधेसूद व end directed वाटले.

१९७७ च्या दीपावली दिवाळी अंकात श्री. दळवींनीच लिहिलेल्या याच नावाच्या एका कादंबरीवर 'सूर्यास्त' आधारित आहे. अर्थात अनेक वाचकांना ही कादंबरी कंटाळवाणी वाटली होती, त्यामानाने नाटक खूपच सरस वाटले. ( नाटक आधी लिहिले गेले की कादंबरी याबद्दल विद्वानांत मतभेद असल्याचेही समजते. काहींच्या मते नाटक लवकर रंगभूमीवर येण्यासारखे नसल्याने दळवींनी त्याची कादंबरी करून टाकली. खरेखोटे *ठणठणपाळ जाणे.* ) *आणीबाणीद्वारे लादल्या* जाणाऱ्या हुकुमशाहीविरुद्ध एका छोट्या व्यक्तीने अखेरपर्यंत दिलेली एकाकी झुंज ही आहे 'सूर्यास्त'ची कथाकल्पना. अप्पाजी ही ती व्यक्ती. हे जुने स्वातंत्र्यसैनिक, निष्ठावंत गांधीवादी, कट्टर तत्त्वनिष्ठ आणि आपाततः राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे पिताजी. हुकुमशाहीला विरोध करण्याची अप्पाजींची सतत धडपड, त्यामुळे अठ्ठावीस मजली इमारतीच्या शेवटच्या वगैरे मजल्यावरच्या एका अलिशान फ्लॅटमध्ये मुख्यमंत्र्यांनी त्यांना जवळजवळ नजरकैदेत ठेवलेलं. मुख्यमंत्र्यांची आई जनाबाई आणि मुलगा बाबुराव हेही अप्पाजींच्या कारवायांच्या विरुद्ध. शिवाय संतराम नावाचा मुख्यमंत्र्यांचा एक श्रेष्ठ पापकर्मा हस्तक शेजारच्याच फ्लॅटमध्ये रहायला आहे. बाबुराव आणि संतराम संगनमतानं धंदा— ऊर्फ भ्रष्टाचार— करतात. त्यात संतराम आपल्या सुस्वरूप सुनेलाही वापरायला कमी करीत नाही. ती असहाय, कारण तिचा नवरा लाल्या खुशालचेंडू. संतरामच्या जिवावर—पैशावर मजा मारणारा. संतरामचा गायकवाड नावाचा पी. ए. किंवा तत्सम काही तरी. हा गायकवाड मात्र अप्पाजींना मानणारा. त्यांच्या विश्वासातला. असाच आणखी एकजण म्हणजे भाऊराव. राज्याचा अर्थमंत्री आणि मुख्यमंत्र्यांचा प्रतिस्पर्धी नं. १.

तर परिस्थिती अशी शिजून—तापून पक्की झालेली. आणीबाणीच्या घोषणेची ठिणगी पडते आणि संघर्ष उसळतो. अप्पाजी घरातून पळून जातात आणि सार्वजनिक ठिकाणी आणीबाणीविरोधी प्रचार सुरू करतात. त्यांना पकडून पुन्हा घरी आणलं जातं, तेव्हा 'निवडणुका नको, भाकरी हवी' मोहीम राबविणाऱ्या आपल्या मुलाची ते झडझडून निर्भर्त्सना करतात. अर्धअधिक आयुष्य ब्रिटिशांच्या तुरुंगात पिचत काढलेल्या आणि नेहरूंच्या मांडीला मांडी लावून बसू शकणाऱ्या या म्हाताऱ्याचा वादळी बेडरपणा अद्याप अबाधितच आहे; पण मुख्यमंत्र्यांच्या स्थानालाच याचा धोका आहे, त्यामुळे नजरकैदेचे पाश जास्त आवळले जातात तसतशी अप्पाजींची तडफड आणि धडपड वाढते. आपल्याला कळू शकणाऱ्या पण सेन्सॉरशिपमुळे दडपल्या जाणाऱ्या बातम्या पोलिस—वृत्तपत्रे—लोकप्रतिनिधींकडे पोचवायचा असफल प्रयत्न होतो. भाऊरावांना पदत्याग करून आणीबाणीविरोधात उभं राह्यची प्रेरणा अप्पाजी देतात; पण भाऊराव लगेचच एका 'अपघातात' ठार होतात. ज्या गायकवाडच्या बहिणीला संतरामच्या भावानं नासवलं होतं आणि ज्याच्या बापाला संतरामच्या बापानं जिवंत जाळून मारलं होतं, त्या गायकवाडला बंडखोरी करायला लावणंही अशक्य ठरतं. कारण संतरामबद्दल आता तो कृतज्ञ आहे. आपल्या पोटाच्या बदल्यात. दरम्यान अन्याय, अत्याचार आणि भ्रष्टाचाराची बेसुमार पैदास चालू होते. गेंडासिग नावाचा कुणी एक प्रभावशाली दिल्लीदूत ( हे पात्र रंगमंचावर न आणण्याचा अभिनंदनीय संयमी सुज्ञपणा दळवींनी दाखविला आहे. ) लाचबाजीचे सात कोटी रुपये + संतरामजींची सून बगलेत मारून बदल्यात मुख्यमंत्र्यांची खुर्ची बळकट करतो. सैरभैर झालेल्या लाल्यालाच अप्पाजी त्याच्या बापाविरुद्ध आणि आपल्या पोराविरुद्ध उठवितात. त्यानं गुपचूप सायक्लोस्टाइल करून आणलेली पत्रकं; पण एवढ्यानं भागेलसं दिसत नाही. अप्पाजीच्या खिडकीतनं दिसणारी झोपडपट्टी उद्ध्वस्त करणारा बुलडोझर सत्तेच्या उन्मादानं बेशरम बनून सर्वस्व उद्ध्वस्त करीत पुढेपुढेच सरकत राहणार हे उघड झाल्यावर भन्नाटलेले अप्पाजी, निर्वाणीचा उपाय म्हणून सुरा काढतात. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा येणाऱ्या गेंडासिगचा खून करायचा निर्णय होतो त्याच रात्री, अठ्ठाविसाव्या मजल्याच्या खिडकीतनं वाकून खालच्या झोपडपट्टीत पत्रकं फेकणाऱ्या अप्पाजींना, संतराम ढकलून देऊन संपवितो. हा सूर्यास्त !

'सूर्यास्त'च्या कथानकाबद्दल बरंच लिहिलं गेलं. कदाचित त्याचं कारण नाटक बव्हंशी घटनाप्रधान आहे, हे असावं. नाटकात सतत खूप काही घडत राहतं आणि ते

बऱ्यापैकी वेगानं घडत जातं. टी. व्ही. वरून चालणाऱ्या सरकारी प्रचारापासून सुरू होणाऱ्या व तेथेच संपणाऱ्या या अनेक ( आणि क्वचित संख्येने अवाजवीही ) घटनांची मालिका अडीच तासात आणि तीन अंकात सुबकपणे बसविण्याचं श्रेय दळवींना आहेच. या घटनाप्रधानतेतून उथळपणाचा जो दोष निर्माण होतो, त्याचा दोषही दळवींकडेच जातो. तथापि त्याची चर्चा नंतर करू. नाटकात जे घडतं, ते सर्व दळवींनी अत्यंत सुसूत्रतेनं, बंदिस्तपणे व ठाशीवपणे मांडलं आहे. या ठाशीवपणाच्या, ठसठशीतपणाच्या अतिरेकातून क्वचित्प्रसंगी भडकपणाचा दोषही उत्पन्न झाला आहे. तथापि त्याचीही चर्चा नंतर येईल. प्रथम नाटकाची धन बाजू पाह्यची तर दळवींना यशस्वी व्यक्तिचित्रणाचं मोठंच श्रेय द्यावं लागेल. अप्पाजी हे व्यक्तिमत्त्वाचं एक अद्भुत रसायन दळवींनी या निमित्तानं निर्माण केले आहे. या पत्राद्वारे मराठी रंगभूमीवरच्या संस्मरणीय व्यक्तिचित्रांच्या यादीत दळवींनी एकाची भर घातली आहे, याबद्दल माझ्या मनात शंका नाही. ( अर्थात या कमाईमध्ये दळवींइतकाच मोलाचा वाटा निळू फुलेंचा आहे. याबद्दल दुमत होईलसे वाटत नाही; तथापि तो मुद्दा अलाहिदा. ) या गृहस्थाच्या व्यक्तिमत्त्वाचे नेमके व मोजके वर्णन करणे कठीण आहे. अत्यंत परस्परविरोधी विसंगती त्याच्या वागण्याबोलण्यात सहज दिसतात आणि तरीही त्याच्या बोलण्यात व वागण्यात सुसंगती नाही असे नाही. वयाची सत्तरी सहज ओलांडली असेल असा हा म्हातारा तिशीच्या आतल्या तरुणाइतकाच, किंबहुना अधिकच, मनस्वी आणि उसळत्या रक्ताचा आहे. आपल्या बायकोनं आपल्या देशसेवेपायी केलेल्या कष्टत्यागांची जाणीव त्याला पुरेपूर असली तरी संतापाच्या भरात तिलाही 'थोबाड फोडीन !' असं तो सुनवायला कमी करीत नाही. फार काय, ही आणि अशी वाक्यं ( उत्तम शिव्यांसहित ) तो आपल्या मुख्यमंत्री मुलाला आणि त्याच्या कंपूतल्या कुणालाही ऐकवू शकतो. याचं एक कारण तो तापट आहे हे आहे, तसंच तो रांगडा आहे हेही आहे. जुलमी सत्तेविरुद्ध उठायला धावणाऱ्या तथाकथित बंडखोर आमदाराला, त्यानं विश्वासघात केल्यानंतर, 'मन्या, जरा घरी येऊन जातोस का ? थोडं ताजं शेण आणून ठेवलंय, ते स्वतःच्या हातानं तुझ्या तोंडात घातलं असतं ! ' असं अप्पाजी पुन्हापुन्हा फोनवरून ऐकवतो आणि त्यातच समाधान मानतो. तेव्हा त्याचं ते रांगडेपण–काहीसं बालिश आणि असहाय असलं तरी–विलक्षण लोभस वाटतं. एक क्षणभरही स्वस्थ, निष्क्रिय राहणं या जातिवंत कर्मयोग्याला असह्य वाटतं आणि रंगमंचावर या पात्राला नाना लकबी दिल्या आहेत – हातांची – बोटांची अस्वस्थ चाळवाचाळव, बोलण्यातल्या आवेगाबरोबरच हात नाचविणं, ओठांच्या हालचाली–पुटपुट आणि मुख्यतः रंगमंचाच्या सर्व दिशांना चाललेली प्रचंड धावपळ–मनातली तगमग दाखविणारी. चोहोबाजूंना खदाखदा हसणाऱ्या अंधारामुळं होणारा चित्तप्रक्षोभ अनावर झाला की हा गृहस्थ पाठीमागं हात बांधून तुरुतुरु फेऱ्या घालायला लागतो आणि त्या प्रक्षोभातली असहायताही मर्यादेपलीकडे गेली, की काठी घेऊन गेंडासिंगच्या अंगावर धावून जातो, पोलिसकमिशनरशी झोंबाझोंबी करतो. अंधाराशी झुंजायला भाऊराव–लाल्यासारखे दोघेचौघे जरी उभे राहताना दिसले तरी लहान मुलासारख्या आनंदणाऱ्या अप्पाजीला, माणसाच्या लठाऊपणाच्या मर्यादाही उत्तम ज्ञात आहेत. त्यामुळे 'संतरामजी लई मोठ्या मनाचा मानूस ', असं म्हणून आपल्यावरचे सगळे जुलूम पोटाआड करणाऱ्या गायकवाडबद्दल अप्पाजीला अपार सहानुभूती वाटते, राग नव्हे, जरी अप्पाजीचे आयुष्य सतत पदरात निखारे घेऊन चालण्यातच गेलं आहे. आयुष्यभर पोळलेल्या माणसाकडे शेवटी येणारं मिष्कील सदाहरितत्व, परक्याशी लढून मिळविलेलं स्वातंत्र्य आपल्याच वारसांनी हिसडून घेतल्यानंतर साहजिक उसळणारा संताप, प्रस्थापिताविरुद्ध संघर्ष करण्यात जन्म गेल्यानंतर शेवटी आपल्याच मुलाच्या रूपानं उभ्या राहणाऱ्या विकृत भ्रष्ट प्रस्थापितात सामील होण्याला दिलेला ठाम नकार, मूळच्या रांगडेपणावर चढलेली गांधीवादाची व जीवनानुभवांची झिलई आणि तत्त्वनिष्ठा व व्यवहार यांची सांगड घालण्यात होणारी घालमेल अशा व्यक्तित्वधाग्यांनी गुंफला गेलेला हा अप्पाजी दळवींच्या लेखणीतनं जसा उतरला तसाच, तितक्याच सरसतेनं निळू फुले यांनी तो रंगमंचावर उतरविला. अनेक ( प्रकारच्या ) उन्हाळ्यांनी करपलेला काळा चेहरा आणि पांढरलेले टोपलेवजा केस, खादीचे मळकट धोतर-कुडता-शबनम अशा अवतारातला हा अप्पाजी निळू फुलेंच्या आजवरच्या सगळ्या भूमिकांपेक्षा अत्यंत वेगळा ठरावा आणि त्याच्या कारकीर्दीतली ही सर्वोत्कृष्ट भूमिका ठरावी. या भूमिकेसाठी निळूभाऊंनी आपला 'गेटअप्' तर पूर्णच बदललाय; पण आपला तो खास आवाज आणि टोनसुद्धा पुरेसा modify केलाय, ही आनंदाची बाब. 'सामना' मधल्या आपल्या मास्तरच्या भूमिकेसाठी डॉ. लागूंनी धारण केलेल्या त्या unusual व्यक्तिमत्त्वाची आठवण या प्रसंगी झाल्यावाचून राहणार नाही. अर्थात ती फक्त व्यक्तित्वपरिवर्तनातल्या संख्यात्मक यशापुरतीच; गुणात्मकतेविषयी नव्हे. कारण मास्तर आणि अप्पाजी ही व्यक्तिमत्त्वं वेगवेगळ्याच विश्वातली आहेत. मला वाटतं, अप्पाजीच्या भूमिकेतले उत्कट व स्फोटक आवेग आणि आंतरिक संघर्ष, त्या भूमिकेला 'मास्तर 'पेक्षा 'नटसम्राट 'च्या अधिक जवळ घेऊन जातात. दोघांचा रांगडेपणाही सारखाच. वृद्धत्वातली अगतिकता तर जशी दोघांना समान तशीच वैश्विकही. दोघेही ठळकपणे भूतकाळातून निघतात आणि वर्तमानकाळातील शोकांताद्वारे विलीन पावतात. अप्पाजींचा उघडच खून होतो तर नटसम्राटाचा मृत्यू (तोही तसा खूनच) अप्रत्यक्षपणे आणि पायरी–पायरीने, slow ( & indirect ) poisoning सारखा घडविला जातो. दोनही निकटवर्तीयांच्याच विश्वासघाताचे बळी. मात्र, उभयतांच्या शोकात्म जीवनप्रवाहामागच्या अंतःप्रेरणा निरनिराळ्या आहेत. नटसम्राटाची शोकांतिका किंग लियरप्रमाणे वैश्विक पातळीवर जाते असे मानले तरी ती कौटुंबिक संघर्षातच मुळात रुतलेली दिसते. अप्पाजीच्या शोकांतिकेला कौटुंबिक संघर्षाचा एक लहानसा पदर आहे एवढेच. प्रत्यक्षात ती दुरिताविरुद्धच्या वैश्विक युद्धातली एक प्रातिनिधिक झुंज आहे. (दळवींनी तिचे हे स्वरूप पुरेसे स्पष्ट केले नाही आणि ही झुंज अधिकतः व्यावहारिक पातळीवरच ठेवली याचे मात्र वाईट वाटते. 'उद्ध्वस्त धर्मशाळा ' हे ज्या अर्थाने प्रस्थापिताविरुद्धच्या सार्वत्रिक संघ-

र्षाचे चित्रण ठरते, तो लक्षात घेतल्यास माझा हा मुद्दा अधिक स्पष्ट होऊ शकेल.) [ नटसम्राट व अप्पाजी यांच्या या ठळक शोकांतिकांमधल्या या मर्यादित साम्यासारखेच काही interesting results, ' सामना ' मधला मास्तर व ' उद्ध्वस्त धर्मशाळेमधला प्राध्यापक यांच्या शोकात्म तथापि अंतहीन अशा, वैफल्यग्रस्त, प्रवासांची तुलना केली असता मला मिळतात, तथापि त्याबद्दल विस्ताराने लिहिण्याचे हे स्थळ नाही. ] 'सामना'चा मास्तर व ' सूर्यास्त 'चा अप्पाजी हे दोघेही स्वातंत्र्यपूर्व काळातून येतात आणि स्वातंत्र्योत्तर काळात जगतात हे एक ठळक साम्य; पण मास्तरच्या व्यक्तिरेखेतली संदिग्धता अप्पाजीच्या ठसठशीत भूमिकेत कोठेच नाही. अप्पाजीला भूतकाळात घट्ट मुळे आहेत, तर मास्तर धरणी भेदून आल्यासारखाच उगवतो. कदाचित तो मुद्दामच स्वातंत्र्यपूर्व काळातली आपली मुळं तोडून आला आहे. वर्तमानात जगताना मात्र दोघेही सारखेच झक्की, जिगरबाज आणि बंडखोर आहेत. unpredictable आहेत, आणि दोघेही प्रस्थापिताच्या आश्रयाने राहातानाही त्याच प्रस्थापिताला उद्ध्वस्त करण्याच्या इरेला पेटलेले आहेत. मास्तरच्या साथीला दारूची आग आहे तर अप्पाजीच्या धडपडीमागे स्वातंत्र्याची आच आहे. दोघांच्याही अनगड स्वभाव-वर्तनात दोष/विसंगती आहेत. अर्थात मास्तरात जरा जास्त. मास्तर एक जुलमी साम्राज्य (मर्यादित अर्थानेच) उद्ध्वस्त करतो, तर अप्पाजी ('उद्ध्वस्त धर्मशाळतल्या प्राध्यापकासारखाच) साम्राज्यवाद–सरंजामशाहीच्या बुलडोझरखाली चिरडला जाऊ शकतो. अप्पाजीच्या हातीचा दिवा उरलेल्या दोघांच्या दिव्यांपेक्षा जास्त स्वच्छपणे जळतो आहे. His light burns clearer, अशा अर्थाने अप्पाजीचा प्रवास ठळकपणे संपून जातो. मास्तर आणि प्राध्यापक यांच्या प्रवासाचं (आणि त्यांच्या हातीच्या दिव्यांचं) काय होतं कुणास ठाऊक !

## यशस्वी व्यक्तिचित्रण

असो. इरादा ' सूर्यास्ता 'वर लिहायचाच होता. अप्पाजीच्या खालोखाल संतराम आणि गायकवाड ही दोन व्यक्तिचित्रणं यशस्वी म्हणून दळवींच्या जमेच्या बाजूस पडतील. संतरामला (अकारण ?) बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे आणि भ्रष्ट व अत्याचारी प्रस्थापिताचे सर्वाधिक समर्थ प्रतिनिधित्व संतरामच करतो. दुसरीकडे ठार चिरडल्या गेलेल्या आणि तरीही प्रस्थापिताच्या पायाशी अगतिकपणे वाकणाऱ्या, दुर्दैवी पण पोटार्थी दलितवर्गाचे प्रतिनिधित्व गायकवाडकडे जाते. या दोनही भूमिका (अनुक्रमे) श्री. राजा नाईक आणि श्री. जयंत सावरकर यांनी तोलामोलाने वठविल्या, अप्पाजींच्या भूमिकेतल्या निळूभाऊंसमोर उभं राहणं शोभावं अशा प्रतीच्या वठविल्या. संतरामजींचं झोकदार चालणं आणि धारदार बोलणं आणि गायकवाडची नशेत उघडी होणारी व्यथा + ' आय् ॲम नॉट् ॲन् ऑर्डिनरी मॅन, अप्पाजी ! ' ही शुद्धीच्या सीमारेषेवरची जाणीव अशा काही गोष्टी विसरता येण्याजोग्या नाहीत. अन्य पात्रांच्या चित्रणाकडे दळवींना पुरेसे लक्ष देता आलेले नाही आणि त्यामुळे त्या पात्रांच्या व्यक्तित्वविकसनाला वाव न राहून ती flat / static होण्याकडे झुकतात. (उदा. जनाबाई, लाल्या, त्याची बायको, संतरामजीची बायको) हे खरे आहे. तथापि नाटकाच्या मर्यादेमध्ये सर्वच पात्रांच्या चरित्रविकसनास पुरेशी संधी देणे कोणत्याच नाटककारास शक्य नाही आणि त्यामुळे कोठेही दुय्यम पात्रे पुरेशी dynomic राहणार नाहीत, याचीही नोंद घ्यावयास हवीच. मात्र जनाबाई या पात्राच्या कमाल सपाटपणामुळे त्याबद्दल अविश्वसनीयता वाटली तर ते रास्त ठरावं. आपल्या नवऱ्याचा मोठेपणा, इतक्या समजूतदार बाईला त्याच्याबरोबर जन्म काढूनही, इतक्या थरापर्यंत अज्ञात रहावा यावर विश्वास ठेवणं कठीण आहे. ' हिमालयाची सावली ' या नाटकातल्या बयोची व्यक्तिरेखा वाचकांनी आठवली तर माझा मुद्दा (व तदनुषंगिक लांबलचक तुलना) अधिक विस्तारावा लागणार नाही. ' सूर्यास्त 'चे व दिग्दर्शक सारंग यांचे वैशिष्टय हे की, लेखनात काहीशा अनाकर्षक अशा या दुय्यम भूमिका प्रयोगात सफाईनं व दर्जेदारपणे सादर होतील याकडे उत्तम लक्ष पुरविलं गेलं आहे. जनाबाईची भूमिका अनपेक्षितपणे, समरसून उभी करणाऱ्या लालन सारंग यांचा उल्लेख प्रामुख्यानं केला पाहिजे. अनपेक्षितपणे अशासाठी की, अशा एखाद्या ग्लॅमरलेस भूमिकेत त्या इतका सरस अभिनय करू शकतील असं मला तरी वाटलं नव्हतं. संतरामच्या पत्नीच्या भूमिकेतील अभिनेत्री व सुनेच्या भूमिकेतल्या मंदा देसाई यांचाही उल्लेख जरूर करायला हवा. स्वत: श्री. सारंग यांनी भाऊरावांची लहानशी भूमिकाही ठीक वठविली. मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेत श्री. धनंजय भावे शोभले व त्यांना वाव मर्यादितच असला तरी आपल्या व्यक्तिरेखेचा आब सांभाळतानाच संघर्षाच्या प्रसंगात त्यांनी त्या वलयाबाहेर पडूनही चांगली चमक दाखविली. (अप्पाजींशी झडणारी त्यांची दुसरी जुगलबंदी आठवावी.)

## मर्यादित संघर्ष

असो. आता दळवींच्या लेखनाकडे विस्ताराने वळतो. मागे म्हटल्याप्रमाणे निवडलेल्या कथानकाच्या चौकटीत गतिमान राहतीलसे प्रसंग आणि त्यात चपखल बसणारे माफक खुसखुशीत व जरूर तेवढे बोचक संवाद त्यांनी सफाईने लिहिलेले आहेत, याबाबत संशय नाही. तत्कालीन व्यावहारिक संदर्भ घेऊन; प्रचारमाध्यमे, विद्यापीठे, सरकारी नोकरशाही, पक्षीय लाथाळ्या, सार्वत्रिक लाचारी व भयग्रस्तता, बुद्धिवंतांचा लाळघोटेपणा आणि सत्तांधांनी केलेली गळचेपी; यांना चिमटे, ओरखडे, फटकारे, गुदगुल्या इत्यादी अहेर योग्यतेनुसार यथाशक्ती पोचते केलेलेही आहेत. या सर्वांमुळे सर्वसामान्य प्रेक्षकावर नाटकाचा जबरदस्त पगडा बसत असला तरी बारकाईने विचार करण्यास नाट्यसंहितेबाबत काहीसे असमाधान वाटल्याचे दिसते. असे का व्हावे ? माझे निदान (व दळवींच्या या लेखनाविषयीची माझी प्रमुख तक्रार) असे आहे की, या नाटकाचा प्राण असलेला जो अप्पाजींचा अन्यायाविरुद्धचा संघर्ष, तो दळवींनी अत्यंत व्यावहारिक पातळीवरच मर्यादित ठेवला. विशाल तात्त्विक पातळीवर ' पुरेशा प्रमाणात ' नेला नाही. म्हणजे असं की, मुख्यमंत्री कंपूच्या लाचखाऊपणासारख्या व्यक्तिगत / सामूहिक भ्रष्टाचाराविरुद्ध अप्पाजी जितक्या त्वेषानं पेटून उठतो, तितका आवेश आणीबाणी लादणाऱ्या तत्त्वांविरुद्ध लढताना त्याला आलेला दिसत नाही. नाटकाच्या अखेरीसही अप्पाजी गेंडासिंगची

हत्या करण्यासही जो प्रवृत्त होतो, तो गेंडासिंग एका जुलमी तत्त्वाचं प्रतिनिधित्व करतो म्हणून नव्हे, तर त्याने आणलेल्या सडक्या गव्हामुळे हजारो शेतकरी कुटुंबे उपाशी मरतील म्हणून. तिसऱ्या अंकातली त्याची सगळी उलघाल या किडक्या गव्हाच्या बियाण्यापायी चालते. आता हा प्रश्नही महत्त्वाचा आहेच; पण आयुष्यभर जपलेलं अहिंसेचं व्रत सोडून शस्त्र हातात घ्यायला एखादा कट्टर गांधीवादी तयार होईल, तो किडक्या बियाण्याच्या प्रश्नापायी की पायदळी तुडविल्या गेलेल्या, लोकशाहीसारख्या मूलभूत तत्त्वांपायी ? - हा शेवट म्हणजे अप्पाजीनेही अखेर स्वातंत्र्यापेक्षा भाकरीच मोलाची मानल्याचा पुरावाच नव्हे काय ? तसे असेल तर त्याच्या व्यक्तिचित्रणाचा मूलाधारच ढासळून पडत नाही का ?

कोणत्याही संघर्षाची बीजे ही व्यवहारातच पुरलेली असतात, यात संशय नाही. तथापि असा व्यावहारिक संघर्ष / व्यक्तिगत संघर्ष कलाकृतीच्या विकसनप्रक्रियेत तात्त्विक संघर्षाच्या पातळीपर्यंत उदात्तीकृत करण्याची दक्षता नाटककाराने घेतली नाही, तर त्याच्या कलाकृतीलं स्थितिकालनिरपेक्ष श्रेष्ठत्व प्राप्त होण्यास निश्चितच अडचण येते. अक्षरवाङ्मयात जमा होणाऱ्या सर्व कलाकृतींमध्ये हा नियम पाळला गेल्याचे दिसते. 'बेकेट'मधला किंवा 'अँटिगनी'-मधला संघर्ष आठवा. अँटिगनीमधला संघर्ष हा एक प्रेत पुरण्या–न पुरण्याच्या अत्यंत व्यावहारिक मुद्द्यापासून सुरू होतो; परंतु काही क्षणांतच प्रस्थापित आणि प्रस्थापितविरोधक, ब्यूरोक्रॅट्स् आणि अनार्किस्ट्स्, कार्यकर्ते आणि बंडखोर, कर्तव्यबद्ध आणि स्वातंत्र्यनिष्ठ यांच्यातल्या सनातन, स्थलकालस्थितिनिरपेक्ष संघर्षाचे स्वरूप येते आणि म्हणून त्या नाट्यानुभवास अमरत्व प्राप्त होते, हे दळवींना माझ्यासारख्याने सांगावयास हवे असे नाही. तथापि सूर्यास्त-मध्ये अशा प्रकारचा पुरेसा प्रयत्नही झालेला का दिसू नये ? वस्तुतः आणीबाणीतला भारत हा भारतीयांना अजब अनुभवासारखा भासला तरी जुलमी फॅसिस्ट हुकुमशाही राजवटी जगाला अपरिचित नाहीत. साहजिकच त्यांच्याविरुद्धच्या संघर्षाचे वैश्विक पातळीपर्यंत उन्नयन करणे दळवींना काहीच कठीण नव्हते; पण असे Universalization + तात्त्विकीकरण न घडल्याने सूर्यास्त चार-दोन व्यावहारिक जुलूम-भ्रष्टाचारांविरुद्धच्या लढ्यापुरतेच खुरटून राहते.

## चार आक्षेप

आता नाटकाविषयीच्या काही सहप्रेक्षकांच्या आक्षेपांकडे थोडक्यात वळतो. हे आक्षेप असे– एक : नाटक अत्यंत crude आहे. दोन : नाटक रटाळ अनुबोधपटवजा आहे. तीन : नाटकाचे राजकीयत्व पुरेसे घट्ट नाही. त्यात कौटुंबिक, व्यक्तिगत वगैरे संघर्ष उगीचच लुडबुडतात. चार : पार्श्वसंगीत अनावश्यक व रसभंग करणारे आहे. पाच : दुय्यम पात्रांचे अस्तित्व निर्जीव आहे, वगैरे.

यापैकी शेवटच्या आक्षेपाबद्दल मी पूर्वीच लिहिले आहे. चौथ्या आक्षेपाविषयी काही लिहीत नाही. कारण मी त्याच्याशी पूर्ण सहमत आहे. दुसऱ्या आक्षेपाविषयी लिहिण्यासारखेच काही नाही इतका तो निराधार व पोकळ वाटतो. उलट हे नाटक आहे एवढे लोकानुरंजन करणारे नसते तरच अधिक बरे झाले असते ही वस्तुस्थिती आहे. क्रमांक एक व तीन हे आक्षेप मात्र बव्हंशी सत्य असून महत्त्वाचेही आहेत. नाटक काहीसे crude वाटते हे खरे आहे. त्याचा वाटा लेखकाकडे जातो तसाच दिग्दर्शक व कलाकारांकडेही जातो. संतरामने आपल्या सुनेच्या रूपाचा मांडलेला बाजार हे या crudeness चे एक उदाहरण म्हणून दिले जाते व ते मान्य करावेच लागेल. क्वचितप्रसंगी (उदा. मनःक्षोभ व्यक्त करताना) निळूभाऊंकडून अभिनयातिरेक घडतो व तोही या crudeness मध्ये भर घालीत असण्याची शक्यता आहेच. तिसरा आक्षेपही तितकाच रास्त आहे. नाटकाचे राजकीयत्व ज्यामुळे पातळ व्हावे अशा अनेक गोष्टी नाटकात बेमालूम घुसलेल्या दिसतात. उदाहरणार्थ संतरामजींच्या कौटुंबिक भानगडींनी नाटकावर जरा अवाजवीच अतिक्रमण केले आहे. दुसऱ्या अंकात तर नाटकाचा तोल जबरदस्त ढळतो आणि काही वेळा तर नाटकाचा नायक अप्पाजी आहे की संतराम आणि नाटक political आहे की criminal याबद्दल संशयाची परिस्थिती निर्माण होते. गायकवाडची रामकहाणी व संतरामजींच्या सुनेची–मुलाची फरफट अशी दोन उपकथानके मुख्य कथानकात चांगली मिसळली असली तरी त्यांना आलेले संख्यात्मक व गुणात्मक महत्त्व जमेस धरता ती टेकूंपेक्षा बांडगुळांचेच काम अधिक बजावतात असे वाटते. या सर्वांचा परिणाम म्हणजे नाटकाचे राजकीयत्व व तदनुषंगिक परिणाम पातळ होतात. मला crudeness पेक्षाही अधिक खेद होतो तो या उथळपणाचा.

Social animal म्हणून जगताना माणसाच्या आसपास निर्माण होणाऱ्या मूलभूत प्रश्नांविषयी तात्त्विक चर्चा करायची संधी दळवींनी या नाटकात दवडलीच आहे. (उदाहरणार्थ उद्ध्वस्त धर्मशाळा, अँटिगनी, इडिपस) असा तात्त्विक संघर्ष– प्रश्न उपस्थित होतो तो फक्त नाटकाच्या शेवटापाशी, अप्पाजी हातात सुरा घेतो तेव्हा. त्याची ही कृती पटण्यासारखी आहे की नाही, याचा निकाल करण्याची संधी ही नव्हे. (निळू फुले यांचा या प्रसंगीचा अभिनय दीर्घकाळ स्मरणात राहील.) अप्पाजीचा हा क्रांतिकारक निर्णय दळवींनी पुरेशा convincing पद्धतीने मांडला नसल्याची अनेकांची तक्रार आहे, तिकडेही दुर्लक्ष केले तरी एक गोष्ट राहते. अप्पाजीचा हा निर्णय ज्याला समर्थनीय वाटेल, अपरिहार्य वाटेल, त्याला संतरामकडून होणारा अप्पाजीचा खूनही तितकाच समर्थनीय व अपरिहार्य मानावा लागेल. कारण साधनशुचिता सोडलेले पुण्य व ती नसलेले पाप यांच्यातला फरक फक्त संख्याबलात्मक उरतो, गुणात्मक नव्हे. मग कुणीही कुणासही विझवावे. संतरामादि सैतानांना अप्पाजींच्या सुऱ्याचा धाक नव्हता, तर त्यांच्या अहिंसेमागच्या नैतिक सामर्थ्याचाच दरारा प्रतिबंधक होता. ते सामर्थ्य संपल्यानंतरच्या निव्वळ सुरामारीच्या पिसाटस्पर्धेत सैतानाने साधूआधी डाव साधला तर त्याला दोष कसा देणार ? दळवींनाही हे सर्व अभिप्रेत असले म्हणजे झाले, एवढेच काय ते.

असो. शेवटी एवढेच म्हणून थांबतो की सूर्यास्त हे एक चांगलं नाटक झालं; पण महान नाटक (शक्य असूनही) होऊ शकलं नाही !

□

उमेदवार स्वतः विजयी होऊ शकले नाहीत तरी इतरांना त्रासदायक ठरू शकतील. या पाच उमेदवारांखेरीज अपक्ष उमेदवारांचेही उदंड पीक आहे. तथापि त्यांची दखल घेण्याचे कारण नाही. त्यांची संख्या जरी १६ असली तरी त्यांच्या वाट्याला फारशी मते येणार नाहीत. मतदारांची जातवार वर्गवारी पाहिली, तर अहिरांचे त्यातल्या त्यात वर्चस्व दिसते. एकूण मतदारांपैकी त्यांची संख्या २५ टक्के इतकी आहे. याखेरीज ब्राह्मण १० टक्के, हरिजन १० टक्के, मुसलमान १५ टक्के, ठाकूर १५ टक्के, भूमिदार व इतर १५ टक्के असे इतर जातींचे प्रमाण आहे.

### चंद्रजित यादव

उमेदवारांपैकी चंद्रजित यादव यांचे नाव नाकारता येत नसले; तरी आज या मतदारसंघामध्ये जी परिस्थिती दिसते ती पाहता खरी लढत मोहसिना किडवाई व राम बच्चन यादव यांच्यामध्ये होईल असे दिसते. कॉंग्रेसचे कार्यकर्ते किडवाई व चंद्रजित यादव या दोघांमध्ये लढत होईल असे म्हणत असले तरी एकंदर परिस्थिती त्यांच्या या विधानाला अनुकूल ठरणारी नाही. गेल्या निवडणुकीमध्य पराभूत होऊनही चंद्रजित यादव या मतदारसंघाशी सतत संपर्क ठेवून आहेत असा कॉंग्रेसचा दावा आहे आणि तो मान्य करावाच लागेल. चंद्रजित यादव यांचा प्रभाव असलेल्या काही छोट्या छोट्या जागा आहेत. संख्येने सर्वांत जास्त असलेल्या अहिरांमध्ये त्यांचा पाठपुरावा करणारी अनेक मंडळी आहेत. मुसलमानांमध्येही चंद्रजित यादव यांच्यावर लोभ असणारांची संख्या कमी नाही. पक्षवार सहानुभूतीचा विचार केला तर चंद्रजित यादव कम्युनिस्ट पक्षाला जवळचे वाटतात; पण कम्युनिस्ट पक्षाचा उमेदवार ही निवडणूक लढवीत असल्याने ही सहानुभूती यादव यांना फलदायी ठरणार नाही. यादव यांना अहिरांची जी मते पडतील ती अन्यथा जनता पक्षाला मिळाली असती आणि त्यांना पडणारी मुसलमानांची मते ते जर नसते तर बहुधा मोहसिना किडवाई यांना मिळाली असती. अशी ही समासम काटछाट असल्याने चंद्रजित यादव यांच्या उमेदवारीचा इंदिरा कॉंग्रेस व जनता पक्ष या दोघांनाही त्रास होणार आहे. तथापि केवळ त्रास देणे हा त्यांच्या उमेदवारीचा उद्देश नाही. निवडणूक जिंकण्याच्या ईर्षेने ते निवडणुकीमध्ये उतरले असून पूर्ण शक्तीनिशी ते निवडणूक लढवीत आहेत. या निवडणुकीमध्ये जर त्यांना केविलवाणा पराभव पत्करावा लागला तर त्याचा–पक्षसामर्थ्यावर प्रतिकूल परिणाम होऊन आधीच कमकुवत असलेला हा पक्ष आणखीनच कमकुवत होऊन जाईल. आज मतदारसंघामध्ये जी परिस्थिती दिसते ती पाहता वातावरण इंदिरा कॉंग्रेसला सर्वांत जास्त अनुकूल आहे. मोहसिना किडवाई यांच्याबद्दलही सर्व जातीजमातींच्या मतदारांमध्ये सहानुभूती आढळून येते. आता ही सहानुभूती कोरडी राहते का मतदार त्यांचा खरोखरच पाठपुरावा करतात हे पाहायचे.

जनता पक्षाच्या प्रचारानेही चांगली गती घेतली आहे. लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात उत्तर प्रदेशाला असाधारण महत्त्व आहे याची जनता पक्षनेत्यांना पूर्ण कल्पना असून दिल्लीमधील अनेक ज्येष्ठ नेते या निवडणुकीच्या प्रचारसभांतून भाग घेत आहेत. लाटेवर निवडून येण्यासारखी परिस्थिती नसल्याने लोकमताची खरी दिशा या निवडणूक-निकालाने स्पष्ट होईल आणि त्या निकालाचे दूरगामी राजकीय परिणाम होतील.

*

## असे ऐकिवात आहे की....

□ □ शहा आयोगाचे कामकाज–हा एक उपहासाचा आणि चेष्टेचा विषय व्हावा यासाठी इंदिरा गटाने जोरदार प्रयत्न चालविले आहेत. आयोगासमोर उपस्थित तर राहायचे आणि कामकाजामध्ये सहकार्य तर द्यायचे नाही, असे ठरविण्यात आले असून त्याची अंमलबजावणी होत आहे. संजय गांधी यांनी आयोगासमोर जो तमाशा केला तो पूर्वनियोजित स्वरूपाचा होता. आयोगासमोर उपस्थित राहून त्यांनी आयोगाची जास्तीत जास्त अप्रतिष्ठा केली. दिल्लीमध्ये आयोगाविरुद्ध वातावरण तापत ठेवण्याची कामगिरी स्वतः इंदिराजी बनवीत असून आयोगाने शपथेवर साक्ष देण्यास नकार भरल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध जो दावा दाखल केला आहे त्याचाही त्या कौशल्याने उपयोग करून घेत आहेत. या कारवाईला शह द्यायचा असेल तर शहा आयोगाने जो अंतरिम अहवाल सादर केला आहे तो आधारभूत मानून तत्परतेने काही कारवाई करण्यात यावी असा विचार जनता पक्षामध्ये बळावला असून या अहवालाचा कायदेमंत्रालयातर्फे अभ्यास चालू असून काही निश्चित निर्णय त्वरित घेतले जातील असे लक्षण दिसते. जनता पक्षाच्या एकंदर यंत्रणेमध्ये असावे तेवढे महत्त्वाचे स्थान नाही, अशी त्यांच्या चाहत्यांची भावना झाली असून त्यांपैकी एकाने बाबुजींना पत्र लिहून आपली नाराजी व्यक्त केली. स्वतः बाबुजीही एकंदर परिस्थितीबाबत फारसे समाधानी नाहीत. जनता पक्षाला जर आपण नकोसे

झालो असू, तर आपण केव्हाही बाहेर जाण्यास तयार आहोत असे त्यांनी खाजगीरीत्या बोलून दाखविल्याचे समजते. लोकशाहीवादी काँग्रेसचे बहुसंख्य कार्यकर्ते विरोधात असताना राष्ट्रहित डोळ्यांसमोर ठेवून आपण आपला पक्ष जनता पक्षात विलीन केला इतकेच नव्हे तर व्यक्तिगत मानापमान बाजूला सारून मंत्रिमंडळात प्रवेश केला; परंतु आपल्या निर्णयाचे चुकीचे अर्थ लावले गेले ही खेदाची बाब आहे असेही त्यांनी सांगितले. त्यांना पत्र लिहून नाराजी व्यक्त करणाऱ्या मध्यप्रदेशामधील हरिजननेत्याला त्यांनी पत्र लिहून थोडे थांबा आणि पहा असे मोघम उत्तर लिहिले आहे. त्यामुळेच बाबूजी काही धक्कादायक राजकीय निर्णय घेतील असे वाटू लागले आहे. विधानसभा निवडणुकांमध्ये यश मिळाल्यापासून—चेन्ना रेड्डी, देवराज अरस हे प्रभावी नेते आपल्याला फारसा धूप घालीत नाहीत हे लक्षात आल्याने त्यांच्या वाढत्या सामर्थ्याला वेसण घालणे आवश्यक आहे असे इंदिराजींना वाटू लागले आणि चिरंजीव संजयने सल्ला दिला की, त्यांचे प्रदेशाध्यक्षपद तरी काढून घ्या. इंदिराजींना हा सल्ला पसंत पडला आणि लगोलग इंदिरा काँग्रेसने तसा ठरावही करून टाकला. या ठरावामुळेच या दोघांबरोबरच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रिपद भूषविणारे नाशिकराव तिरपुडे यांनाही प्रदेशाध्यक्षपद सोडावे लागणार आहे. अर्थात हे पद सोडले तरी या जागी येणारा मनुष्य आपल्या पूर्ण विश्वासातील असावा अशी या तिन्ही प्रमुख नेत्यांची इच्छा आहे, तर इंदिराजींना त्यांच्याशी डायरेक्ट संपर्क साधू शकणारा नेता प्रदेशाध्यक्ष म्हणून हवा आहे. असा अध्यक्ष असला तर मोक्याच्या वेळी आपल्याला हवा तसा त्याचा उपयोग करून घेता येईल असे त्यांना वाटते. याउलट चेन्ना रेड्डी, देवराज अरस यांना आपल्या वर्चस्वाला बाधा आणू शकेल अशी कोणतीही व्यक्ती प्रदेशाध्यक्ष म्हणून नको आहे. आज त्यांचे म्हणणे मानले गेले तरी त्यांच्या निर्विवाद सत्तेला छेद देण्याचा इंदिराजींचा हेतू साध्य झाला असून पक्षांतर्गत राजकारणामधील एक महत्त्वाची बाजी त्यांनी मारली आहे. शिवाय मनुष्य कितीही विश्वासाचा असला तरी तो तसाच राहील, इतके निर्मळ वातावरण राहिलेले नाही याची त्यांना जाणीव असल्याने वर्चस्व गाजविणाऱ्या या मंडळींपेक्षा दुसरा मनुष्य पक्षाध्यक्ष म्हणून येत आहे ही गोष्टही त्यांना आज समाधानकारक वाटते. □


# पश्चिमेचे पुत्र

रवींद्र पिंगे

ऑस्कर वाइल्ड
अर्नेस्ट हेमिंग्वे
विन्स्टन चर्चिल
एडगर वॉलेस
......

पश्चिमेच्या या प्रतिभावंतांची
सुंदर व्यक्तिचित्रे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.
मूल्य : चवदा रुपये

चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# आँखियों के झरोंखों से

ताराचंद बडजात्या हा गृहस्थ फारच संकोची निघाला. काही दिवसांपूर्वीच त्यांनी राजश्री पिक्चर्सच्या बॅनरखाली पेश केलेल्या 'पहेली' या चित्रपटाचे मी मनःपूर्वक कौतुक केले होते. खुद्द बडजात्यासाहेबांचेही त्यांच्या काहींशा धाडसी स्वभावाबद्दल अभिनंदन केले होते. त्यामुळे ते अतिशयच संकोचून गेले असावेत आणि म्हणूनच की काय ही स्तुती मी परत घ्यावी, या उद्देशाने असेल कदाचित् त्यांनी 'राजश्री पिक्चर्स' तर्फेच 'आँखियों के झरोंखों से, हा चित्रपट लगोलग सादर केला असावा.

कथालेखनाचे श्रेय मधुसूदन कालेलकर यांनी उपटले असले तरी ही कथा मूळ 'Love Story' नामक इंग्रजी चित्रकथेवरून घेतली आहे. या मूळ कथेत दोन छटाक विनोद, आदपाव कारुण्य, दीड पावशेर कौटुंबिक वातावरण, तीन चहाचे चमचे अश्रू आणि सात-आठ दाणे हास्याचे इतके कालेलकरी साहित्य ,कालवल्याने हा तयार झालेला काला मूळ इंग्रजी चित्रकथेपेक्षाही वाईट झाला आहे. बडजात्यांचे किशोरवयातील प्रेम या विषयावरील जितके चित्रपट आहेत, त्या सर्व चित्रपटांची एक आखीव व बंदिस्त चाकोरी बनून व ठरून गेली आहे. एक किशोर व एक किशोरी यांची कोणत्या तरी झगडयातून ओळख होते, ती हळूहळू वाढत जाऊन शेवटी रागाचे अनुरागात रूपांतर होते. दरम्यानच्या काळात दोघांचेही उदारमतवादी आई-बाप आपापसात गोड कट करून दोघांनाही "कशी गंमत झाली, किशोर?" आणि "कशी गंमत झाली, किशोरी?", असे म्हणून आश्चर्यचकित करतात. (बाकी चित्रपटांमध्ये प्रेमाच्या बुरुजाला हमखास सुरुंग लावणारे आणि "खानदान की इज्जत" वगैरे भाषणबाजीला भरपूर वाव देणारे हे गनीम उर्फ फिल्मी माँ-बाप बडजात्यांनाच एकजात एवढे फितूर का आहेत, कोण जाणे?) पुन्हा या किशोर-किशोरींपैकी निदान एकाची व जमल्यास दोघांची सांपत्तिक स्थिती मस्त मजबूत ठेवल्याने त्यांना प्रेमाला रान केवळ मोकळे मिळते. अशा या चाकोरीला 'आँखियों के झरोंखों से' मधून थोडी पुढची खाच पाडून ठेवली आहे. म्हणजे मघाच्या 'कशी गंमत' नंतर नायिकेला ब्लडकॅन्सर असल्याचा पत्ता लागतो आणि ती मरते. मग उदास नायक तिच्या थडग्यावर (त्या थडग्यावरील मजकूर – To the Dear Memory of one who loved and left) फुले वाहताना सूर्यास्त आणि शवट. नायक उदास कशावरून ? तर या शेवटच्या दृश्याच्या वेळी त्याच्या नाकावर एक मस्त फॅशनेबल चष्मा आलेला. तर अशी ही Love Story आणि मिली या चित्रपटाची आठवण देणारी कथा. पुन्हा कालेलकरांनी वर सांगितलेल्या सगळ्या मसाल्याला हिंदू नायक व ख्रिचन नायिका अशा आंतरधर्मीय प्रेमाची फोडणी दिलेली. बडजात्यांनी आतापर्यंत दिलेली चित्रे चाकोरीतील असूनही प्रत्येकाच्या एखाद्या ठसठशीत वैशिष्टयामुळे आणि सर्वांच्या प्रसन्नता, टवटवी या समाईक गुणांमुळे ती बघावीशी वाटत. या जोडीलाच दोन चित्रपटांमध्ये असणारे अंतर हाही एक मोठा भाग होता. बहुतेक चित्रपट कमीत कमी वर्षभराच्या अंतराने येत आणि त्यामुळे वर्षभर चाललेल्या इतर हिंदी सिनेमांच्या शिमग्यामध्ये हवेहवेसे वाटत; पण या वेळी मात्र 'पहेली' पाठोपाठ आलेल्या या झरोक्यात ती टवटवी वाटली नाहीच, उलट सर्व दृष्टींनी असलेला त्याचा सपकपणा व बेचवपणा जाणवला.

नाविन्याचा विचार केला तर बडजात्यांनी या चित्रपटातही हिरेन नाग हा नवीन दिग्दर्शक दिला आहे आणि चित्राची नायिका रंजिता हीही यापूर्वी फक्त 'लैला-मजनू' या एकाच चित्रपटात दिसली आहे; पण या दोघांचीही कामगिरी भिकार आहे. बडजात्यांनी अखेर चांगल्या नायिकांची आपली परंपरा अशा रीतीने मोडली. मोठे टपोरे डोळे यांव्यतिरिक्त रंजिताकडे एकही गुण नाही. आणि या डोळयांचाही उघडझाप करण्याव्यतिरिक्त तिने फारसा उपयोग केलेला नाही. बाकी तिच्या कामात तिच्या अभिनयापेक्षा रंगभूषाकारांचेच कौशल्य अधिक दिसले. म्हणजे उत्साही खेळकर नायिका दाखवयाची असली की, छान गुलाबी, गोरा मेकअप आणि आजारी खिन्न नायिका म्हणजे त्याच कोऱ्या चेहेऱ्यावर थोडा सावळेपणा, डोळयांभोवती काळी वर्तुळे वगैरे. नायिका रंजिताचा हा कोरेपणा तर नायक सचिनसाहेबांनी कोणत्याही फिल्मी जितू वा धर्मूच्या वरताण स्टायली मारलेल्या. काही जागी 'तर मलाही भावदर्शन करता येते.' हे दाखविण्याच्या अट्टाहासाने चेहेरा विस्कटलेला. ही दोन प्रमुख पात्रे आणि चित्रपटातील बाकी सर्वच जण असेच अतिशय उथळ आणि वरवरचे वावरत असल्यामुळे कॉलेज असो, बीच असो, चर्च असो वा हॉस्पिटल असो सगळेच वातावरण व प्रसंग अतिशय कृत्रिम, बगडी व खोटेखोटे बनले.

नेमका हाच बेगडीपणा हिरेन नाग यांच्या दिग्दर्शनात उतरला आहे. नवरसांच्या नऊ बाटल्या एकत्र करून तयार केलेल्या या कथारसायनाला त्यांनीही चटावरचे श्राद्ध उरकल्याप्रमाणे उकळी आणली आहे. मूळ 'Love Story' या कादंबरीतील भावनिक हळवेपणाला आणि हळुवारपणाला संपूर्ण फाटा दिल्याने प्रत्येक प्रसंग हा आटपतो, काहीही परिणाम न करता परततो आणि ऐकूण चित्रपटाचा कृत्रिमपणा कायम राहतो. फटाफट नायक–नायिकांच्या लागोपाठच्या एकेका भेटीतून दाखविलेला भांडण, आणखी भांडण, समेट, प्रेम, आणखी प्रेम, वाङ्‌निश्चय, आजार आणि मरण इतका प्रवास उरकल्याने अपेक्षित हळुवारपणा फार वेगाने लांब पळून जातो. शिवाय घेतलेले प्रसंगही इतर चित्रपटांमध्ये पाहिलेलेच–(१) लायब्ररीत एकाच पुस्तकावरून नायक–नायिकेचे भांडण (२) एका काव्यस्पर्धेत दोघांनाही पहिले बक्षीस (३) नायकाने नायिकेची 'डेट' मागून घेणे (म्हणजे रविवारची फक्त

दोघांची पिकनिक आणि गाणे; मिठ्या वगैरे फिल्मी रोमान्स; मग त्यात खोटे खोटे पडणे, खोटे खोटे आधार देणे ) ( ४ ) ब्लड कॅन्सर–हा एक गरीब बिचारा, दीनवाणा, बापुडवाणा रोग हिंदी चित्रपटवाल्यांच्या कचाट्यात हमखास मरण व हमखास अश्रूंचे साधन म्हणून फार चांगला सापडला आहे. ( ५ ) त्यातही नायिकेला ब्लडकॅन्सर झाल्याची बातमी ( जी सुज्ञ प्रेक्षकाला चित्रपटाच्या सुरुवातीलाच कळलेली असते ) झटकन सांगून न टाकता एकदा ती झांजेच्या आवाजात, एकदा कुकरच्या शिट्टीत जशी वेळोवेळी बुडवून प्रेक्षकाची त्याबद्दलची नसलेली उत्सुकता दिग्दर्शकाने ताणली आहे. हाच प्रकार नायकाला व दस्तुरखुद्द नायिकेला ती बातमी कळविताना. या रहस्यमयपणाच्या निमित्ताने मग नेहमीचेच एकमेकांबद्दलचे गैरसमज आणि अचानक होणारी त्यांची उकल. अशा सगळ्या प्रकारांवरून एक कॅमेरा नावाचे आंधळे यंत्र फिरविण्याऐवजी चित्रपटातील ज्युनिअर मेहमूद, मा. राजू, राजेंद्रनाथ यांच्या विनोदी चाळ्यांच्या फापटपसाऱ्याला चाट लावून जर दिग्दर्शक अधिक डोळसपणे वागता तर कालेकरांच्या कथेमधून पलीकडे मूळच्या 'Love Story' पर्यंत त्याला प्रेक्षकांना नेता आले असते; पण इतकी जाग अन् डोळसपणा दाखविला तर तो हिंदी दिग्दर्शक कसला ?

रवींद्र जैन यांचे संगीत ही चित्रपटाची एकमेव जमेची बाजू; पण तीही जैनसाहेबांची एक ठरीव चाकोरी, एक ठरीव साचा बनत चालल्याचे दाखविते. सगळीच गाणी श्रवणीय आहेत; पण पहेली वा दुल्हन वही...वा तशाच आणखी एखाद्या चित्रपटाची आठवण करून देणारी आहेत. थोडक्यात पाहण्याच्या लायकीचा नसलेला हा चित्रपट रवींद्र जैननी एखाद्या 'म्युझिक सेंटर 'मध्ये जाऊन ऐकण्याच्या लायकीचा बनविला आहे, खास. *

---

# The Gypsy Camp Vanishes Into The Blue

---

'सोवेक्सपोर्तफिल्म 'तर्फे हा रशियन (म्हणजे निर्मिती रशियन, चित्रपटात संवादांचे इंग्रजीकरण केले होते. ) चित्रपट प्रदर्शित झाला. 'ओल्ड इसेरग्योल ' व 'माकार चुद्रा ' या मॅक्झिम गोर्कीच्या कथांवरून काढलेला हा चित्रपट. मॅक्झिम गोर्कीचे नांव, चोविसाव्या सॅन सॅबॅस्तियन महोत्सवात चित्रपटाला मिळालेले बिग गोल्ड शेल पारितोषिक व चित्रपटाचा गवगवा यांमुळे अपेक्षा बऱ्याच होत्या. साहजिकच अपेक्षाभंगाचे तितकेच मोठे दुःख वाटयाला आले.

'पैशामागे धावू नका, तो धोका देतो. स्त्रियांच्या नादी लागू नका, त्या फसवतात.' असे माकार चुद्रा या वृद्ध जिप्सी माणसाचे तत्त्वज्ञान. झोर्बा नावाचा तरुण जिप्सी मात्र स्वतःच्या अनुभवांवरून म्हाताऱ्याच्या या सांगण्याकडे कानाडोळा करतो. तो घोडे चोरून पैसे मिळवितो आणि रादा नावाच्या एका सुंदर व गोड जिप्सी तरुणीच्या प्रेमात पडतो. दोन्हींचे पर्यवसान शोकांतिकेतच होते. घोडे चोरण्याबद्दल झोर्बाला अटक होते. त्यातून सुटताना त्याचा एक मित्र मारला जातो. रादाबरोबरच्या प्रेमाची परिणती तर दोघांच्याही मृत्यूत होते. या साऱ्याला कारण दोघांनाही असलेली मुक्ततेची, अनिर्बंध स्वातंत्र्याची आच आणि तरीही एकमेकांबद्दल वाटणारी अनावर ओढ.

पण ही आच, ही ओढ रादाच्या तोंडून बाहेर पडणारे 'It is freedom I love. Gypsies are wanderers.' अशी वाक्ये सोडली तर कोठेही जाणवत नाही. ही वाक्येही अक्षरशः 'पान तीस, धडा तिसरा 'सारखी ओठांतून घरंगळतात. चित्रपटाच्या पोस्टरवर लिहिले आहे, 'Romance of passion ! Lust in Gypsy love !' पण असा विकारांचा Romance वा प्रेमातील Lust संपूर्ण चित्रपटभर कोठेही दिसत नाही. केवळ एखाद्या गोड स्त्रीचे उघडे स्तन दाखवून आणि द्रौपदीवस्त्रहरणाप्रमाणे तिचे पाच-सहा घागरे फेडून आंबट षौक पुरविणे म्हणजे प्रेमातील तो उद्दामपणा वा उन्मुक्तपणा दाखविणे नव्हे. उलट झोर्बा व रादाची पहिली भेट आणि शेवटचा झोर्बा रादाला मागणी घालतो तो प्रसंग सोडल्यास दोघांचेही प्रेम वा दोघांना वाटणारी ओढ संपूर्णतः शारीरिक पातळीवर राहतात, त्यावर चढू शकत नाही. ही शरीरापल्याडची पातळी जसा चित्रपट गाठू शकत नाही, तशी मूळ कथेतील नियतीची अटळताही ताकदीने पकडू शकत नाही, मग ती प्रेक्षकांपर्यंत पोहोचविणे दूरच. फक्त एकदाच रादाच्या तोंडून 'I am going to be your destruction.' हे झोर्बाला ऐकविलेले त्याचे भविष्य थोडेफार त्या नियतीनामक प्रकाराची जाणीव देते; पण तीही किती ढोबळ आणि ओबडधोबड ! जिप्सींच्या स्वैर आणि धगधग्यासारख्या प्रचंड विकारांना व भावनांना महत्त्व देण्याऐवजी दिग्दर्शक जिप्सीपणात म्हणजे जिप्सींचे पोषाख, त्यांचे संगीत, त्यांचा तळ, गावातील बाजार अशा तपशिलाच्या गोष्टींमध्येच फार अडकून राहिल्याने असा प्रकार झाला आहे; त्यामुळे बाजूची चौकट व तिची मापे बरोबर पण आतील चित्राचा प्राण हरवलेला असे या चित्रपटाचे स्वरूप बनले आहे.


मोफत ! मोफत !! मोफत !!!

**पांढरे डाग**

नीलकमल बुटीने ३० वर्षांपासून पांढऱ्या डागाच्या रोग्यांना पूर्णपणे लाभ देऊन जगात प्रसिद्धी मिळविली आहे. आपणही एक लावायचे पॅकेट मोफत मागवून लाभ प्राप्त करा. केवळ १ महिन्यातच पूर्णपणे फायदा.

जवाहर चिकित्सा केंद्र

पो. कतरीसराय (गया)

MANOOS ( Marathi Weekly ) 75 Paise Regd. No. PNC-68

चित्रपटाचे संगीत मात्र हुबेहूब जिप्सी घेतल्याने आपल्या प्रेक्षकांना तो ताल, त्यातील हेल, एकजण गाताना दुसऱ्याने निरर्थक शब्दांनी केलेली साथ हे सगळे प्रकार हास्यापद वाटतात. माझ्या मते मात्र, चित्रपटाने न पकडलेल्या उन्मादाला संगीत कोठे तरी स्पर्श करते. अत्यंत सुरेख छायाचित्रण हे चित्रपटाचे आणखी एक वैशिष्टय.

चित्रपटातील सर्वांचा नामोल्लेख करतो.

दिग्दर्शन–Emil Lotyanu
संगीत–Yevgeny Doga
छायाचित्रण–Sergei Vronsky
भूमिका–झोर्बा–Grigory Grigoriu
रादा–Swetlana Toma

*

## The Nail

'जिप्सी'च्या आधी दोन रशियन लघुपट दाखविण्यात आले; त्यांपैकी एकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्याचे नाव The Nail दिग्दर्शक Heino Pars.

दोन वा तीन खिळ्यांना हवे तसे वाकवून, तापवून, नाचवून, धाववून या चित्रपटात चार प्रसंग साकार केले होते. सर्व प्रसंगांना पार्श्वध्वनी म्हणून दिलेले आवाज प्रसंगांची लज्जत अधिकच खुलावीत होते.

एका जोडप्याचे जमलेले प्रेम, मग त्यांना झालेले मूल आणि मूल होताच परागंदा होणारा पुरुष हा एक प्रसंग–एक मोठा खिळोबा, एक थोडी लहान खिळीणबाई आणि मग त्यांना झालेले एक खिळुटले यांनी हा प्रसंग साकारला आहे.

दुसरा प्रसंग एक अजस्र हातोडा आणि त्याला सततच्या चिरचिरीने त्रास देणारा एक खिळा. प्रथम गुरगुरून धाक दाखविणारा हातोडा शेवटी एका घावात खिळ्याला चपटे करतो.

तिसऱ्या प्रसंगात दोन खिळ्यांचे भांडण रंगविले आहे. एकमेकांवर धावून जाणारे, एकमेकांना पाडणारे, ठोसे लगावणारे, पोटात ढुश्या देणारे, ढुशी मिळताच वाकणारे खिळे आणि शेवटी जेलमध्ये अडकणारे खिळे–केवळ भन्नाट!

चौथी आहे सर्कस. एक सडपातळ रिंगमास्तर खिळा एका मोठ्या वाघोबा खिळ्याकडून चाबकाच्या फटक्यावर निरनिराळ्या कसरती करवून टाळ्या घेतो. शेवटची कसरत वाघाच्या जबड्यात तोंड देणे–प्रयोग यशस्वी–प्रचंड टाळ्या आणि टाळ्या पडत असतानाच वाघोबा रिंगमास्तरावर झडप घालून, त्याचा फडशा पाडून त्याला पचवतात आणि प्रेक्षकांच्या टाळ्या घेत लांब ढेंग टाकीत निघून जातात.

'जिप्सी' नाही तरी हा चार प्रसंगांचा 'The Nail' बघायलाच हवा, असा आहे.

□



लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य २० रुपये